पुणे, बुधवार, ५ फेब्रुवारी २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 70 • वर्ष ४ थे, अंक ७० • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



'भार' हलका; रेल्वे सुस्साट...! P३



भारतीय स्पीड स्केटिंग संघांचे श्रुती कोतवाल कडे नेतृत्व १२

## At a Glance

### भूतानच्या राजांचे त्रिवेणी संगमात स्नान




**प्रयागराज:** भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक भारताच्या दौऱ्यावर असून त्यांनी आज, मंगळवारी प्रयागराजला भेट दिली. याप्रसंगी महाकुंभाच्या निमित्ताने त्यांनी त्रिवेणी संगमात स्नान केले. यावेळी त्याच्यासमवेत उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ होते. दोघांनी गंगेची पूजा आणि आरती केली. यानंतर वांगचुक यांनी अक्षयवटचे दर्शन घेतले. भूतानचे राजे वांगचूक लखनऊहून विमानाने बामरौली विमानतळावर पोहोचले. याठिकाणी उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्यांचे स्वागत केले. अरैल घाटावरून ते होडीने प्रयागराजमधील संगम घाटावर पोहोचले. येथील संगमात त्यांनी स्नान केले. यानंतर वांगचूक यांनी योगींसोबत पक्ष्यांना खायला दिले आणि त्यांचा फोटोही काढले. पंतप्रधान मोदी आज महाकुंभाला भेट देतील. यानंतर हेलिपॅड, योगसेना रेल घाट आणि संगम येथील व्यवस्थेची पाहणी करतील.

# टेमघरसाठी 315 कोटींचा निधी

## राज्य मंत्रिमंडळाची बैठक संपन्न; तीन निर्णयांवर शिक्कामोर्तब







■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई:** पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील टेमघर प्रकल्पाच्या गळती प्रतिबंधक उपाययोजना व धरण मजबुतीकरणाच्या उर्वरित कामांसाठी 315 कोटी 5 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत महसूल, जलसंपदा आणि मृद व जलसंधारण विभागांशी संबंधित तीन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. विशेषतः पुणे आणि सातारा जिल्ह्यांसाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून, अभय योजनेला एक वर्षांची मुदतवाढ देण्याचा निर्णय नागरिकांसाठी दिलासादायक ठरणार आहे. महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बैठका सुरू आहेत. मात्र, आतापर्यंत कोणतेही मोठे निर्णय घेण्यात आले नव्हते. बैठकीतही फक्त तीन निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्यात आले.

**कोयना जलाशयामध्ये बुडीत बंधाऱ्यांसाठी निधी**

सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर आणि जावळी तालुक्यातील कोयना जलाशयात 25 बुडीत बंधारे बांधण्याच्या प्रकल्पासाठी 170 कोटी रुपयांची तरतूद मंजूर करण्यात आली.

**अभय योजनेला एक वर्षाची मुदतवाढ** शेती, अकृषिक, निवासी, वाणिज्यिक किंवा औद्योगिक कारणांसाठी तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्ट्याने किंवा कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनींच्या (भोगवटादार वर्ग-2) वर्ग-1 मध्ये रुपांतरासाठी लागू असलेल्या अभय योजनेस एक वर्षांची मुदतवाढ देण्यात आली. ही मुदतवाढ नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरणार असून, यामुळे शासकीय जमिनींच्या हस्तांतरण प्रक्रियेला गती मिळेल.

### एकनाथ शिंदेंच्या अनुपस्थितीमुळे राजकीय वर्तुळात पुन्हा चर्चा

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या महत्त्वाच्या कॅबिनेट बैठकीत एकनाथ शिंदे गैरहजर राहिल्यामुळे अनेक चर्चा सुरू झाल्या आहेत. या बैठकीला दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील हजर होते, परंतु शिंदेंची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली. नव्या सरकारमध्ये पहिले खातेवाटपावर वाद झाला होता आणि आता रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रिपदावरूनही वाद दिसत आहेत. यामुळे एकनाथ शिंदे नाराज असल्याच्या चर्चा जोर धरू लागल्या आहेत. गेल्या महिन्यात एकनाथ शिंदे आपल्या मूळ गावी गेले होते आणि त्यानंतर कॅबिनेटच्या बैठकीला ऑनलाईन हजेरी लावली होती. मात्र, नुकत्याच झालेल्या बैठकीला शिंदे गैरहजर राहिल्याने त्यांच्या नाराजगीच्या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे.

# स्वत:च्या प्रसिद्धीसाठी दुसऱ्याला बदनाम- धनंजय मुंडे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** धनंजय मुंडे राज्याचे कृषीमंत्री असताना १६१.६८ कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केल्याने राज्याच्या राजकारणात खळबळ माजली आहे. यानंतर धनंजय मुंडे यांनी पत्रकार परिषद घेत अंजली दमानिया यांच्या आरोपांना उत्तर दिले आहे.

**प्रत्यारोप**

दमानिया यांच्या आरोपाचे मी खंडन करतो. त्यांनी केलेले आरोप खोटे असून त्यांनी आत्मचिंतन करायला हवे. आजपर्यंत दमानिया यांनी केलेल्या आरोपांचे पुढे काय झाले ते त्यांनी पाहावे, असे मुंडे यांनी म्हटले आहे.

त्यांच्या स्वभावाप्रमाणे सनसनाटी निर्माण करण्यापलीकडे यात काही नाही. ज्या निविदा प्रक्रियेवर त्यांनी आक्षेप घेतला ती संपूर्ण प्रक्रिया मार्च २०२४ मध्ये शासकीय नियम आणि धोरणाला अनुसरूनच राबवण्यात आली आहे.

मागील ५० दिवस त्या वेगवेगळ्या आरोप करतायेत. दुसऱ्याला बदनाम करणे, स्वत:ची प्रसिद्धी यासाठी केलेले हे आरोप आहेत असा पलटवार धनंजय मुंडे यांनी केला आहे.

### महाविद्यालयांवर कारवाईचा बडगा

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने विद्यार्थ्यांकडून अँटी रॅगिंगसंदर्भात हमीमत्र न घेणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाईचा बडगा उगारला असून त्यांना कारणे दाखवा नोटीस पाठवली आहे.तसेच अपेक्षित खुलासा न केल्यास दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा देखील दिला आहे. यूजीसीने आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, दिल्ली, मध्य प्रदेश, पदुचेरी, तमिळनाडू, तेलंगना, उत्तर प्रदेश तसेच पश्चिम बंगालमधील एकूण 18 वैद्यकीय महाविद्यालयांना संबंधित नोटीस बजावली आहे. संबंधित महाविद्यालयांनी रॅगिंगला आळा घालण्यासाठी २००९ च्या अँटी रॅगिंग नियमांमध्ये नमूद केलेल्या अनिवार्य आवश्यकतांचे पालन केले नाही. विशेषतः संबंधित महाविद्यालये विद्यार्थ्यांसाठी नियमांनुसार आवश्यक असलेले ॲण्टी रॅगिंग उपक्रम घेण्यात अपयशी ठरले आहेत.

# महाराष्ट्रात कृषी विभागात भ्रष्टाचार: खा. सुप्रिया सुळे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली-** महाराष्ट्रात कृषी विभागात घोटाळा झाल्याचे आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी संसदेत केले होते. या आरोपांना केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह यांनी उत्तर दिलंय. भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करू असं शिवराज सिंह यांनी सांगितलं. लोकसभेत केंद्रीय कृषी मंत्री म्हणाले की, सरकार अनियमितता सहन करणार नाही. तपासात जर कुणी भ्रष्टाचार केल्याचे आढळले तर त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल असे सांगितले.

खासदार सुप्रिया सुळे यांनी आरोप केला होता की, महाराष्ट्रातील एक मंत्री आणि आमदाराने राज्याच्या कृषी विभागात पाच हजार कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचे म्हटले आहे. लोकसभेत सुप्रिया सुळे यांच्या या आरोपावर केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की, मी हे पहिल्यांदाच ऐकतोय. मला सत्य काय आहे माहिती नाही. मात्र जर खरंच भ्रष्टाचार झाल्याचे आढळले तर दोषींवर कठोर कारवाई करू असे आश्वासन केंद्रीय कृषीमंत्र्यांनी दिले आहे.दुसऱ्या एका प्रश्नाला उत्तर देताना कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की, आतापर्यंत २३ राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांनी पंतप्रधान पीक विमा योजना लागू केलीय. तर उर्वरित राज्यांनी ही योजना स्वीकारलेली नाही. ही जगातली सर्वात मोठी पीक विमा योजना आहे. काही राज्य त्यांची स्वत:ची पीक विमा योजना चालवत आहेत. आम्ही त्यांना पंतप्रधान पीक विमा योजनेचे फायदो सांगून योजना लागू करण्यास सांगितले आहे.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी १२ फेब्रुवारीपासून अमेरिका दौऱ्यावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली** : डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्यापासूनच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील भेटीबद्दल चर्चा होती. आता १२ फेब्रुवारीपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदी १३ फेब्रुवारी रोजी वॉशिंग्टनमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतील. या दौऱ्यात ते डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी व्यापार आणि संरक्षण यासह विविध मुद्द्यांवर चर्चा करतील.

पंतप्रधान नरेंद्र मोदी १० फेब्रुवारी रोजी एआय ॲक्शन समिटमध्ये सहभागी होण्यासाठी पॅरिसला जाणार आहेत. फ्रान्सहून निघून ते १२ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी अमेरिकेत पोहोचतील.

# शिवराज राक्षेच्या वादात चंद्रहार पाटीलची उडी; गदा परत करणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सांगली :** यावर्षीची महाराष्ट्र केसरी स्पर्धा वादाच्या भोवऱ्यात सापडली. उपांत्य सामन्यामध्ये शिवराज राक्षेवर अन्याय झाल्याचं बोललं जात आहे. या लढतीदरम्यान झालेल्या राड्यावेळी शिवराज राक्षेने पंचांना लाथ मारली. या कृत्यामुळे डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे याला तीन वर्षांसाठी निलंबित करण्यात आले. या व्यतिरिक्त पंचांच्या निर्णयाला डावलून मैदान सोडल्याने कुस्तीपटू महेंद्र गायकवाडवर तीन वर्षांची बंदी घालण्यात आली. अशातच चंद्रहार पाटील याने त्याला मिळालेल्या दोन्ही गदा परत करण्याचा निर्णय घेतला आहे.

एका व्हिडिओमध्ये बोलताना चंद्रहार पाटील म्हणाला, एका डिबेट कार्यक्रमामध्ये काका पवार, संदीप भोंडवे आणि शिवराज राक्षे होते, यावेळी २००९ ला माझा महाराष्ट्र केसरी स्पर्धेला सर्व पंच कमिटीने पराभव केला याबद्दल काका पवारांना विचारल्यावर त्यांनी मान्य केलं की चंद्रहारवर अन्याय झाला. शिवराज राक्षे हा त्यांचा पठ्ठा, त्याच्यावर अन्याय झाला की ते माध्यमांना सांगत आहेत. पण जेव्हा माझ्या बाबतीत हे घडत असताना तुम्ही तिथं हजर होते. शरद पवार साहेब हे कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष होते. मला हरवल्यानंतर मी आत्महत्येच्या विचारत होतो. आजही मी कोणत्या कुस्तीच्या मैदानामध्ये जात नाही, कारण माझ्या मनामध्ये भीती बसली आहे.

### सिजारिया लाचखोरी प्रकरणात निलंबित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्राध्यापक राजीव सिजारिया यांना लाचखोरी प्रकरणामध्ये निलंबित केले आहे. त्यांनी १.८ कोटी रुपयांची लाचखोरी केल्याची माहिती समोर आली आहे. सिजारीया हे जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या अटल बिहारी वाजपेयी स्कूल ऑफ मॅनेजमेंटचे प्राध्यापक असून त्यांच्यावर या प्रकरणामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच त्यांना आता अटकही करण्यात आली आहे.

राजीव सिजारिया हा राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद अहवालाशी संबंधित प्रकरणामध्ये सहभागी असल्याचा आरोप करण्यात आला आहे. नॅकचा अहवाल तयार करण्यासाठी लाच मागितल्याचा आरोप करण्यात आला आहे.


**बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरण**

# विष्णू चाटेच्या मोबाईलमध्ये हत्याप्रकरणातील महत्त्वाचे पुरावे!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बीड :** बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाला ५६ दिवस उलटून गेलेत तरीही आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे. बीड पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करत धनंजय देशमुख यांनी कृष्णा आंधळेला पोलिसांनी वेळीच अटक केली असती तर आमच्या कुटुंबावर ही दुर्दैवी वेळ आली नसती, असा आरोप केला आहे. धनंजय देशमुख यांनी आरोपी विष्णू चाटेच्या फोनबाबत महत्त्वाचे वक्तव्य केले आहे. विष्णू चाटेचा मोबाईल मिळायला हवा त्यातून अनेक वरिष्ठांना फोन गेलेत. या प्रकरणातून कसं निर्दोष कसं सुटायचे याविषयीचे बोलणे फोनवरील संभाषणात झाल्याचा दावा धनंजय देशमुखांनी केला आहे.



कृष्णा आंधळे फरार असताना पोलिसांसोबत फिरत होता. विष्णू चाटेचा मोबाईल मिळाला पाहिजे. त्यात अनेक व्हिडिओज आहेत. काही महत्त्वाचे पुरावे आहेत. या आरोपींवर केवळ पुरावा नष्ट केल्याचा गुन्हा नोंद करून काहीच उपयोग नाही.

असेही शंभर टक्के या आरोपींना फाशी होणार आहे, पण त्या मोबाईलमध्ये जे काही पुरावे आहेत, व्हिडिओ, ऑडिओ क्लिप्स, काही फोन कॉल्स आहेत याची सगळी जबाबदारी प्रशासनाला घ्यायची आहे. यासंदर्भात गांभीर्याने दखल घ्यावी अशी विनंती मुख्यमंत्र्यांना मी केली आहे. आरोपींना फाशी होणार आहे पण विष्णू चाटेच्या मोबाईलमध्ये जो गंभीर गुन्ह्यांचा डेटा आहे तो आपल्याला पाहिजे आहे. त्याच्यामध्ये आरोपीचे सगळे डिटेल्स असणारे व्हिडिओ कॉल्स, फोन कॉल्स, ऑडिओ क्लिप्स आहेत. यातून अनेक वरिष्ठांना कॉल्स करण्यात आलेले आहेत. ज्यांनी हा खून केलेला आहे, ते संघटित गुन्हेगारीचे मोठे जाळे आहे. त्यांचा मोबाईल समोर आणल्याशिवाय अनेक गोष्टी समोर येणार नाहीत, त्या माहीत होणार नसल्याचे देशमुखांनी सांगितले.

### तालिका अध्यक्षपदी खा. सुनेत्रा पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली-** राष्ट्रवादी काँग्रेसच्या राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांच्यावर एक महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. पहिल्याच टर्ममध्ये सुनेत्रा पवार यांची तालिका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या पदावर नियुक्ती झाल्याबद्दल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी एक्सवर पोस्ट करत सुनेत्रा पवार यांचे अभिनंदन केले आहे. ते म्हणाले, "राज्यसभेतील चर्चेला योग्य दिशा देणे, संसदीय कामकाजाची शिस्त कायम राखणे आणि सभागृहाचे कामकाज सुरळीत पार पाडणे यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका असलेल्या 'तालिका अध्यक्ष' पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राज्यसभा खासदार श्रीमती सुनेत्रा पवार यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या .

# महाराष्ट्र काँग्रेसला लागले नव्या प्रदेशाध्यक्षांचे वेध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नागपूर :** राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीनंतर जोरदार राजकारण रंगले आहे. महायुतीचा निवडणुकीमध्ये एकतर्फी आणि महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. महायुतीमध्ये मंत्रिमंडळ विस्तारामुळे नेते नाराज आहेत. तर महाविकास आघाडीमध्ये पराभवाचे खापर एकमेकांवर फोडले जात आहे. तर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे पराभवामुळे प्रदेशाध्यक्ष पद सोडतील अशी चर्चा सुरु होती. यामुळे आता महाराष्ट्र कॉंग्रेसमध्ये प्रदेशाध्यक्षपदावरुन राजकारण आणि दावे सुरु झाले आहेत. कॉंग्रेसचे सध्या नाना पटोले हे प्रदेशाध्यक्ष आहेत. मात्र त्यावरुन अनेकांनी यापूर्वी देखील नाराजी व्यक्त केली होती. आता विधानसभेमध्ये पराभव झाल्यामुळे नाना पटोले हे पद सोडतील अशी चर्चा होती. आक्रमक व विरोधी पक्ष नेत्याची भूमिका पार पाडू शकेल अशा नवीन प्रदेशाध्यक्षाची काँग्रेसला गरज असून त्याचा शोध सुरू असल्याचा राजकीय गौप्यस्फोट नागपूर काँग्रेस नेते नितीन राऊत यांनी दिली आहे. पक्ष मला संधी देईल तर मला नक्कीच प्रदेशाध्यक्ष बनायला आवडेल अशी इच्छा देखील नाना पटोले यांनी व्यक्त केली आहे.

# हायकोर्टाचा निवडणूक आयोगाला झटका..!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई-** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे निकाल सर्वांनाच अनपेक्षित असे लागले आहेत. निकालानंतर राज्यात मोठ्या मताधिक्याने महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. पण या निकालावर अनेकांनी संशय व्यक्त केली आहे. विरोधकांनी ईव्हीएममध्ये फेरफार केल्याचा आरोप करत निवडणूक आयोगाला सातत्याने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. या पार्श्वभूमीवर वंजितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी उच्च न्यायालयात ईव्हीएम विरोधात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज सुनावणी पार पडली. या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाकडून केंद्रीय निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावण्यात आली असून मतदानाच्या दिवशी शेवटच्या काही तासात वाढलेल्या मतांच्या टक्क्याचा खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत.

**» खुलासा**

वंचित आघाडीचे प्रमुख आणि ॲड प्रकाश आंबेडकर यांनी दाखल केलेल्या याचिकेची हायकोर्टाने दखल घेतली आहे. हायकोर्टाने केंद्रीय निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांना नोटीस बजावली असून दोनआठवड्यात खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

# कृष्णमुर्ती, शुभा खोटे, खेर यांना 'पीफ'चे पुरस्कार जाहीर!!

### २३ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे दि. १३ रोजी सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते उद्घाटन !!




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** '२३ वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट (पीफ) महोत्सव २०२५'चा उद्घाटन सोहळा श्री गणेश कला क्रीडा रंगमंच ,स्वारगेट ,पुणे ,येथे १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सायं ५ .०० वाजता महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते संपन्न होईल. अशी घोषणा महोत्सवाचे संचालक डॉ, जब्बार पटेल यांनी केली. याप्रसंगी ज्येष्ठ चित्रपट समीक्षक व चित्रपट निवड समितीचे अध्यक्ष समर नखाते, चित्रपट निवड समितीचे सदस्य अभिजीत रणदिवे, उपसंचालक विशाल शिंदे (प्रोग्रॅम व फिल्म), उपसंचालक अदिती अक्कलकोटकर (आंतरराष्ट्रीय संपर्क व समन्वय) उपस्थित होते.

पुणे फिल्म फाउंडेशन, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व दादासाहेब फाळके चित्रनगरी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महोत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाची थीम ही "शो मॅन ; राज कपूर" जन्मशताब्दी आहे.

भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेत्री शुभा खोटे व ज्येष्ठ अभिनेते पद्मभूषण अनुपम खेर यांना 'पीफ डिस्टींग्वीश ॲवार्ड', तर ज्येष्ठ गायिका पद्मश्री

» पान ७ वर






**२३व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव** पत्रकार परिषदेत बोलतांना ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक व पुणे फिल्म फाउंडेशनचे चेअरमन डॉ. जब्बार पटेल, (उजवीकडे) ज्येष्ठ चित्रपट समीक्षक व चित्रपट निवड समितीचे अध्यक्ष समर नखाते आणि (डावीकडे) अभिजित रणदिवे उपस्थित होते.

# ‘आरो प्लँट’ च ‘डेंजर झोन’ मध्ये...!

## प्रशासनाचा ढिसाळ कारभार चव्हाट्यावर; १९ प्रकल्पातील पाणी दूषित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगड रस्त्यावरील ज्या परिसरात गुईलेन बॅरे सिंड्रोमचे (जीबीएस) संशयित रुग्ण वाढत आहेत. त्या भागात पाणीपुरवठा करणाऱ्या ३० खासगी जल शुद्धीकरण प्रकल्पांपैकी (आरओ प्लांट) १९ प्रकल्पांतील पाणी दूषित असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी या प्रकाराची गांभीर्याने दखल घेत खासगी टँकर, तसेच ‘आरओ’च्या प्रकल्पांवर कडक कारवाई करण्याचा आदेश पाणीपुरवठा विभागास दिला आहे.

दरम्यान, खडकवाला, किरकिटवाडी आणि आजूबाजूच्या परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या खासगी टँकरमधील पाणी दूषित असल्याचे यापूर्वीच स्पष्ट झाले होते. सिंहगड रोड परिसरातील खडकवासला, नांदेड, किरकिटवाडी, नांदोशी, धायरी, डीएसके विश्व, आंबेगाव या गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून जीबीएस रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ होत असल्याचे समोर आले आहे. या भागात रुग्णांची संख्या वाढत असल्याने राज्य, तसेच केंद्राच्या पथकांनीदेखील या भागाला भेट देऊन आवश्यक ती उपाययोजना करण्याचा आदेश महापालिका आणि जिल्हा प्रशासनाला दिला आहे. या भागातील नागरिकांना ज्या विहिरीतून पाणी दिले जाते, त्या विहिरीच्या पाण्याची तपासणी केली होती. मात्र, हे पाणी दूषित आढळले नाही. त्यानंतर महापालिकेच्या वतीने या भागातील खासगी टँकर पॉइंटमधील पाण्याची तपासणी करण्यात आली होती.

या तपासणीमध्ये संबंधित पाण्यात ई-कोलाय व अन्य जीवाणू असल्याचे आढळले होते. हे पाणी दूषित असल्याचा अहवाल आल्यानंतर महापालिका प्रशासनाकडून संबंधित टँकर भरणा केंद्र, तसेच खासगी टँकरमालकांना केवळ लेखी पत्र देण्यात आले होते. तसेच त्यांना पाणी शुद्धीकरणासाठी ब्लिचिंग पावडर नेण्याचे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले होते. मात्र, कुठल्याही प्रकारची कडक कारवाई करण्याचे धाडस पाणीपुरवठा विभागाने दाखविले नव्हते.



> पीएमसीने धायरी, सिंहगड रोड, किरकटवाडी, खडकवासला आणि आसपासच्या नांदेड शहराच्या परिसरात आरओ प्लांट, वॉटर एटीएम, पिण्याच्या पाण्याचे जार आणि पाणी विकणाऱ्या विक्रेत्यांकडून गोळा केलेल्या ३० नमुन्यांचे मूल्यांकन केले. यामध्ये बॅक्टेरियाचे दूषित प्रमाण स्वीकार्य पातळीपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आढळून आले.
>
> **-नंदकिशोर जगताप,**
> प्रमुख पाणीपुरवठा विभाग, पुणे महापालिका

# जार, बाटल्यांचीही ‘तहान’ दूषित

### ३० पैकी १९ प्लांट महापालिकेच्या रडारवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** शहराच्या सर्वच भागात दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांनी जार आणि पाण्याच्या बाटल्यांच्या खरेदीवर सर्वाधिक भर दिला आहे. मात्र; हे पाणीही पिण्यासाठी योग्य नसल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे महापालिका प्रशासनाने केलेल्या तपासणीतच ही बाब उघडकीस आली आहे; त्यामुळे या पाण्याचीही ‘तहान’ दूषित असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महाराष्ट्रात गुइलेन-बॅरे सिंड्रोमच्या एकूण रुग्णांची संख्या १६३ झाली आहे. विभागाच्या अहवालात म्हटले आहे की, सर्वाधिक प्रकरणे पुण्यातून आली आहेत. तर फक्त आठ रुग्ण शेजारच्या जिल्ह्यांतील आहेत. पुणे जिल्ह्यात पाच जणांचा मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे.

प्रामुख्याने हा आजार दुषित पाण्यामुळे होत असल्याचे मानले जात आहे. अशात शहरातील रहिवासी वापरत असलेल्या पाण्याची तपासणी सुरू आहे. नवीन विलीन झालेल्या गावांच्या पाण्यात, शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या टँकरच्या पाण्यात दूषितता आढळल्यानंतर आता, कॅन, जार आणि बाटल्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या रिव्हर्स ऑस्मोसिस प्लांटच्या पाण्यात दुषितता आणि जीवाणू आढळून आल्याची माहिती पुणे महापालिकेने दिली आहे. पीएमसीच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकुमार जगताप यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रभावित क्षेत्रातील ३० पैकी १९ खाजगी आरओ वॉटर प्लांट दूषित पाण्याचे कॅन पुरवत आहेत.

ते पुढे म्हणाले, 'आम्ही त्यांना नोटिसा पाठवल्या आहेत आणि पाणी निर्जंतुक करण्यासाठी आणि कोणत्याही प्रकारचे दूषितीकरण टाळण्यासाठी ब्लीचिंग पावडर पुरवली आहे. क्लोरिनेशनवर लक्ष ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे

## पुण्यात काय घडतंय...

### ‘फॅबेक्स २०२५’ राष्ट्रीय परिषद



- **आयोजक :** फेबर इंफायनाइट कन्सल्टींग
- **उदघाटक :** चंद्रकांतदादा पाटील, उदय सामंत
- **विशेष मार्गदर्शन :** शेखर सरदेसाई, मकरंद अपल्वार
- **प्रमुख उपस्थिती :** चंद्रशेखर बापट,राहुल लाळे,निंबा पाटील, डॉ. नवनाथ तरले, व्यंकटरमण, नरेश गौर

- **कुठे :** ओ हॉटेल, पुणे
- **कधी :** शुक्रवार, दि. ७ फेब्रुवारी, सांयकाळी ५ वाजता
- **शुल्क :** प्रवेश सर्वांसाठी खुला विनामूल्य

### रंगावली प्रदर्शन



- **आयोजक :** श्रीरंग कलादर्पण फाऊंडेशन
- **उदघाटन हस्ते :** माधुरी मिसाळ
- **प्रमुख उपस्थिती :** ज्येष्ठ अध्यात्मिक गुरु व प्रवचनकार स्थितप्रज्ञानंद सरस्वती माताजी, प्रमोद कांबळे, प्रतीक अथणे, सुप्रसिद्ध रंगावली कार जगदीश चव्हाण
- **संयोजक :** सुप्रसिद्ध रंगावलीकार अक्षय शहापूरकर

- **कुठे :** बालगंधर्व रंगमंदिर कलादालन, शिवाजीनगर
- **कधी :** दि. ६ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत सकाळी ९ ते रात्री ८ या वेळेत
- **शुल्क :** प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले

# पालिका रुग्णालयात फिजिओथेरपिस्टची नेमणूक



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या मुरलीधर पांडुरंग लायगुडे रुग्णालयात रुग्णांवरील उपचारासाठी दोन फिजिओथेरपिस्ट नेमण्यात आले आहेत. जीबीएस रुग्ण बरे झाल्यानंतर त्यांना पायावर उभे राहून चालण्यास ३ ते ६ महिन्यांचा कालावधी लागतो. अशा रुग्णांना त्यांच्या पायावर लवकर उभे करण्यास फिजोओथेरपिस्ट महत्त्वाची भूमिका बजावितात. त्यामुळे महापालिकेने हा निर्णय घेतला आहे,' अशी माहिती महापालिकेच्या आरोग्यप्रमुख डॉ. नीना बोराडे यांनी दिली.

आरोग्य

पुण्यात जीबीएसचा उद्रेक झाल्यानंतर राज्याच्या आरोग्य विभागाने शीघ्र प्रतिसाद पथकाची स्थापना केली. या पथकाची बैठक सोमवारी झाली. या बैठकीत राज्यातील जीबीएसच्या रुग्णसंख्येचा आढावा घेण्यात आला. या वेळी पुणे वगळता राज्यात इतरत्र जीबीएस रुग्णसंख्येत गेल्या काही वर्षांच्या तुलनेत वाढ नोंदविण्यात आली नसल्याचे समोर आले. पुण्यातही केवळ सिंहगड रस्ता परिसरात रुग्णसंख्येत जास्त वाढ झाली आहे. त्यामुळे पुण्याबाहेरील रुग्ण आणि त्यांची तपासणी करण्याऐवजी पुण्यातील आजार व्यवस्थापनावर लक्ष देण्यावर बैठकीत भर देण्यात आला, अशी माहिती सूत्रांनी दिली.


राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या रुग्णसंख्येतील वाढ केवळ पुण्यापुरती मर्यादित आहे. पुण्यातही सिंहगड रस्ता परिसरातच या आजाराचा उद्रेक दिसून येत आहे. राज्यात इतरत्र जीबीएस रुग्णांची संख्या नेहमीएवढीच असून, त्यात वाढ झालेली नाही.यामुळे पुढील काळात पुण्यातील जीबीएस व्यवस्थापनावर अधिकाधिक भर देण्यात येणार आहे,' असे शीघ्र प्रतिसाद पथकाने सोमवारी स्पष्ट केले.

# पं.दादासाहेब प्रतिष्ठानचा पुरस्कार जाहीर

## रवींद्र कामत आणि कविता काळे मानकरी, शुक्रवारी वितरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ज्योतिष शास्त्राच्या प्रचार-प्रसारासाठी अविरत कार्य करणारे कै.पं. श्रीकृष्ण जकातदार यांच्या २६ व्या स्मृतीदिनानिमित्त पं. दादासाहेब प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा 'मंदाश्री' पुरस्कार यंदा ज्योतिषशास्त्राच्या प्रचार प्रसार कार्यातील गोवा येथील नामवंत पारंपारिक ज्योतिषी, वक्ते आणि संपादक रवींद्र कामत आणि पुणे येथील नामवंत लेखिका, वक्त्या आणि अध्यापिका कविता काळे यांना जाहीर झाला आहे. शुक्रवार दिनांक ७ फेब्रुवारी रोजी पुरस्कार प्रदन सोहळा होणार आहे, अशी माहिती पं. दादासाहेब प्रतिष्ठानचे विश्वस्त विजय जकातदार यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविली आहे.







ज्योतिषशास्त्रातील अतुलनीय कार्याबद्दल दरवर्षी एक स्त्री आणि एका पुरुष ज्योतिषाला हा पुरस्कार देण्यात येतो. यंदा राज्याचे निवृत्त सचिव आय.ए.एस. ॲड. अरुण उन्हाळे यांच्या हस्ते शुक्रवार दिनांक ७ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी ६.०० वाजता वेदशास्त्रोत्तेजक सभा, सदाशिव पेठ, पुणे येथे पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ.वा. ल. मंजूळ भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून प्रतिभा शाहू मोडक आणि चंद्रकांत शेवाळे उपस्थित राहणार आहेत. यावेळी डॉ. वा. ल. मंजूळ लिखित 'ज्योतिषः विद्या, व्यवसाय की व्यासंग' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन पं. दादासाहेब प्रतिष्ठानतर्फे करण्यात आले आहे.

### महेश प्रोफेशनल फोरम चॅरिटेबल ट्रस्टतर्फे

# महेश आयडॉल सीझन १३ स्पर्धा रविवारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** माहेश्वरी समाजातील प्रतिभावान तरुण व्यक्तिमत्त्वांना समाजासमोर आणून त्यांच्यातील नेतृत्वगुण ओळखत प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने महेश प्रोफेशनल फोरम चॅरिटेबल ट्रस्टतर्फे महेश आयडॉल २०२४-२५ सीझन १३ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातून ७५ युवक-युवतींचा यामध्ये सहभाग असून ही स्पर्धा रविवार, दिनांक ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता कोथरूडमधील एमआयटी संस्थेच्या सभागृहात होणार आहे, अशी माहिती सीए मनोज मालपाणी आणि निहार लढ्ढा पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला फोरम चे श्रुती करनानी, सीए विमल करनानी, रोहित मोहता, प्रिती मालपाणी, शितल भट्टड, जुगल तोष्णीवाल आदी मान्यवर उपस्थित होते.



सीए मनोज मालपाणी म्हणाले, महेश प्रोफेशनल फोरम चॅरिटेबल ट्रस्ट ही माहेश्वरी तरुण - तरुणींच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी ना नफा ना तोटा तत्वावर काम करणारी संस्था आहे. पुण्यातील सर्व १५ माहेश्वरी प्रोफेशनल फोरम चॅप्टरने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. माहेश्वरी युवक - युवतींनी वैयक्तिक आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याचे मूल्यमापन यामध्ये केले जाते. कार्यक्रमाकरिता कुशल टेक्नॉलॉजीचे ललिता करवा, बाळकृष्ण करवा, स्किन शुअर क्लिनिकच्या रश्मी सोनी-लोहिया आणि इनोटेक ऑटो इंडिया प्रा. लि. चे नीरज मंत्री यांनी विशेष सहकार्य केले आहे.

निहार लढ्ढा म्हणाले, वयवर्षे २५ ते ४५ या वयोगटातील युवक युवती यामध्ये सहभागी होतात. विविध प्रश्न विचारण्यासोबतच त्यांच्यातील कौशल्यगुण देखील जाणून घेतले जातात. स्पर्धकांमधील विविध गुणांचे मूल्यांकन परीक्षक आणि उपस्थित प्रेक्षक करून विजेत्याला महेश आयडॉल हा किताब दिला जातो. यंदाच्या वर्षी भारतातून ७५ अर्ज आले होते. त्यातील १० जणांची निवड अंतिम फेरीसाठी करण्यात आली आहे. त्यातील प्रथम तीन क्रमाकांना सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देऊन तसेच अंतिम विजेत्याला महेश आयडॉल हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

## Selected

# एमआयटी-एडीटी विद्यापीठात कार्यशाळा संपन्न



**पुणे :** येथील एमआयटी आर्ट, डिझाईन, टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे आणि आंतरराष्ट्रीय कौन्सिल ऑफ ज्युरिस्ट्स (लंडन) यांच्या संयुक्त विद्यमाने “व्यावसायिक नैतिकता आणि मानवी मूल्ये” या विषयावर कार्यशाळा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेचा उद्देश कायदा व्यवसायातील नैतिकतेचे महत्त्व अधोरेखित करणे आणि विद्यार्थ्यांना न्याय व मूल्यांसाठी प्रेरित करणे होता.कार्यक्रमाची सुरुवात एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश तु. कराड यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यांच्यासोबत कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्र-कुलगुरू प्रा. डॉ. रामचंद्र पुजेरी विद्यापीठातील अधिष्ठाता आणि संचालक उपस्थित होते. प्रा. डॉ. कराड यांनी कायदा व्यवसायाचे महत्त्व सांगताना म्हटले की, “कायदा व्यवसाय हा केवळ एक करिअर नसून, तो न्याय व सत्यासाठी लढणारे श्रेष्ठ क्षेत्र आहे, जे व्यक्तीला समाजात मान व प्रतिष्ठा देते.कार्यक्रमानंतर डॉ. आदिश अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांसोबत थेट संवाद साधला.ही कार्यशाळा डॉ. सपना सुकृत देव, अधिष्ठाता, स्कूल ऑफ लॉ, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. महेश चोपडे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा.आदित्य केदारी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# ‘सेवा भवन दौड’ ९ फेब्रुवारी रोजी

**पुणे :** सेवा भवन’ या पुण्यातील रुग्णसेवा प्रकल्पातर्फे ‘सेवा भवन दौड’ या मूत्रपिंडाच्या स्वास्थ्या विषयी जनजागृतीपर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ‘सेवा भवन दौड’चा प्रारंभ रविवारी, ९ फेब्रुवारी रोजी सकाळी सहा वाजता होईल. या उपक्रमापासून ‘राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती’च्या आरोग्यविषयक जनजागृती मोहिमेचाही प्रारंभ होणार आहे.

‘जनकल्याण समिती’तर्फे मंगळवारी आयोजित पत्रकार परिषदेत समितीचे कार्यवाह प्रमोद गोऱ्हे आणि ‘सेवा भवन’ प्रकल्पाचे कार्यवाह पलाश देवळणकर यांनी ही माहिती दिली. ‘रन फॉर किडनी हेल्थ’ हा विचार समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी ‘सेवा भवन दौड’चे आयोजन करण्यात आले आहे. ‘जनकल्याण समिती’तर्फे ‘सेवा भवन’ हा सेवा प्रकल्प चालवला जातो. या प्रकल्पाच्या वतीने ‘सेवा भवन दौड’ होत असून कर्वेनगरमधील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेपासून त्याचा प्रारंभ होईल.

या ‘दौड’चे पाच किलोमीटर आणि दहा किलोमीटर असे दोन टप्पे आहेत. या शिवाय ‘चॅरिटी रन’ हा उपक्रमही केला जाणार आहे. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, लेखक, दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर, संघाचे अ. भा. प्रचार प्रमुख सुनील आंबेकर, प. महाराष्ट्र प्रांताचे कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव, पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ‘सेवा भवन दौड’चा प्रारंभ होईल.

# विनामूल्य अग्निकर्म आणि विद्धकर्म चिकित्सा शिबिरास प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

## आयुर्वेदीक उपचार परंपरा पुढे न्यावी : डॉ.भूषण पटवर्धन

**पुणे :** कै.वैद्य रामचंद्र बल्लाळ गोगटे यांच्या जयंतीनिमित्त 'इंडियन ड्रग्स रिसर्च असोसिएशन अँड लॅबोरेटरी'च्या इंटिग्रेटीव्ह पेन मॅनेजमेंट क्लीनिककडून व गोगटे फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने विद्धकर्म चिकित्सा दिवस साजरा करण्यात आला. गोगटे यांच्या जयंतीनिमित्त मोफत अग्निकर्म आणि विद्धकर्म चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले .शिबिराच्या उद्घाटन



कार्यक्रमात ' आयुष ' च्या केंद्रीय आयुर्वेद विज्ञान अनुसंधान परिषद चे ज्येष्ठ संशोधक प्रा.डॉ. भूषण पटवर्धन, वैद्य गोगटे यांचे चिरंजीव पद्मनाभ गोगटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी 'इंडियन ड्रग्स रिसर्च असोसिएशन अँड लॅबोरेटरी'चे अध्यक्ष डॉ.सुहास जोशी हे होते. डॉ.पूर्वा गोखले यांनी सूत्रसंचालन केले. फाऊंडेशनच्या वतीने डॉ. प्रज्ञा अक्कलकोटकर, डॉ.पूर्वा गोखले यांनी स्वागत केले. डॉ. मंदार अक्कलकोटकर यांनी प्रास्ताविक केले.डॉ.प्रज्ञा अक्कलकोटकर यांनी विद्धकर्माचे प्रात्यक्षिक दाखवले.

यावेळी बोलताना डॉ. भूषण पटवर्धन म्हणाले,' गांजलेल्या रुग्णांना दिलासा देणे, हे वैदयकीय व्यवसायाचे उद्दीष्ट असायला हवे. डॉक्टरांनी उपचार करताना सेवाभावी कामाने दिलासा द्यावा. आयुर्वेदिक ज्ञानाची परंपरा पुढे सुरु ठेवावी. योग हे प्रगत शास्त्र आहे.योग आणी आयुर्वेद ची जोड दिल्याशिवाय फिजिओथेरपी उपचार अपूर्ण ठरतात.

# लष्कर भागात महाविद्यालयीन तरुणाला लुटले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाविद्यालयीन युवकाला चाकूचा धाक दाखवून त्याच्याकडील रोकड लुटून नेण्यात आल्याची घटना लष्कर भागात घडली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एका युवकाने लष्कर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

क्राईम

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार युवक लष्कर भागातील एका महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. तो सोमवारी (३ फेब्रुवारी) सकाळी पावणेसहाच्या



सुमारास पूना कॉलेज परिसरातून दुचाकीवरुन निघाला होता. पूना कॉलेज परिसरातील रस्त्यावर दोन चोरट्यांनी त्याला अडविले. त्याला चाकूचा धाक दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली. युवकाला मारहाण करुन खिशातील १२०० रुपयांची रोकड लुटून चोरटे पसार झाले. पोलीस उपनिरीक्षक राहुल घाडगे तपास करत आहेत.

### झोपडपट्टीतील मुलांसाठी आयोजित दिमाखदार कला महोत्सव संपन्न

# ‘त्यांना’ अपेक्षा आहे अन्नाची अन् त्याहूनही अधिक प्रेमाची...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चॉकलेट आणि कँडीने ओसंडून वाहणारी नदी... माणसापेक्षाही मोठा झालेला पिझ्झा-बर्गर आणि पॉपकॉर्न... मोबाइल-टीव्ही-घड्याळे इत्यादी इलेक्ट्रॉनिक वस्तू झाडावर टांगून कामावर गेलेली माणसे... कुणीही उपाशी राहू नये म्हणून सगळीकडे फळे आणि भाज्याच भाज्या... उलटी माणसे-उलट्या इमारती, सगळे काही उलटेच उलटे... वास्तवापासून फारकत घेणाऱ्या स्वप्नातील जादुई दुनियेची ही चित्रे साकारली होती दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्या झोपडपट्टीतील लहान मुलांनी.त्यावेळी या मुलांनी आम्हाला भरपूर प्रेमाची आणि त्याहूनही अधिक प्रेमाची अपेक्षा असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या.



निमित्त होते नुक्कड कॅफे, भाग्यशाली भविष्य शिक्षा फाउंडेशन यांच्यातर्फे विमाननगर येथील गेनूभाऊ खेसे प्राथमिक विद्यालयात झोपडपट्टीतील मुलांसाठी आयोजित कला महोत्सवाचे. या महोत्सवात मुलांनी काढलेल्या वारली, मंडाला अशा विविध प्रकारच्या चित्रांचे प्रदर्शन आणि त्यांनी रचलेली गाणी, नृत्ये, पपेट शो इत्यादी कलांचे सादरीकरण करण्यात आले. भाग्यशाली भविष्य शिक्षा फाउंडेशनच्या कजरी मित्रा, नुक्कड कॅफेचे वैभव पालविया आणि कलाकार दीक्षा माने आदी या वेळी उपस्थित होते.

- चॉकलेट आणि कँडीने ओसंडून वाहणारी नदी... माणसापेक्षाही मोठा झालेला पिझ्झा-बर्गर आणि पॉपकॉर्न... मोबाइल-टीव्ही-घड्याळे इत्यादी इलेक्ट्रॉनिक वस्तू झाडावर टांगून कामावर गेलेली माणसे... कुणीही उपाशी राहू नये म्हणून सगळीकडे फळे आणि भाज्याच भाज्या... उलटी माणसे-उलट्या इमारती, सगळे काही उलटेच उलटे... वास्तवापासून फारकत घेणाऱ्या स्वप्नातील जादुई दुनियेची ही चित्रे साकारली होती दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्या झोपडपट्टीतील लहान मुलांनी.

> विरोधाभासातून तयार झालेली सामाजिक-मानसिक परिस्थिती मुलांच्या जडणघडणीवर परिणाम करत असते. मुलांना वर्गात बसवून रोजचे विषय शिकवणे हेच मोठे आव्हान असते. अशा वेळी मुले मोकळेपणाने व्यक्त होत नाहीत. मात्र, कलेच्या माध्यमातून ते व्यक्त होऊ शकतात, या उद्देशाने हा कला महोत्सव आयोजित केला जातो.
>
> **— कजरी मित्रा,**
> संस्थापक, भाग्यशाली भविष्य शिक्षा फाउंडेशन

#रा

## At a Glance

### पत्नीवर रॉकेल ओतून पेटविले; पतीला जन्मठेप

**पुणे :** पत्नीवर रॉकेल ओतून तिचा खून करणाऱ्या एकाला अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. पी. जाधव यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. गंभीर भाजलेल्या पत्नीने ससून रुग्णालयात मृत्यूपूर्व जबाब दिला होता. जबाबाची चित्रफीत सरकार पक्षाकडून न्यायालयात सादर करण्यात आली. मृत्यूपूर्व जबाब, साक्ष, तसेच पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने शिक्षा सुनावली.

तानाजी दत्ता उर्फ दत्तात्रय सरकाळे (वय २८, रा. तांदळी, शिरूर) असे शिक्षा सुनावलेल्या आरोपीचे नाव आहे. तानाजी आणि प्रियांका (वय २१) यांचा २०१३ मध्ये विवाह झाला होता. त्यांना एक मुलगा आहे. तानाजी हा प्रियांकाच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करायचा. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर प्रियाकांच्या आई-वडिलांनी त्याला समजावून सांगितले होते. ७ मे २०१६ रोजी तानाजीने प्रियांकाशी वाद घालण्यास सुरुवात केली. त्याने तिच्या अंगावर रॉकेल ओतले. रॉकेल ओतल्यानंतर ती घरातून बाहेर पळाली. तानाजीने तिला पेटवून दिले. त्यानंतर तिच्या अंगावर पाणी ओतून तो पसार झाला होता. स्टोव्ह पेटविताना पत्नी भाजली, असा बचाव त्याने केला होता.

गंभीर भाजलेल्या प्रियांकाला तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिने मृत्यूपूर्व जबाब ससून रुग्णालयात दिला होता. उपचारादरम्यान तिचा ११ मे रोजी मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे यांनी केला.

# ‘भार’ हलका; रेल्वे सुस्साट...!

## खडकीला नवे टर्मिनल; एक्सप्रेस गाडीलाही हिरवा कंदिल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क






**पुणे :** खडकी येथे नवीन स्वतंत्र रेल्वे टर्मिनल उभारण्यास रेल्वे बोर्डाने गेल्या वर्षी मंजुरी दिली होती. या टर्मिनलचे काम सध्या सुरू असून डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन रेल्वे प्रशासनाने केले आहे. या नवीन टर्मिनलमुळे पुणे रेल्वे स्थानकावरील भार कमी होऊन प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मध्य रेल्वेच्या पुणे विभागातून दररोज दीड लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करतात आणि दररोज २०० हून अधिक रेल्वे गाड्यांची ये-जा सुरू असते. भविष्यात ही संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. पुणे रेल्वे स्थानकावरील हा वाढता ताण लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने हडपसर आणि खडकी येथे दोन नवीन टर्मिनल्स विकसित करण्याचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे पाठवला होता. यापैकी हडपसर रेल्वे टर्मिनलला मंजुरी मिळाली असून त्याचे कामही सुरू झाले आहे. तेथून एक एक्स्प्रेस गाडीही सुरू करण्यात आली आहे. आता प्रवाशांच्या सोयीच्या दृष्टीने खडकी येथे नवीन टर्मिनल विकसित करण्याचे काम सुरू आहे. यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून डिसेंबर २०२५ पर्यंत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, अशी माहिती रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

रेल्वे बोर्डाने मार्च २०२४ मध्ये खडकी टर्मिनल विकसित करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आणि त्यासाठी ३७ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. या निधीतून खडकी येथे एक नवीन प्लॅटफॉर्म आणि दोन स्टेबलिंग लाइन्स विकसित करण्यात येणार आहेत. तसेच प्रवाशांच्या सोयीसाठी इतर अनेक कामेही केली जाणार आहेत. खडकी टर्मिनलमुळे मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या काही एक्स्प्रेस गाड्या येथून सोडणे शक्य होणार आहे. याशिवाय काही लोकल गाड्याही येथून सोडता येतील. यामुळे पुणे रेल्वे स्थानकावरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

> खडकी टर्मिनलवर एक नवीन प्लॅटफॉर्म बांधण्यात येणार आहे. प्लॅटफॉर्म क्रमांक एकची रुंदी आणि उंची वाढवण्यात येणार आहे. प्लॅटफॉर्म यार्ड लाइन चारची दुरुस्ती आणि रुंदीकरण केले जाणार आहे. तसेच पादचारी पुलाचा विस्तार करण्यात येणार आहे. खडकी येथील टर्मिनलचे काम सुरू असून ते डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
>
> **— हेमंतकुमार बेहरा,** जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे

# रेल्वेच होणार नाशिक मार्गाची ‘को-पायलट’...!

## ‘महारेल’च्या प्रस्तावाला ‘रेड सिग्नल’; नवीन मार्गाचा ‘डीपीआर’ बनविणार




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे-नाशिक द्रुतगती रेल्वे प्रकल्पाचे काम रेल्वे विभागाकडूनच करण्यात येणार असल्याचे मध्य रेल्वेच्या पुणे विभागाचे व्यवस्थापक राजेशकुमार वर्मा यांनी स्पष्ट केले. त्यामुळे ‘महारेल’ने केलेल्या जुन्या सविस्तर प्रकल्प अहवालाला (डीपीआर) बाहेरचा रस्ता दाखविला गेला का, असा प्रश्न उपस्थित झाला असून, ‘नवीन डीपीआरबाबत माझ्याकडे माहिती नाही,’ असेही वर्मा यांनी नमूद केल्याने संभ्रम वाढला आहे.

रेल्वे अर्थसंकल्पात देशांतर्गत करण्यात आलेल्या तरतुदींसंदर्भात रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे पत्रकार परिषद घेतली. त्यानंतर वर्मा यांनी संवाद साधला. त्या वेळी, महाराष्ट्रातील विविध योजनांची माहिती देताना पुणे-नाशिक नवीन द्रुतगती मार्गिकेबाबत उल्लेख झाला नसल्याने वर्मा यांना प्रश्न विचारण्यात आला. या वेळी त्यांनी याबाबत सविस्तर माहिती नसल्याचे सांगितले.

पुणे-नाशिक द्रुतगती रेल्वेमार्गामध्ये जुन्नर तालुक्यातील खोडद गावातील जायंट मीटरव्हेव रेडिओ टेलिस्कोप (जीएमआरटी) हा सर्वांत मोठा दुर्बिण संशोधन प्रकल्प अडथळा ठरत असल्याने रेल्वेमंत्री वैष्णव यांनी या मार्गावरून रेल्वे प्रकल्प उचित ठरणार नाही, असे जाहीर केले. तसेच, जीएमआरटी प्रकल्पाला धक्का न लावता पुणे-अहिल्यानगर-शिर्डी-नाशिक या नवीन रेल्वे मार्गाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे आदेशही दिले. मात्र, स्थानिक आणि लोकप्रतिनिधींचा नवीन रेल्वे मार्गाला विरोध आहे.

या द्रुतगती प्रकल्पासाठी वेळेत निधी प्राप्त होत नसल्याने भूसंपादन थांबविण्यात आले होते. मेट्रो कायद्याच्या धर्तीवर प्रकल्पाची अंमलबजावणी केल्यास भूसंपादनासह प्रकल्पाची प्रत्यक्ष कामे विनाअडथळा होऊ शकतील. प्रकल्पाला गती मिळेल, प्रशासकीय परवानग्या, मंजुरी तातडीने मिळू शकतील, म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी २०२२ मध्ये मेट्रो कायद्यानुसार ‘महारेल’च्या माध्यमातून हा मार्ग पूर्ण करण्याबाबत निर्णय घेतला होता. त्यानुसार ‘महारेल’कडून प्रस्ताव सादर करण्यात आला. मात्र, वैष्णव यांनी नवीन रेल्वे मार्गिकेसाठी नव्याने डीपीआर तयार करण्याच्या सूनचा दिल्याने ‘महारेल’ने केलेला अहवाल डावलण्यात आला असल्याचे स्पष्ट झाले आहे. खेड, हवेली, तसेच नगर जिल्ह्यातील संगमनेर, नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनींचे भूसंपादन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना मोबदलादेखील वितरित करण्यात आला असून, या जमिनींचे काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

> पुणे-नाशिक द्रुतगती नवीन रेल्वे मार्गिकेचा डीपीआर तयार करण्याचे काम सुरू आहे. हा प्रकल्प रेल्वे विभागाकडूनच करण्यात येईल.
>
> **— राजेशकुमार वर्मा,** व्यवस्थापक, मध्य रेल्वे, पुणे विभाग

# विकसकांना ‘महारेरा’ चे ‘वसूली वॉरंट’

## वसूल करण्यासाठी महारेराने : जिल्हाधिकाऱ्यांना पाठवले पत्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे (महारेरा) अनेक ग्राहक विकासकांच्या विरोधात दाद मागतात. यात महारेराकडून ग्राहकांच्या बाजूने निकाल देऊनही त्यांचे विकासकांकडे अडकलेले पैसे मिळत नाहीत. त्यामुळे कायदेशीर न्याय मिळाला, तरी हातात आपले पैसे न पडल्याने या ग्राहकांना खऱ्या अर्थाने न्याय मिळत नाही. महारेराकडून अशा विकासकांकडून वसुलीचे वॉरंट जिल्हा प्रशासनाला पाठविण्यात येतात. त्यावर कार्यवाही करावी, यासाठी महारेराचे प्रमुख मनोज सौनिक यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना पत्र लिहिले आहे.

पुण्यातील काही विकासकांकडे ग्राहकांचे तब्बल १७७ कोटी रुपये अडकले आहेत. ते वसूल करण्यासाठी महारेराने जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठविले आहे.

घर अथवा सदनिका खरेदीसाठी नागरिक आयुष्यभराची पुंजी लावून आणि बँकेतून कर्ज घेऊन पैसे उभारतात. हे पैसे विकासकाला देऊनही त्यांना घर मिळत नाही. अशा ग्राहकांनी महारेराकडे दाद मागितल्यानंतर त्यांचे पैसे परत देण्याचा आदेश विकासकांना देण्यात आला होता.

महारेराच्या पत्रात म्हटले आहे, की तुमच्या जिल्ह्याकडे अनेक विकासकांच्या वसुलीची वॉरंट पाठविण्यात आली आहेत. सामान्य नागरिकांनी एखादे घर अथवा सदनिका खरेदी करण्यासाठी बँकेचे कर्ज काढून, आयुष्यभराची गुंतवणूक लावलेली असते. त्यांचे घर खरेदीचे स्वप्न विकासक पूर्ण करीत नाहीत आणि त्यांचे पैसेही परत देत नाहीत. महारेराने अशा प्रकरणांमध्ये ग्राहकांच्या बाजूने निर्णय दिला आहे. जिल्हाधिकारी या नात्याने कायदेशीर उपाययोजना करून ग्राहकांना न्याय मिळवून देण्यासाठी तातडीने पावले उचलावीत.

पुण्यातील मारवेल ग्रुप अँड डेव्हलपर्स, एक्सर्बिया चाकण डेव्हलपर्स आणि डी. एस. कुलकर्णी या तीन विकासकांकडे ग्राहकांचे ९६ कोटी रुपये अडकले आहेत. पुणे जिल्ह्यातील एकूण प्रलंबित वसुलीपैकी ही रक्कम ५४ टक्के आहे. त्यामुळे या विकासकांवर कार्यवाही करून त्यांच्याकडून पैसे वसूल करावेत. विकासकांकडूल वसुलीबाबत गांभीर्याने लक्ष देण्याची विनंती आहे. याचबरोबर वसुली प्रगतीचा मासिक अहवाल दरमहा पाठविण्याच्या सूचना संबंधितांना कराव्यात, असेही महारेराने पत्रात नमूद केले आहे.

आतापर्यंत पुणे जिल्ह्यात ६२ ग्राहकांना त्यांचे पैसे परत मिळाले आहेत. या ग्राहकांनी ३७ प्रकल्पांच्या विरोधात महारेराकडे तक्रारी केल्या होत्या. त्यांना विकासकांकडून ४२.३१ कोटी रुपये परत मिळाले आहेत.

**विकासकांकडे किती पैसे अडकले?**

- मारवेल ग्रुप अँड डेव्हलपर्स – ६७ कोटी रुपये
- एक्सर्बिया चाकण डेव्हलपर्स – १०.६१ कोटी रुपये
- डी. एस. कुलकर्णी – १८.३१ कोटी रुपये

**गृह खरेदीदारांची कोंडी**

- तक्रारी – २७४
- प्रकल्प – १४०
- ग्राहकांची अडकलेली रक्कम –
- १७७.५० कोटी रुपये

# जी बी एस संसर्गजन्य नाही; महाराष्ट्रात पूर्णपणे नियंत्रणात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्रात विशेष करून पुणे शहरात जी बी एस रुग्णाची संख्या वाढत आहे. मात्र हा आजार संसर्गजन्य नाही, यामुळे परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे. तसेच राज्यात या आजारांवर लागणारी औषधे पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याचे केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी आज झालेल्या ऑनलाइन बैठकीत सांगितले.

यावेळी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, महाराष्ट्रचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ आदीसाह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी सविस्तर आढावा घेत विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना महत्वपूर्ण सूचना केल्या, यामध्ये ज्या ठिकाणी जी बी एस रुग्ण संख्या वाढत आहेत त्या भागात प्रत्यक्ष पहाणी करण्यात यावी, कुकुट पालन व्यावसाय असलेल्या परिसराला भेटी द्याव्यात. पाणी पुरवठा आणि शुद्धीकरण विभागाने विशेष जलशुद्धीकरण मोहीम राबवावी, ज्या ठिकाणी पाईप लाइन दुरुस्तीची गरज असेल तिथे ती तत्काल करण्यात यावी.

> बैठकीबद्दल माहिती देताना वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, पुण्यातील जी बी एस रुगाणबद्दलची इत्यंभूत माहिती आम्ही केंद्र सरकारला दिली आहे. राज्यातील जी बी एस परिस्थितीवर आमचे पूर्ण लक्ष असून पुणे महानगर पालिका आणि राज्य सरकार समन्वय साधून ह्या साठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करत आहेत.
>
> **-माधुरी मिसाळ,** वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री

# दिव्यांगांना ट्रायसिकल; व्हीलचेअरचे वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महा एनजीओ फेडरेशन यांच्या माध्यमातून आणि कार्डमॉम लॉजिस्टिक असेट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमातून ३०० दिव्यांग बांधवांना मोफत ट्रायसिकल व्हीलचेअर व अंधकाठी याचे वाटप करण्यात आले.

साहित्याचे वाटप प्रसिद्ध अभिनेते संदीप पाठक, दिव्यांग भवन फाउंडेशन चे कार्यकारी संचालक ओमप्रकाश देशमुख, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, कार्डमॉम लॉजिस्टिक्स असेस्टस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड चे व्यवस्थापक अजित पाटील, महा एनजीओ फेडरेशनचे संचालक अमोल उंबरजे, मुकुंद शिंदे, योगेश बजाज, पोलीस निरीक्षक नकुल न्यामने यांच्या हस्ते करण्यात आले.

दिव्यांग बांधवांना स्वतःचा उदरनिर्वाह चालू करण्यासाठी ट्रायसिकल मध्ये बॉक्स टेबलची व्यवस्था केलेली आहे. जेणेकरून वस्तूंची विक्री करून ते स्वतःचा उदरनिर्वाह करू शकतील व तसेच अपंग लोकांना व्हीलचेअर उपयोगी पडण्यासाठी याचे वाटप करण्यात आले. यावेळी संदीप पाठक यांनी सेवा व कलाकार याविषयी सांगितले

महाराष्ट्र गो सेवा आयोगाचे अध्यक्ष तथा महा एनजीओ फेडरेशनचे संस्थापक शेखर मुंदडा यांनी दिव्यांगांना कोणकोणत्या प्रकारच्या माध्यमातून सेवा कार्य करता येईल, याबाबत उपस्थितांना संबोधित केले.

## ‘आधार’ दिव्यागांना...!

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे** महा एनजीओ फेडरेशन यांच्या माध्यमातून आणि कार्डमॉम लॉजिस्टिक असेट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमातून ३०० दिव्यांग बांधवांना मोफत ट्रायसिकल व्हीलचेअर व अंधकाठी याचे वाटप करण्यात आले.

# गुलटेकडी उड्डाणपूलावर अपघात, एक ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मार्केटयार्ड-गुलटेकडी उड्डाणपुलावर झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. दुचाकीस्वाराला धडक देऊन पसार झालेल्या दुचाकीस्वाराविरुद्ध स्वारगेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला. नेल्सन पॉल डिसोझा (वय ५०, रा. ज्ञानेश्वर कॉलनी, कासारवाडी, मुंबई-पुणे रस्ता) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याप्रकरणी एका दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत डिसोझा यांचा मुलगा गौरीश (वय १९) याने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार नेल्सन हे ३१ जानेवारी रोजी दुपारी चारच्या सुमारास मार्केटयार्ड-गुलटेकडी उड्डाणपुलावरुन निघाले होते. त्या वेळी भरधाव दुचाकीने दुचाकीस्वार नेल्सन यांना धडक दिली. अपघातात नेल्सन यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघात करणारा दुचाकीस्वार पसार झाला. गंभीर जखमी झालेल्या नेल्सन यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला. स्वारगेट पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज नांद्रे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस उपनिरीक्षक शैलेश आलाटे तपास करत आहेत. गुलटेकडी उड्डाणपुलावर यापूर्वी गंभीर स्वरुपाचे अपघात झाले आहेत. मार्केट यार्ड, तसेच सेव्हन लव्हज चौकाकडून ये-जा करणारी भरधाव वाहने या उड्डाणुलाचा वापर करतात.

# गुंडावर गोळीबार, तिघांना अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

क्राईम

**पुणे :** बिबवेवाडीत वैमनस्यातून गुंडावर पिस्तुलातून गोळीबार करुन पसार झालेल्या तिघांना पोलिसांनी अटक केली. याप्रकरणात अटक करण्यात आलेले तिघे सराइत असून, मित्राच्या खुनाचा बदला घेण्यासाठी त्यांनी गोळीबार केल्याची माहिती पोलिसांना दिली. सनी शंकर जाधव, सलमान उर्फ सल्या हमीद शेख, हर्षल संतोष जाधव अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी त्यांच्यबरोबर असलेल्या सात ते आठ साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

आरोपींनी केलेल्या गोळीबारात पवन सतीश गवळी (वय २८, रा. बिबवेवाडी ओटा परिसर) जखमी झाला असून, त्याच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पवन आणि साथीदारांनी २०२१ मध्ये वैमनस्यातून सराइत माधव वाघाटे याचा खून केला होता. खून प्रकरणात दोन महिन्यांपूर्वी त्याला न्यायालयाने जामीन मंजूर केला.

सोमवारी दुपारी पावणेदोनच्या सुमारास दुचाकीस्वार पवन बिबवेवाडी भागातून निगाला होता. आरोपी सनी,सलमान, हर्षल आणि त्यांच्याबरोबर असलेल्या सात ते आठ साथीदारांनी दुचाकीस्वार पवनला अडविण्याचा प्रयत्न केला. त्याच्यार पिस्तुलातून गोळीबार केला.

# मिसिंग लिंक’साठी राज्य शासनाने निधी द्यावा : चंद्रकांतदादा

**निर्देश**

**‘कोथरुड विधानसभा मतदार संघात १५ मिसिंग लिंक आहेत. या लिंक जोडण्यासाठी सर्वसाधारण ३७३ कोटी रुपये लागणार आहेत. या मिसिंग लिंकची कामे तातडीने व्हावीत, यासाठी यातील निम्मे पैसे राज्य सरकारने द्यावेत, अशी मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे करणार आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील वाहतुकीची कोंडी सुटण्यासाठी ‘मिसिंग लिंक’ जोडावी लागणार असून, ८०० कोटी रुपयांची आवश्यकता आहे. त्यापैकी ५० टक्के निधी राज्य सरकारने द्यावा, यासाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे कोथरुडचे आमदार आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.



कोथरूड विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न आणि शहरातील रस्त्याच्या मिसिंग लिंक संदर्भात चंद्रकांत पाटील यांनी महापालिकेत बैठक घेतली. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील, महापालिका अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., पथ विभागाचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर यांच्यासह महापालिकेचे विविध विभागांचे प्रमुख, अधिकारी तसेच भाजपचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना पाटील म्हणाले, ‘शहरात वाहतुकीचा प्रश्न गंभीर होत असून, वाहनांच्या संख्येतही वाढ होत आहे. यासाठी अर्धवट राहिलेल्या मिसिंग लिंकची कामे झाल्यास वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे. त्यासाठी आवश्यक असलेला निधी महापालिकेला द्यावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे.

‘नागरिक सार्वजनिक वाहतुकीचा वापर करत नाहीत. अनेक भागात रस्ते रुंदीकरणासाठी आवश्यक असलेली जागा संबंधित मालक महापालिकेला देत नाहीत. यामुळे अनेक मिसिंग लिंक तयार झाल्या आहेत. जागा मालकाला टिडीआर, एफएसआय नाही तर रोख मोबदला हवा आहे. प्रत्येकालाच रोख मोबदला द्यायचा झाल्यास महापालिकेला ते शक्य नाही. महाप्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार शहरात ३१ मिसिंग लिंक अशा आहेत, त्या पूर्ण केल्या तर शहरातील अनेक भागांतील वाहतुकीचा प्रश्न सुटेल. या मिसिंग लिंकसाठी सर्वसाधारण ८०० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे.’ असेही पाटील म्हणाले.

‘कोथरुड विधानसभा मतदार संघात १५ मिसिंग लिंक आहेत. या लिंक जोडण्यासाठी सर्वसाधारण ३७३ कोटी रुपये लागणार आहेत. या मिसिंग लिंकची कामे तातडीने व्हावीत, यासाठी यातील निम्मे पैसे राज्य सरकारने द्यावेत, अशी मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे करणार आहे. महापालिकेचा अर्थसंकल्प तयार करताना महापालिका प्रशासनाने देखील शहरातील मिसिंग लिंक जोडण्यासाठी ५०० कोटींची तरतूद करावी.

# 'सीओईपी' विद्यार्थ्यांनी साकारले लाँचर

## 'इस्रो'तील शास्त्रज्ञांनी केले कौतुक; अंतराळातील हवामानाचा अंदाजही वर्तविणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अंतराळात उपग्रह उडविण्यासाठी जे रॉकेट लाँचर लागते, अगदी तसेच रॉकेट लाँचर पुण्यातील सीओईपी या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तयार करून दाखवले आहे. दुसऱ्या टप्प्यात ते अंतराळातील हवामानासह इतरही अंदाज वर्तवणार आहेत.

महाविद्यालयात शिकताना अभ्यासक्रमाच्या बाहेरचा विचार करीत विद्यार्थ्यांनी अत्यंत कमी खर्चात स्वयंप्रेरणेने हा उपक्रम हाती घेतला अन् तो यशस्वी करून दाखवला आहे. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे या महाविद्यालयातील सर्व शाखेच्या विद्यार्थ्यांनी संघटन कौशल्य दाखवत हे रॉकेट लांचर केले. त्यामुळे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेतून आलेल्या शास्त्रज्ञांनी त्यांचे कौतुक करीत प्रोत्साहन दिले आहे.

**'इस्रो'च्या शास्त्रज्ञांकडून कौतुक :**

दोन दिवसांपूर्वी सीओईपी महाविद्यालयात 'इस्रो'ची स्पेस ऑन व्हील्स ही व्हॅन आली होती. त्यावेळी त्या शास्त्रज्ञांनी हा रॉकेट लाँचरचा प्रयोग पाहिला अन् विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी

डॉ. प्रकाश चव्हाण,डायरेक्टर एन.आर एस सी. हैदराबाद, नॅशनल ऑर्गनायझेशन सेक्रेटरी डॉ. शिवकुमार शर्मा, एम एस ए, एन आर एस सीचे डेप्युटी डायरेक्टर डॉ. एन अपर्ना, विभाचे जनरल सेक्रेटरी विवेकानंद पै,विक्रम साराभाई स्पेस सेंटरचे डॉ. पंकज प्रियदर्शनी हे याप्रसंगी उपस्थित होते.





### कसे आहे रॉकेट लाँचर:

● अवघ्या पंधरा ते वीस हजार रुपयांत विद्यार्थ्यांनी हे किट लाँचर साकारले आहे. साडेतीन फूट उंचीचे हे रॉकेट जाड पुठ्याच्या मटेरियलपासून तयार केले. ते सध्या ६०० मीटर उंचीवर जाऊ शकते. त्याच्या सर्व ट्रायल यशस्वी झाल्या आहेत. त्यात जे मशिन वापरले आहे, ते खूप वेगळे आहे. यात साखरेच्या डेरिव्हेटिव्ह पासून तयार केलेले इंधन वापरले आहे.

### इग्निस व्ही - १ लाँचर:

● या रॉकेट लांचरला विद्याथ्र्यांनी 'इमिस व्ही-१' असे नाव दिले आहे. यात काळ्या रंगाचे लाँचर, छोटेसे ॲल्युमिनियमचे मशिन, लोखंडी स्टॅन्ड, इलेक्ट्रॉनिक सर्किट विद्यार्थ्यांनी अगदी कमी खर्चात म्हणजे अवघ्या पंधरा ते वीस हजार रुपयांत तयार केले. १९ जानेवारी २०२४ ला सुरुवात केली अन् वर्षभरात जानेवारी २०२५ मध्ये प्रयोग यशस्वी केला.

### दोन टप्प्यांचा उपक्रम :

● हा उपक्रम दोन टप्प्यांचा आहे. पहिल्या विद्यार्थ्याच्या टीमने रॉकेट अवकाशात उडविण्याची तयारी केली. त्यात एक पॅराशूट असून, ते उंचावर जाताच रकिटमधून बाहेर आल्यावर त्याला स्थिर करण्याचे काम दुसऱ्या टप्प्यांतील टीमचे विद्यार्थी करणार आहेत. यातील यंत्रणा अवकाशातील हवामानासह इतर निरीक्षणे नोंदवणार आहे.

> महाविद्यालयीन स्तरावर रॉकेट लाँचर तयार करण्याचा हा राज्यातील पहिलाच प्रयोग आहे. यापूर्वी २०१६ मध्ये सिव्हिल शाखेच्या विद्यार्थ्यांनी 'इस्रो' साठी उपग्रह तयार केला होता, यात दोन टप्पे आहेत. हा पहिला टप्पा पूर्ण झाला. मुलांनी अभ्यासक्रमात नसतानाही हा उपक्रम केला.
> **— प्रा. बी. जे. बिराजदार,** सीओईपी, महाविद्यालय, पुणे

> आम्ही सुमारे वीस ते पंचवीस विद्यार्थी या उपक्रमात आहोत. रॉकेटचे सर्व भाग महाविद्यालयातील कार्यशाळेतच स्वतः विद्यार्थ्यांनी तयार केले. बाहेर याचा खर्च किमान दोन-तीन लाख इतका आला असता; मात्र आम्ही खूप कमी खर्चात ते वर्षभरात मेहनत करून तयार केले.
> **— स्वरूप शेळके,** बी.ई. इलेक्ट्रिकल

## At a Glance

### टीईटी अंतरिम निकाल परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध




**पुणे :** टीईटी परीक्षा राज्यात १० नोव्हेंबरला राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर झाली. या परीक्षेसाठी (पेपर १ आणि पेपर २) राज्यातील एकूण तीन लाख ५३ हजार उमेदवारांनी नोंदणी केली होती. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेचा (टीईटी) अंतरिम निकाल परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना त्यांचा निकाल वेबसाइटवर पाहता येणार आहे.

या निकालाच्या अनुषंगाने गुणपडताळणी करायची असल्यास किंवा निकालाबाबत काही आक्षेप असल्यास, ते विद्यार्थ्यांना त्यांच्या खात्यामधून सहा फेब्रुवारीपर्यंत नोंदवता येणार आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात आल्यास, त्यांनीही आपले म्हणणे सहा फेब्रुवारीपर्यंत mahatet24msce@gmail.com या ईमेलवर पाठवावे. त्यानंतर आलेल्या निवेदनांचा विचार करण्यात येणार नसल्याचे परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी सांगितले. ही प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर, टीईटीचा अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल, असे सांगण्यात आले आहे.

# संस्थांचे पाठबळ वाढविण्यासाठी प्रयत्न

## -नंदकिशोर राठी



तारांचद रामनाथ सेवा ट्रस्टतर्फे विविध सामाजिक प्रश्नांवर कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांचे सक्षमीकरण करण्यासाठी 'तारा आत्मनिर्भर ग्रान्ट' हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

सामाजिक

**पुणे :** समाजात अनेक समस्या असून समाजातील अनेक स्वयंसेवी संस्था तनमनाने या समस्या सोडविण्यासाठी काम करीत असतात. 'तारा आत्मनिर्भर ग्रान्ट' या उपक्रमाच्या माध्यमातून या संस्थांचे पाठबळ वाढविण्याचे काम आम्ही करीत असून हा उपक्रम म्हणजे भारत समजून घेण्याचा प्रयत्न आहे, असे मत तारांचद रामनाथ सेवा ट्रस्टचे विश्वस्त नंदकिशोर राठी यांनी व्यक्त केले.

पुणे येथील तारांचद रामनाथ सेवा ट्रस्टतर्फे विविध सामाजिक प्रश्नांवर कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांचे सक्षमीकरण करण्यासाठी 'तारा आत्मनिर्भर ग्रान्ट' हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. याअंतर्गत सामाजिक संस्थांना तारांचद रामनाथ सेवा ट्रस्टचे विश्वस्त नंदकिशोर राठी यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले आणि त्यांच्यासाठी उभारण्यात आलेला निधी प्रदान करण्यात आला, त्यावेळी राठी बोलत होते.

यावेळी तारांचद रामनाथ सेवा ट्रस्टचे विश्वस्त रतन राठी आणि सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी समता एक्शन फॉर इम्पॅक्टच्या दीपाली क्षीरसागर, बैठक फौंडेशनचे मंदार करंजकर, प्रा फौंडेशनच्या डॉ. प्राजक्ता बोराडे-कोळपकर, सुमंत्रा सायकोलॉजीकल सेंटरच्या विनया भोसेकर, बदलाव फौंडेशनच्या राधिका धींग्रा, डॉ.अंजली मॉरीस फौंडेशनच्या स्वप्ना दमेरला, न्यासच्या श्रध्दा कदम यांना सन्मानित करण्यात आले.

राठी म्हणाले की, आपण केवळ धनरूपी मदत करून या संस्थाच्या कार्याला हातभार लावत असतो. अनेक सामाजिक संस्था या समाजाप्रती संवेदनशीलता बाळगणाऱ्या व्यक्तींनी स्थापन केलेल्या आहेत. बरचेदा स्वतःच्या समस्येतून देखील अनेक व्यक्तींनी सामाजिक कार्याची वाट निवडलेली दिसते. त्यामुळे या व्यक्तींना समस्येची जाणीव अगदी मुळापासून असते आणि ती समस्या सोडविण्यासाठी ते योग्य दिशेने प्रयत्न देखील करतात.

# विवाहपूर्व समुपदेशनाची आज मोठ्या प्रमाणात गरज : विजया रहाटकर यांचे मत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रीय महिला आयोगाकडे ज्या तक्रारी येतात त्यात ४० ते ५० टक्के तक्रारी कौटुंबिक तक्रारी, पती-पत्नी मधील भांडणे हिंसा अशा असतात. पोलिस त्यांना शक्य तितक्या तक्रारी सोडवण्याचा प्रयत्न करतात परंतु त्यांच्यावर देखील खूप ताण असतो. या गोष्टी नियंत्रणात आणण्यासाठी विवाहाच्या आधी समुपदेशन गरजेचे आहे. कुटुंब आणि लग्न संस्था हा भारतीय संस्कृतीचा पाया आहे. आज कुटुंब व्यवस्था तुटत आहे. भारतीयतेचा विचार, विवाहाची कल्पना पती पत्नीच्या भांडणामुळे तुटत आहे. हे सांभाळून मजबूत करणे आज गरजेचे आहे. त्यामुळे विवाह पूर्व समुपदेशनाची मोठ्या प्रमाणात आज गरज आहे, असे मत राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केले.



राष्ट्रीय महिला आयोग आणि आम्ही पुणेकर यांच्या वतीने विवाहपूर्व समुपदेशन आणि शिक्षणावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन आपटे रस्त्यावरील हॉटेल रामी ग्रँड येथे करण्यात आले होते. मद्रास उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश व्हिक्टोरिया गौरी, आम्ही पुणेकर संस्थेचे अध्यक्ष हेमंत जाधव यावेळी उपस्थित होत्या. देशभरातील वकील, न्यायाधीश, स्वयंसेवी संस्था आणि समुपदेशक परिषदेत सहभागी झाले होते.

विवाहासाठी भावनिक आणि आर्थिक तयारी, संवाद कौशल्ये आणि मतभेद सोडवण्याच्या पद्धती, गृहहिंसेविरोधी कायदेशीर अधिकार आणि संरक्षण, शैक्षणिक संस्थांमध्ये विवाहपूर्व समुपदेशनाचा समावेश या विषयावर परिषदेत चर्चा करण्यात आली.

व्हिक्टोरीया गौरी म्हणाल्या, आपली संयुक्त कुटुंब प्रणाली जवळपास नष्ट झाली आहे. ते टिकविण्यासाठी विवाहपूर्व समुपदेशन आवश्यक आहे. विवाह जीवनातील गुंतागुंतीचा सामना करण्यासाठी, जोडप्यांमध्ये मोकळा संवाद, भावनिक गरज आणि नाते संबंध सन्मानपूर्वक सुदृढपणे टिकवण्यासाठी समुपदेशनाची गरज आहे. विवाह ही एक सुंदर संस्था आहे. विवाहपूर्व समुपदेशन हा प्रतिबंधात्मक उपाय नाही, तर वैयक्तिक वाढीसाठी, निरोगी संवादाला चालना देणारा आणि जोडप्यांमधील बंध मजबूत करणारा एक विधायक मार्ग आहे.

# कर्करोग विरोधातील लढ्यात योगदान देणाऱ्या संस्थांचा गौरव

## प्रो लाईफ कॅन्सर सेंटर आणि रिसर्च इन्स्टिट्यूटचा उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कर्करोगाविरोधातील लढ्यात मोलाचे योगदान देत असंख्य रुग्णांना नवजीवन देण्याचे कार्य करणाऱ्या संस्थांना पुण्यातील प्रो लाईफ कॅन्सर सेंटर आणि रिसर्च इन्स्टिट्यूट कडून एका विशेष कार्यक्रमात गौरविण्यात आले. जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून मंगळवारी या गौरव समारंभाचे आयोजन करणात आले होते.

प्रो लाईफ कॅन्सर सेंटर आणि रिसर्च इन्स्टीट्यूटचे प्रमुख डॉ. सुमित शहा यांच्या हस्ते या




संस्थाचालकांना स्मृतीचिन्ह आणि मानपत्र देवून गौरविण्यात आले. गौरव करण्यात आलेल्या संस्थांमध्ये कॅन्सर पेशंट एड असोसिएशनच्या श्रीमती सप्रू मॅडम, नाग फाऊंडेशनचे डॉ. इनामदार, मुकुल माधव फाऊंडेशनचे जितेंद्र जाधव, जगेश रोकडे , केअर इंडिया मेडिकल सोसायटीच्या श्रीमती तस्लिमा मॅडम, हेल्पिंग हँड संस्थेच्या शैला नाईक , मुदिता - ॲन अलायन्स फॉर गिव्हिंग संस्थेचे माधव चव्हाण यांचा या गौरवमूर्तीमध्ये समावेश आहे.

या संस्था आणि संस्थाचालकांनी कॅन्सर विरोधातील लढाईमध्ये अमूल्य योगदान देत असंख्य रुग्णांना नवजीवन देण्याचे काम केले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करण्याची संधी आम्हाला मिळली याबद्दल प्रो लाईफ कॅन्सर सेंटर आणि रिसर्च इन्स्टिट्यूट स्वतःला धन्य समजते अशा भावना डॉ. सुमित शहा यांनी यावेळेस व्यक्त केल्या.

# समाज स्त्रीकडे निकोप दृष्टीने बघत नाही -डॉ.मीनाक्षी पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्त्री कोणतीही असो, कोणत्याही जाती धर्माची किंवा कोणत्याही पदावर काम करणारी असो. पण त्या स्त्रीला स्वतःच्या निकषांवर व्यक्त होऊ दिले जात नाही. स्त्रीने कसे व्यक्त व्हावे, हे समाजच ठरवत असतो कारण समाज स्त्रीकडे निकोप दृष्टीने बघत नाही, असे मत ज्येष्ठ कवयित्री, समीक्षक, चित्रकार आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या सचिव डॉ. मीनाक्षी पाटील यांनी व्यक्त केले.

साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे ज्येष्ठ कवयित्री योगिनी जोगळेकर यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा 'काव्ययोगिनी' पुरस्कार ज्येष्ठ कवयित्री, समीक्षक, चित्रकार आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या सचिव डॉ. मीनाक्षी पाटील यांना ज्येष्ठ कवी, अनुवादक आणि समीक्षक डॉ. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते आज प्रदान करण्यात आला. यानिमित्त ज्येष्ठ लेखक कै. ना.ह. आपटे आणि सरस्वतीबाई आपटे यांच्या स्मरणार्थ डॉ. मीनाक्षी पाटील यांची प्रकट मुलाखत झाली, त्यावेळी डॉ.मीनाक्षी पाटील बोलत होत्या. यावेळी त्यांच्याशी मराठी भाषा आणि साहित्याच्या अभ्यासक डॉ. सरिता सोमाणी यांनी संवाद साधला.



महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी व्यासपीठावर साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या विश्वस्त मंदा खांडगे, अध्यक्ष अंजली कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

रोख रक्कम आणि मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. मीनाक्षी पाटील यांनी पुरस्काराची रक्कम साहित्यप्रेमी भगिनी मंडळाला देणगी म्हणून दिली. यावेळी योगिनी जोगळेकर यांच्या भाची उर्मिला भांबुरकर यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. पाटील म्हणाल्या की, मी स्वतःसाठी लिहिते, इतरांसाठी नाही. पण माझा अनुभव असा आहे की, आपण जेव्हा स्वतःसाठी लिहितो तेव्हा ते आपसुकपणे सार्वत्रिक होत असते. आपला भोवताल टाळून आपण पुढे जाऊ शकत नाही. स्त्री आणि पुरुष या दोनच जाती मानल्या तर परस्परांना पूरक ठरतील, अशा या दोन जाती एकमेकांशी सहृदयतेने वागत आणि बोलत नाही,

यावेळी बोलताना डॉ. चंद्रकांत पाटील म्हणाले की, आधुनिकतेने जे नाकारले ते मीनाक्षी पाटील यांच्या कवितेत प्रतिबिंबीत होते. सध्याच्या काळातील अनेकांच्या कविता ग्रंथोपजीवी आहेत, त्या आतून आलेल्या नाहीत.पण मीनाक्षी पाटील यांची कविता याला अपवाद आहे.

# 'पीएमआरडीए'च्या हद्दीत सहा बीआरटी मार्ग बांधणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्याच्या वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी पुढील ३० वर्षांसाठीच्या एकात्मिक वाहतूक आराखडा जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सादर करण्यात आला. दरम्यान २०,५५० चौरस मीटर एवढ्या क्षेत्रासाठी हा आराखडा तयार करण्यात आला असून, पुढील ३० वर्षांत पीएमआरडीएच्या हद्दीत सहा नवीन बीआरटी मार्गचे जाळे नियोजित आहे.

पीएमपीची वाहतूक जलद व्हावी, यासाठी आठ बीआरटी मार्ग बांधण्यात आले. परंतु, वाहतूककोंडीमुळे पुण्यातील बीआरटी मार्ग काढण्यात आले, तर पिंपरी-चिंचवडमध्ये बीआरटी सुसाट आहे. आता पीएमआरडीएच्या हद्दीत सहा



बीआरटी मार्ग बांधण्याचे नियोजित करण्यात आले. यामुळे वाहतूक सुसाट होण्यापेक्षा कोंडीमुळे मंदावण्याची शक्यता आहे. त्यामुळे महामार्गावर बीआरटी बांधले तरी धावेल का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

यामध्ये रावेत ते राजगुरूनगर, गवळी माथा चौक ते शेवाळेवाडी, रावेत ते तळेगाव दाभाडे, चांदणी चौक ते हिंजवडी या ११७ किमी मार्गाबरोबर लोणी काळभोर ते केडगाव, भूमकर चौक ते चिंचवड चौक या ४६ किमी मार्गाचा समावेश आहे. या सहा नवीन बीआरटी मार्गामुळे पीएमपआरडीच्या हद्दीत वाहतुकीचा वेग वाढेल, असा निष्कर्ष काढण्यात आले आहे. सध्याची महामार्गाची अवस्था पाहता कोणत्याही ठिकाणी मुबलक जागा नाही. त्यामुळे आहे त्या मार्गावर रस्ता अरुंद पडत असून, वाहतूककोंडी होत आहे. त्यामध्ये आता बीआरटी बांधले, तर पुन्हा रस्ते अरुंद होऊन वाहतूक सुलभ न होता, कोंडीची शक्यता जास्त आहे.

पीएमपीकडून नागरिकांच्या सोयीसाठी पीएमआरडीएच्या हद्दीत प्रवासी सेवा देण्यात येते, परंतु या ठिकाणी अनेक वेळा पीएमपीच्या गाड्या रिकामे धावतात. त्यामुळे उत्पन्नात घट होते. त्याचा फटका पीएमपीला बसतो. शिवाय पीएमआरडीएकडून संचलनापोटी पीएमपीला आर्थिक मदत करताना हात आखडले जाते. संचलनापोटी देण्यात येणारे रक्कमही वेळेवर मिळत नाही. शिवाय नाशिक, मुंबई, नगर आणि सोलापूर महामार्ग रस्ता अपुरा ठरत आहे. त्या बीआरटी बांधल्यावर पुन्ही महामार्गाची रुंदी कमी होणार आहे. त्यामुळे पीएमआरडीएच्या हद्दीत बीआरटी बांधून कोणाचा फायदा होणार आहे, याचा विचार करणे गरजेचे आहे.

# मेट्रोने मागितली पोलिसांकडे जागा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

गुन्हे

**पुणे :** पुणे मेट्रो रेल प्रकल्पाच्या बालाजीनगर मेट्रो थांब्यासाठी मेट्रोने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या जागेची मागणी केली आहे. त्यांनी तसे पत्र पोलीस ठाण्याला पाठवले आहे. मात्र, मेट्रोने मागीतल्यानूसार जाग दिल्यास पोलीस ठाण्याचा ६० टक्के भाग द्यावा लागणार आहे. यामुळे पोलीस ठाण्याचे पूर्णकामकाज ठप्प होणार आहे. यामुळे भारती विद्यापीठ पोलिसांनी मेट्रोला पाच हजार चौरस फुट बांधकाम असलेली सुसज्ज इमारतीची मागणी केली आहे. किंवा पर्यायी जागा उपलब्ध होईपर्यंत जागा ताब्यात घेऊ नये, अशी विनंती केली आहे.

स्वारगेट ते कात्रज या मेट्रोच्या भुयारी मार्गीकिच्या विस्तारास केंद्र व राज्य सरकारने मान्यता दिली आहे. या मार्गातील बालाजीनगर स्थानकाच्या प्रवेश आणि बाहेर जाण्याच्या मार्गाकरीता मेट्रोला पोलीस ठाण्याची १४.०७ चौरस मीटर जागा कायमस्वरुपी, ७६.७०७ चौरस मीटर तात्पुरत्या स्वरुपात आणि ३९.५४१ चौरस मीटर जागा जमिनीखालील कामाकरिता कायमस्वरुपी मिळण्याची मागणी केली आहे.

पोलीस ठाण्याची इमारत भारती विद्यापीठ शैक्षणीक संस्थेच्या मालकी हक्काच्या जागेवर प्रतीवर्ष एक रुपया भाड्याने घेण्यात आली.

# नागरिकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करा -रुपाली चाकणकर

### आदेश

**'लाडकी बहीण' योजनेवर विरोधकांनी टीका केली असली, तरी २.५ कोटी महिलांना याचा थेट लाभ मिळाल्याचा दावा चाकणकर यांनी केला. "विरोधकांनी ही योजना चुकीच्या पद्धतीने सादर केली आणि अनेकांनी चुकीचे फॉर्म भरले. त्यामुळे पडताळणी केली जात आहे. मात्र, पडताळणी म्हणजे योजना बंद करणे नव्हे, तर गरजू महिलांपर्यंतच लाभ पोहोचावा, यासाठी हा निर्णय आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्या पाण्यात क्लोरीन मिसळून त्याचा पुरवठा केला जात आहे. मात्र, हा उपाय कायमस्वरूपी नाही. नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित पाणी मिळाले पाहिजे, यासाठी महापालिकेने ठोस पावले उचलावीत," अशी मागणी महिला आयोग राष्ट्रीय अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी केली.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी पुणे महापालिका आयुक्तांची भेट घेतली. या भेटीत धायरी परिसरातील वाहतूक कोंडी, दूषित पाणीपुरवठा आणि



अतिक्रमण या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. दूषित पाण्यामुळे (जीबीएस) या आजाराचा प्रादुर्भाव वाढत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या असून, त्यावर उपाययोजना करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी, "दूषित पाण्यामुळे जीबीएस झाल्याचे ठोस पुरावे नाहीत, मात्र नागरिकांना शुद्ध आणि स्वच्छ पाणी मिळावे यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत.धायरी परिसरातील वाहतूक कोंडी हा मोठा प्रश्न

> **धायरी परिसरातील दूषित पाणीपुरवठ्यामुळे आरोग्यविषयक समस्या वाढत आहे. जीबीएस आणि इतर आजारांमध्ये वाढ होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, पाणीपुरवठा सुधारण्यासाठी तातडीने पावले उचललावी—रुपाली चाकणकर**

बनला आहे. शहराच्या झपाट्याने होणाऱ्या विस्तारामुळे रस्त्यांवरील ताण वाढला आहे. याबाबत बोलताना चाकणकर म्हणाल्या, "वाहतुकीची सुधारणा करण्यासाठी महापालिकेने योग्य नियोजन करावे. रस्ते रुंदीकरण आणि सार्वजनिक वाहतुकीच्या सुधारणा तातडीने व्हाव्यात."तसेच, धायरी परिसरातील अतिक्रमणाच्या समस्येवरही त्यांनी महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले. "महापालिकेने अतिक्रमण हटवण्यासाठी कठोर पावले उचलावीत आणि सार्वजनिक जागा मोकळ्या कराव्यात," अशी मागणी त्यांनी केली.

पुणे महापालिकेत सध्या लोकप्रतिनिधी नाहीत, त्यामुळे प्रशासनच सर्व विकासकामे पाहत आहे. या पार्श्वभूमीवर समाविष्ट गावांना आवश्यक सुविधा मिळाल्या पाहिजेत, अशी मागणी चाकणकर यांनी केली.

» Selected

## सीएमएस शाळेत विज्ञान प्रदर्शन



**पिंपरी :** निगडी येथील चिंचवड मल्याळी समाजम संचलित सी एम एस हायस्कूल आयोजित विज्ञान प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राष्ट्रीय आपत्ती निवारण प्राधिकरणाचे संस्थापक सदस्य प्रा.एन विनोदचंद्र मेनन यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सीएमएस हायस्कूलचे टी पी विजयन, सरचिटणीस सुधीर सी. नायर, खजिनदार पी. अजयकुमार, उपाध्यक्ष पी. श्रीनिवासन, जॉय जोसेफ, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका बीजी गोप कुमार, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका चैताली लोंढे आणि शिक्षक, पालक, शिक्षिकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.यावेळी शाळेमध्ये विविध प्रकारचे वैज्ञानिक प्रकल्प मांडण्यात आले होते.

## कांस्यपदक विजेता पृथ्वीराज विनोदे यांचा झाला सन्मान



**चिंचवड :** वाकड येथील कु. पृथ्वीराज प्रशांत विनोदे याने लेह-लडाख येथे संपन्न झालेल्या खेलो इंडिया विंटर गेम्स 2025 मध्ये 500 मीटर आईस स्केटिंग लॉंग ट्रॅक प्रकारात कांस्य पदक मिळवून पिंपरी-चिंचवड शहराचा नावलौकिक उंचावला आहे. पृथ्वीराज विनोदे याने केलेल्या या दैदिप्यमान कामगिरीबद्दल चिंचवड येथील श्री स्वामी समर्थ सेवा ट्रस्टच्या वतीने, ट्रस्टचे अध्यक्ष गजाननभाऊ चिंचवडे आणि शुभम चिंचवडे यांच्या शुभहस्ते यथोचित सन्मान करण्यात आला.

पृथ्वीराज याला कठोर परिश्रम, जिद्द आणि मेहनतीमुळे हे यश मिळालं आहे, या ऐतिहासिक यशासाठी मनःपूर्वक अभिनंदन..! आणि पुढील वाटचालीसाठी ट्रस्टच्या वतीने शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या.

## निवृत्ती महाराज देशमुख यांचे कीर्तन



**तळेगाव दाभाडे :** येथील सेवाधाम ट्रस्ट ग्रंथालय व मोफत वाचनालयाच्या वतीने येत्या ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ८ वाजता कल्याणराव उर्फ रामचंद्र जाधव यांच्या स्मरणार्थ जगद्गुरु संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज लोकसंवाद व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असून, यंदा समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांचे कीर्तन होणार आहे. व्याख्यानमालेचे हे २३ वे वर्ष आहे. हे कीर्तन सेवाधाम ट्रस्ट ग्रंथालयाच्या शेजारी, नाना भालेराव कॉलनी, तळेगाव दाभाडे (स्टेशन) येथे होणार आहे. सावा हेल्थकेअरचे चेअरमन विनोद रामचंद्र जाधव हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, तर वडगाव मावळ पंचायत समितीचे माजी सभापती गणेश ढोरे अध्यक्षस्थानी असणार आहेत. श्रोत्यांनी व्याख्यानमालेस उपस्थित राहण्याचे आवाहन ग्रंथालयाचे अध्यक्ष सुरेश धोत्रे व सचिव डॉ. वर्षा वाढोकर यांनी केले आहे. आमदार सुनील शेळके यांचा मावळ विधानसभा मतदारसंघात सलग दुसऱ्यांदा विक्रमी मताधिक्याने विजय झाल्याबद्दल सेवाधाम ट्रस्ट ग्रंथालय व मोफत वाचनालयाच्या वतीने भव्य नागरी सत्कार करण्यात येणार आहे.

# शहराला स्वच्छ व सुशोभित ठेवा!

## सचिन पवार: आरोग्य कर्मचाऱ्यांची भूमिका ठरणार महत्वाची

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी:** पिंपरी चिंचवड शहराला स्वच्छ व सुशोभित ठेवण्यामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांची भूमिका महत्वाची असून स्वच्छतेचे काम करताना सफाई मित्रांनी उपयुक्त साधने व उपकरणे वापरणे आवश्यक आहे. महापालिकेच्या वतीने देण्यात येणारे क्षमता बांधणी प्रशिक्षण कर्मचाऱ्यांनी आत्मसात करून त्याचा दैनंदिन कामामध्ये अवलंब करणे देखील गरजेचे आहे, असे मत उप आयुक्त सचिन पवार यांनी व्यक्त केले. पिंपरी चिंचवड शहरामध्ये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ होणार आहे. या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रम हाती घेण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने अ आणि ब क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत कार्यरत असलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांना आरोग्य व सुरक्षेबाबत प्रशिक्षण देण्यासाठी आचार्य अत्रे रंगमंदिर, संत तुकारामनगर येथे स्वच्छता क्षमता बांधणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, मुख्य आरोग्य निरीक्षक श्रीराम गायकवाड, सहाय्यक आरोग्य अधिकारी सुधीर वाघमारे, राजू साबळे, मुख्य आरोग्य निरीक्षक भूषण शिंदे, दत्तात्रय गणगे, आरोग्य निरीक्षक रुपाली साळवे, संतोषी कदम, वैभव केचन गौडार, मुकेश जगताप, विकास शिंदे, लक्ष्मण साळवे, स्नेहा चांदणे यांच्यासह आरोग्य सहाय्यक, आरोग्य मुकादम महापालिकेच्या अ, ब क्षेत्रीय कार्यालयांमधील सफाई कर्मचारी उपस्थित होते.

उप आयुक्त सचिन पवार म्हणाले, आरोग्य निरीक्षक व सफाई मित्र यांनी स्वच्छता करताना सुरक्षा साधनांचा वापर करावा. आरोग्याच्या चांगल्या सवयींचा अंगीकार करावा, आरोग्याची वेळोवेळी तपासणी करावी असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी स्वच्छ सर्वेक्षण २०२४ ची माहिती दिली आणि कामकाज चांगल्या प्रकारे व वेळेत कसे पूर्ण करावे याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले.

'कॅम फाऊंडेशन' यांच्याकडून क्षेत्रीय कार्यालय अ, ब मधील मनपा, ठेकेदार व कंत्राटी सफाई कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले तसेच सफाई कर्मचाऱ्यांना पीपीई कीटचा वापर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी स्वच्छ भारत अभियान "क्षमता बांधणी, कौशल्य विकास व ज्ञान व्यवस्थापन यावर मार्गदर्शन करण्यात आले.

आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे यांनी कार्यक्रमांचे प्रस्ताविक करताना कर्मचाऱ्यांना कचरा वर्गीकरण करताना सुरक्षा साधनाचा वापर कसा करावा याबद्दल मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे अजून एक वैशिष्टय म्हणचे संपूर्ण कार्यक्रम झिरो वेस्ट पद्धतीने करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास गायकांबळे यांनी केले.

या प्रशिक्षणाच्या सत्रात कॅम फाउंडेशनच्या राहुल सोनावणे यांनी घनकचरा व्यवस्थापन कायदा २०१६ विषयी मार्गदर्शन केले. तसेच घन कचरा व्यवस्थापन कसे करावे या विषयी माहिती दिली. या सत्रात अ, ब क्षेत्रीय कार्यालयातील सफाई कर्मचारी व घरोघरचा कचरा संकलन करणा-या वाहनांवरील कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यात आले.

## अनोळखी इसमाचा धारदार शस्त्राने खून

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** धारदार शस्त्राने वार करून एका अनोळखी व्यक्तीचा खून करण्यात आला. ही घटना पाटीलनगर, चिखली येथे उघडकीस आली. त्यामुळं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पोलीस उपनिरीक्षक सागर सुभाष देवकर (वय ३५) यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत व्यक्तीचे वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे असून तो अंगाने सडपातळ, अंगात चॉकलेटी रंगाचा शर्ट, राखाडी रंगाची पॅन्ट, छातीवर धनश्री असे मराठीत गोंदलेले आहे. अज्ञात आरोपीने त्याच्या डोक्यात व मानेवर धारदार शस्त्राने वार करुन त्याचा खुन केला. तसेच मयताची ओळख पटु नये म्हणून त्याचा चेहरा, डोके कशाच्या तरी सहाय्याने विद्रुप करुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

# धार्मिक ऐक्य हेच संस्कृतीचे वैभव!

## डॉ. श्रीपाल सबनीस ;'समग्र बाबा भारती' या ग्रंथाचे प्रकाशन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** 'धार्मिक ऐक्य हेच संस्कृतीचे वैभव असते!' असे विचार ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी माधवराव पटवर्धन सभागृह, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, येथे व्यक्त केले. पाली - मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या जन्मशताब्दीनिमित्त लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान, पिंपरी आयोजित वार्षिक शब्दोत्सव उपक्रमांतर्गत 'समग्र बाबा भारती' या ग्रंथाचे प्रकाशन करताना डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते. ज्येष्ठ बौद्ध विचारवंत प्रा. दि. वा. बागूल अध्यक्षस्थानी होते; तर प्रा. डॉ. प्रकाश पगारिया, रजनी कानडे, अनिल सोनवणे, प्राचार्य डॉ. संभाजी मलघे आणि बाबा भारती प्रतिष्ठान - पिंपरीचे अध्यक्ष महेंद्र भारती यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. श्रीपाल सबनीस पुढे म्हणाले की, 'कोणताही धर्म कधीही क्रूर नसतो; परंतु त्याचा विकृत आणि द्वेषमूलक अन्वयार्थ लावणारे संकुचित विचारांचे असतात. कोणत्याही एका धर्मापेक्षा सर्व धर्मांचे संचित हे समाजासाठी कल्याणकारी आहे. विश्वकल्याणासाठी सर्व धर्मांमध्ये सुसंवाद महत्त्वाचा आहे अन् हेच तत्त्व संविधानाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब यांनी अधोरेखित केले आहे. बाबा भारती यांनी उदारमतवाद आणि मूल्यविवेक बाळगून, सर्व धर्मातील चांगुलपण स्वीकारून नेहमीच जगण्याचा अन् वागण्याचा प्रयत्न केला!' प्रा. डॉ. अशोक पगारिया यांनी, 'सामाजिक काम करणारी माणसे समाजात खूप कमी असतात; मात्र त्यांच्या कार्याची दखल घेण्याचे कार्य लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानच्या माध्यमातून केले जात आहे. महेंद्र भारती यांची ही आपल्या वडिलांप्रति खऱ्या अर्थाने आदरांजलीच आहे!' असे गौरवोद्गार काढले. प्रा. दि. वा. बागूल यांनी अध्यक्षीय मनोगतातून, 'श्रमण संस्कृती विरुद्ध ब्राह्मण संस्कृती अथवा समता विरुद्ध विषमता हा संघर्ष पाच हजार वर्षांपासून सुरू आहे. बाबा भारती यांनी आपल्या स्वतःच्या आकलनातून धम्मपदांमधून बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रचार अन् प्रसार केला. मला स्वतःला त्यांच्या पाली शब्दकोशाचा वेळोवेळी उपयोग झाला आहे!' असे मत मांडले.

# भव्य बिगर हुंडा भव्य सामूहिक विवाह सोहळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आजच्या काळात जास्तीत जास्त सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करणे समाज आणि देशाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहेत. कारण यामुळे विवाह समारंभांमध्ये होणारा खर्च मोठ्या प्रमाणात वाचतो. सामूहिक विवाह सोहळे आज समाजासाठी एक प्रेरणास्रोत बनले आहेत. या अनुषंगानेच अग्रसेन भगवान चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने दि. १५ मार्च २००५ रोजी गरीब आणि गरजू कुटुंबातील युवक-युवतींसाठी एक बिगर हुंडा सामूहिक विवाह समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यातील सुप्रसिद्ध समाजसेवक रतनलाल गोयल यांच्या ७१व्या वाढदिवसानिमित्ताने आयोजित हा विवाह सोहळा अगदी थाटात हिंदू धर्मातील रितीरिवाजानुसार तथा धार्मिक परंपरेनुसार होणार आहे. या सोहळ्यात लग्न करणाऱ्या जोडप्यांना लाखो रुपयांच्या संसारोपयोगी वस्तू दिल्या जातील. गरीब आणि गरजू विवाहेच्छुक जोडप्यांनी या सोहळ्यासाठी लवकरात लवकर मोफत नोंदणी करावी, असे आवाहन रतनलाल गोयल आणि राजेश अग्रवाल यांनी केले आहे.या समारोहासंदर्भात माहिती देताना रतनलाल गोयल आणि राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, आज आपण अशी अनेक कुटुंबे पाहतो जिथे घरात लग्न झाल्यानंतर माता-पिता हे कर्जामध्ये बुडतात. कुठल्याही माता-पित्यावर ही स्थिती येऊ नये, यासाठी सामूहिक विवाह समारोह ही आजच्या काळाची गरज बनले आहेत आणि हीच खरी मानव सेवा आहे.

# बुलेटराजांना मनसेनी शिकवला धडा..

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरात बुलेटराजांना चांगलाच धडा शिकवला आहे. बुलेटच्या सायलेन्सरमधून कर्णकर्कश आवाज काढणाऱ्यांच्या कानाखाली मनसेने आवाज काढला आहे. मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी काही तरुणांना फटकारल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला असून सर्व सामान्यांमधून याचे कौतुक होत आहे. पिंपरी चिंचवड शहरात बुलेटराजांनी हैदोस माजवला आहे. या रोडरोमिओंचा उच्छाद काही केल्या कमी होत नाहीये. मग शेवटी मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले आणि समर्थकांनी या बुलेटराजांना धडा शिकवायचं ठरवलं आहे. महाविद्यालयीन परिसरात बुलेटचे फटाके फोडणाऱ्यांना पकडून त्यांच्या कानाखाली आवाज त्यांनी काढला आहे. यावेळी त्यांच्या सोबत माजी नगरसेवक उत्तम केंदळे, सामाजिक कार्यकर्ते बापू घोलप, माऊली गवळी हे देखील उपस्थित होते.

या बुलेटराजांची मस्ती उतरवल्याने सर्व सामान्यांमधून मनसेचे कौतुक होत असलं तरी मनसेने कायदा हातात घेणं ही चुकीचं आहे. खरं तर अशा बुलेटराजांचा बंदोबस्त पोलिसांनी लावणं अपेक्षित आहे. आता अशा बुलेटराजांवर पिंपरी चिंचवड वाहतूक पोलीस योग्य ती कडक कारवाई करतील अशीच अपेक्षा आहे.

# बुद्धिरूपी प्रकाश देण्याची प्रार्थना ईश्वराकडे करा – कीर्तनकार यशोधन महाराज साखरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**देहू :** समाजात आपल्या आजूबाजूला शास्त्राप्रमाणे आणि वेदाप्रमाणे वागणारे लोक कमी झाले आहेत. शब्द ज्ञान कमी असूनही खूप मोठा ज्ञानी असल्याचे अनेकजण भासवतात. त्यामुळे बुद्धिरूपी प्रकाश देण्याची प्रार्थना ईश्वराकडे करा, असे प्रतिपादन कीर्तनकार यशोधन महाराज साखरे यांनी भंडारा डोंगर येथे केले.

श्री विठ्ठल रुखुमाई तुकाराम महाराज भंडारा डोंगर ट्रस्टच्या वतीने माघ शुद्ध दशमी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहातील कीर्तनात ते बोलत होते. वंसत पंचमी म्हणजे संत तुकाराम महाराज जन्म दिवस. या दिवसापासून भंडारा डोंगरावर येत्या १२ तारखेपर्यंत अखंड हरिनाम सप्ताह आणि किर्तन महोत्सवाचे आयोजन केले आहे. या किर्तन सोहळ्याच्या पहिल्या दिवशी यशोधन महाराज बोलत होते. तुकोबांनी आपल्या अभंगवाणीतून सन्मार्ग स्वच्छ केला. तो स्वच्छ ठेवण्याची आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे. बुद्धिरुपी प्रकाश पडू द्या. मालिन्य होवू नये अशी बुद्धी द्यावी, असे मागणे मागण्याचे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, वसंतपंचमीच्या निमित्ताने पानेगावकर महाराजांनी तुकोबारायांचा पाळणा गीत गायले. तसेच यामध्ये उत्स्फूर्तरीत्या महिला श्रोत्यांनी साथ दिली. जन्मोत्सव संपन्न झाल्यानंतर उपस्थित सर्व श्रोत्यांना सुंठवडा देण्यात आला.

श्री क्षेत्र भंडारा डोंगरावर सुरु असलेल्या 'अखंड हरीनाम सप्ताह व गाथा पारायण सोहळ्याच्या' निमित्ताने 'संत तुकोबांची हृदय स्पंदने एक अनुभूती' हा हभप डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांचा संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर आधारित चिंतनाचा कार्यक्रम या सप्ताहात आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते म्हणाले की, संत, महात्मा कुठेही जन्माला येत नाहीत. पवित्र ते कुळ पावन तो देश | तेथे हरीचे दास जन्म घेती || पावनकुळातच संत जन्माला येतात, अवतार घेतात. जगद्गुरु तुकोबारायांच्या अभंगांचा परिणाम दगडांवर देखील झाला. आजही म्हातारी माणसे या श्रीक्षेत्र भंडारा डोंगरावरती महाराजांच्या दर्शनासाठी येत असताना या डोंगराची माती आपल्या कपाळाला लावतात आणि धन्यता मानतात. संत आपल्या जीवन आचरणातून अनेक सामान्य जनांचे कल्याण करतात. संत तुकोबारायांनी आखून दिलेल्या परमार्थिक मार्गाने जीवन जगण्याची कृपा आपल्याला भाग्यानेच लाभत आहे.

## विद्यार्थ्यांचा केला सन्मान...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी:** वाहनातील प्रदूषण फटाके आणि कचरा जाळल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे.मी खूप फटाके वाजवले म्हणजे मी खूप मोठा असा समज पसरत चालला आहे. पण यामुळे वायू प्रदूषण होऊन अनेक रोग होण्याचे प्रमाण वाढले आहे.वायु प्रदूषणामुळे विविध रोग होऊन भारतात दरवर्षी 16 लाख माणसे मृत्युमुखी पावतात. यातूनच अंघोळीची गोळी या संस्थेने ऐन दिवाळीत " मी फटाके वाजवले नाही" अशी स्पर्धा घेण्यात आली होती.

# विद्यार्थ्यांची मॅप्रो कंपनीला भेट ...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी :** रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्सच्या विद्यार्थ्यांना औद्योगिक ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव मिळावा यासाठी वाई येथील मॅप्रो कंपनीच्या कारखान्यात भेट देण्यात आली. प्रा. सुप्रिया कुलकर्णी, प्रा. इश्तप्रीत कौर, प्रा. देवेंद्र देसाई, प्रा. राजेश पाटील, प्रा. प्रसाद तांबे आणि प्रा. दुर्गेश पुराणिक यांच्यासह विद्यार्थ्यांचा समावेश होता. प्राचार्या डॉ. स्मृती पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते.

मॅप्रो फूड्स या उद्योग समूहाच्या कारखान्याला भेट देत विद्यार्थ्यांनी अन्न प्रक्रिया, उत्पादन, व्यवस्थापन, विपणन आणि उद्योगाच्या विविध टप्प्यांबाबत माहिती घेतली. उत्पादन प्रक्रियेत वापरण्यात येणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान, मशीनरीचा वापर आणि गुणवत्ता नियंत्रण याविषयी माहिती मिळवली. या दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळण्यास मदत झाली. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते.

जाहीर बी-१ निविदा सुचना क्रं. १६ / २०२४ २०२५

**पंचायत समिती शिरुर ता. शिरुर जि. पुणे निविदा नोटीस**

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर यांचे तर्फे खालील कामाचे नावासमोर नमुद केलेप्रमाणे पुणे जिल्हा परिषदेकडील योग्य त्या कंत्राटदाराकडून खाली नमुद कामाच्या सीलबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविणेत येत आहेत. को- या निविदेचा नमुना ग्रामीण पाणी पुरवठा व जि.प. बांधकाम. उपविभाग शिरुर, पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर जि. पुणे या कार्यालयातून दिनांक. ५/०२/२०२५ ते दि ११/०२/२०२४ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते संध्या ५.०० वाजे पर्यंत देण्यात येतील. सीलबंद भरलेल्या निविदा मा. गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती शिरुर ता. शिरुर जि. पुणे येथे दि.१२/०२/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यंत स्विकारणेत येतील आणि शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा त्यांनतर कार्यालयीन सोईच्या दिवशी सक्षम समिती समोर उघडणेत येतील.

| क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी | कामाचा कालावधी | कंत्राटदार वर्गीकरण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1) | माळवाडी भुजबळ वस्ती ते टाकळीहाजी रस्ता तयार करणे ता. शिरुर जि. पुणे | ५०००००/- | सुट | ५९० | ३ महिने | सुशिक्षित बेरोजगार |
| २) | पंचायत समिती शिरुर कार्यालय दुरुस्ती करणे, ता. शिरुर जि. पुणे | १००००००/- | सुट | ५९० | ३ महिने | सुशिक्षित बेरोजगार |
| ३) | पंचायत समिती शिरुर कार्यालय परिसर सुशोभिकरण करणे ता. शिरुर जि. पुणे | १००००००/- | सुट | ५९० | ३ महिने | सुशिक्षित बेरोजगार |
| ४) | पंचायत समिती शिरुर कार्यालय आवारातील शौचालय दुरुस्ती करणे ता. शिरुर जि.पुणे | १००००००/- | सुट | ५९० | ३ महिने | सुशिक्षित बेरोजगार |
| ५) | पंचायत समिती शिरुर कार्यालयातील महराणी येसूबाई सभागृह पाठीमागे सुशोभिकरण करणे ता. शिरुर जि. पुणे | ५०००००/- | सुट | ५९० | ३ महिने | सुशिक्षित बेरोजगार |

**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे**
१) को-या निविदा संघासाठी अर्जा सोबत उपरोक्त कामाचे नावासमोर नमुद केले प्रमाणे योग्य त्या वर्गाचे नोंदणी प्रमाणपत्र मुळ प्रती दाखविले नंतर त्यांना कोरे निविदा संध्यासाठी भरणा चलन तयार करुन देणेत येईल.
२) मा. गटविकास अधिकारी शिरुर यांचे कडे मिळतील.
३) सीलबंद निविदेच्या लिफाफा क्रं. १ मध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या सत्यप्रती सादर कराव्या लागतील.
अ) जि. प. कडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र
आ) निविदा फॉर्म फी भरणा चलनाची प्रत.
इ) इसारा रक्कम कोणत्याही बँकेवरील धनाकर्ष डी डी / धनादेश गटविकास अधिकारी (उ.श्रे) पंचायत समिती शिरुर या नावे काढणेत आलेला धनाकर्ष (DD) बयाणा रक्कम सुट प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही. तसेचे सु.बे.अ. व म.स.स यांनी ही खुल्या गटातील निविदा असल्याने बयाणा रक्कम भरणे बंधन कारक आहे.
ई) प्राप्तीकर पॅनकार्डव जी एस टी प्रमाणपत्र शेवटचे तीन वर्षाचे आय टी आर PTRA and PTC.
टिप :- उपरोक्त कागदपत्रांपैकी एकही कागदपत्र सादर केलेले नसल्यास सदर ठेकेदाराची निविदा बाद करणेत येईल. व आर्थिक लिफाफा (Financial Bid ) उघडणेत येणार नाही. तसेच कोणतेही कागदपत्र सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
४) सील बंद निविदेच्या लिफाफा क्रं. २ मध्ये प्रत्येक पानावर ठेकेदाराचा स्वतःचा सही व शिक्का असलेला तसेच अंकी व अक्षरी लिहीलेला खात्याने साक्षंकित करुन दिलेला निविदा फॉर्म सादर करावा.
५) अ) पात्र निविदा धारकांकडून विहीत सुरक्षा अनामत रक्कम ही कामाचा करारनामा करते वेळी गटविकास अधिकारी (उ.श्रे) पंचायत समिती शिरुर यांचे नांवे ठेव पावती स्वरुपात /चलनाने रोख स्वरुपात घेतली जाईल व उर्वरीत अनामत रक्कम प्रथम देयकांतून कपात केली जाईल.
Incurance towards labour is considered in rate abstract of DSR item. The constract or shall Produce the Labour insurance policy, else following amount will be deducted from his first R.A Bill A)Work Value upto २५.०० Lakhs :-१.००% and B) Work Value above २५.०० Lakhs :- ०.५०%.
६) निविदा देकार १ % पर्यंत कमी असल्यास अतिरिक्त सुरक्षा अनामत भरण्याची आवश्यकता नाही ७) निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १.०१% पासून ते १० % पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन कामाच्या किंमतीच्या १% एवढया रकमेचा गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिरुर येथे देय असलेला खाते क्रं. २६ / १ या नावाने काढलेला धनाकर्ष (डी. डी) (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं. २ मध्ये सादर करावा. (उदा. १ ते १०.००% पर्यंत कमी दर १% रक्कम)
८) निविदाधारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १० % पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढया रकमेचा वरील (४) प्रमाणे येणा-या रकमेसह पुणे येथे देय असलेला मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.पुणे खाते क्रं. २६ / १ या नावाने काढलेला धनाकर्ष (डी. डी) (Demand Draft) जो परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं. २ मध्ये सादर करावा. (उदा. १०% पर्यंत कमी दर १% व (१० %ते १५ % पर्यंत कमी दरनो प्रति टक्का १% दराने) ५ % असे एकूण ६ % रक्कम)
९) निविदा देकार अंदाजपत्रकीय दरपेक्षा १५ % पेक्षा कमी दराचा असल्यास देकार १५% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे. त्याच्या दोन पटीने वरील (५) प्रमाणे येणा-या रकमेसह मा. गटविकास अधिकारी पंचायत समिती शिरुर खाते क्रं. २६/१ या नावाने काढलेला धनाकर्ष (डी. डी) (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं. २ मध्ये सादर करावा. (उदा. १५ पर्यंत कमी एकूण ६% रक्कम) व १९ % पर्यंत कमी दर (१९ % - १५ % ) ४% X२ = ८%) असे एकूण १४% रक्कम सदर डी. डी. सादर केलेला नसलेस निविदा अवैध ठरविणेत येईल. १०) निविदाप्रपत्रातील व निविदा नोटीसमधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांवर बंधनकारक राहतील. तसेच प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण ने देता फेटाळण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला असून निविदा पाठविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला / संस्थेला फेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

शिक्का

सही/-
**गटविकास अधिकारी (उ.श्रे)**
पंचायत समिती शिरुर

**जाहीर समन्स**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ( परसेवा)**
**पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे**
**बारामती विभागीय कार्यालय : मयुरेश्वर अपार्टमेंट, पहिला मजला, भिगवण रोड, मु. पो. बारामती, ता. बारामती, जि. पुणे. फोन (०२११२) २२९५३२**

श्री. सिद्धेश्वर ग्रामीण बिगर शेती सह पतसंस्था मर्या.
पत्ताः पणदरे शाखा बारामती — अर्जदार

विरुध्द, — जाब देणार

| क्र. | प्रतिवादीचे नाव | प्रतिवादी क्र | दावा क्र. | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | अजय रामचंद्र बोराटे मु.पो. मळद, ता. बारामती जि. पुणे. | २ | १०९०/२४ | ८७०७४/- |
| २) | दिलीप किसन चांदगुडे मु.पो. उंडवडी सुपा, ता. बारामती जि.पुणे | ३ | १०९०/२४ | ८७०७४/- |
| ३) | दत्तात्रय मोहन चांदगुडे मु.पो. उंडवडी सुपा, ता. बारामती जि.पुणे | १ | १०९५/२४ | ७२७८४/- |
| ४) | सुनंदा मोहन चांदगुडे मु.पो. उंडवडी सुपा, ता. बारामती, जि.पुणे | ४ | १०९५/२४ | ७२७८४/- |
| ५) | अशितोष शिवाजी चव्हाण मु. पो. तावशी, ता. इंदापूर जि. पुणे. | १ | १०९२/२४ | ९४३३४/- |
| ६) | विशाल रविंद्र नेवसे मु. पो. सातववस्ती, माळेगाव रोड, ता. बारामती, जि. पुणे. | ४ | १०९२/२४ | ९४३३४/- |
| ७) | सायली राजेंद्र गिरमे मु.पो. माळेगाव बु. ता. बारामती, जि.पुणे | ४ | १०९१/२४ | १०३१००/- |
| ८) | विक्रांत मारुती समिंदर मु.पो. इंदापुर रोड बसस्टॅन्ड जवळ ता. बारामती, जि. पुणे | २ | १०९४/२४ | १११२३७/- |

सदर दाव्याचे कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतु प्रतिवादी यांना समन्स रुजू न झाल्याने / त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने जाहीर समन्स देत आहेत.

उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक ०७/०२/२०२५ रोजी ११.३० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रांसह आपण या न्यायालयात हजर रहावे.

या नोटीशीद्वारे उपरोक्त प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

म्हणून आज दिनांक २४/०१/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.

शिक्का

सही/-
**श्री एस. एम. तांदळे**
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि. पुणे

संपादकीय विशेष

# नव्या तंत्रक्रांतीच्या दिशेने...

एका तासात होणारे काम आज 'एआय'च्या मदतीने अवघ्या पाच मिनिटांमध्ये होत आहे. 'चॅट जीपीटी', 'मेटा एआय' हे 'एआय' जगतातील अग्रणी मानले जातात; मात्र या सर्वांची झोप उडवणारी 'एआय' यंत्रणा चीनने आणली आहे. चीनने या यंत्रणेला 'डीपसीक' असे नाव दिले आहे. विशेष म्हणजे हे तंत्रज्ञान येताच आता 'चॅट जीपीटी'सारख्या 'एआय' यंत्रणांची झोप उडाली आहे. चीनचे हे नवीन कृत्रिम बुद्धिमत्तेचे मॉडेल अमेरिकेत सध्या आघाडीवर असलेल्या चॅट जीपीटीइतके चांगले असल्याचे 'डीपसीक'ने म्हटले आहे. शिवाय, ते विकसित करण्यासाठी लागणारा खर्चही तुलनेने फार कमी असल्याचा दावा करण्यात आला आहे. प्रतिस्पर्धी कंपन्या या प्रकारची ॲप, मॉडेल्स विकसित करण्यासाठी अब्जावधी डॉलर्सचा खर्च करतात; पण 'डीपसीक ॲप' 60 लाख डॉलर्सपेक्षाही कमी रकमेत विकसित करण्यात आले असल्याचा दावा या ॲपच्या संशोधकांनी केला आहे. 'डीपसीक' या चीनी कृत्रिम बुद्धिमत्ता कंपनीची स्थापना चीनमधल्या हांगझाऊ या आग्नेय भागातील शहरात झाली. कंपनी 2023 मध्ये स्थापन झाली असली, तरी त्यांचे लोकप्रिय ॲप अमेरिकेत दहा जानेवारी 2025 ला लॉँच झाले.

'डीपसीक'ला भांडवली मदत करण्यासाठी लिआंग वेनफेंग यांनी हेज या फंडाचीही स्थापना केली. त्यातून आलेल्या निधीतून ते 'डीपसीक'चा अर्धा खर्च भागवू शकले. वेनफेंग 40 वर्षांचे असून माहिती आणि इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअर आहेत. त्यांनी 'एनव्हिडिया ए 100' या अमेरिकन कंपनीच्या चिपचे एक स्टोअर उभारले होते. 'एनव्हिडिया'च्या चिपची चीनला निर्यात करण्यावर आता बंदी आहे. तज्ज्ञांच्या मते, वेनफेंग यांच्याकडे जवळपास पन्नास हजार चिप संग्रही होत्या. त्यामुळेच त्यांना 'डीपसीक' लॉँच करता आली. स्वस्त आणि कमी दर्जाच्या चिप्सबरोबर जोडलेल्या या चिप्स अजूनही आयातीसाठी उपलब्ध आहेत. अलीकडेच 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि चीनचे पंतप्रधान ली किआंग यांच्यातील बैठकीत लिआंग दिसले होते. 'डीपसीक'हे ॲप 'ॲपल स्टोअर'वर आणि कंपनीच्या वेबसाईटवर ऑनलाईन डाऊनलोडसाठी उपलब्ध आहे. ॲपची सेवा मोफत वापरता येत असल्याने अल्पावधीतच ॲपल स्टोअरच्या सर्वाधिक डाऊनलोड केल्या जाणाऱ्या ॲप्सच्या यादीत त्याने जागा मिळवली. सर्वाधिक रेटिंग मिळालेले मोफत ॲप म्हणूनही या ॲपला अमेरिकेत मान्यता मिळत आहे. 'चॅट जीपीटी'प्रमाणेच 'डीपसीक'मध्येही कृत्रिम बुद्धिमत्तेची मदत घेता येते.





'डीपसीक'च्या कमी खर्चाच्या दाव्याने आर्थिक बाजारात 27 जानेवारीला फार मोठी ढवळाढवळ केली. या घटनेमुळे नॅसडॅक कंपोझिट निर्देशांक तीन टक्क्यांनी खाली आला. त्याचा प्रभाव जगभरातील चिप मार्केट आणि डेटाचे व्यवस्थापन करणाऱ्या कंपन्यांनाही सोसावा लागला. याचा सर्वाधिक फटका 'एनव्हिडिया' या अमेरिकास्थीत सेमीकंडक्टकर चिप बनवणाऱ्या कंपनीला बसला. कंपनीचे एकाच दिवसात 600 अब्ज डॉलर्सचे नुकसान झाले. अमेरिकेच्या इतिहासात कोणत्याही कंपनीला एका दिवसात सोसावे लागलेले हे सर्वाधिक नुकसान आहे. 'एनव्हिडिया'ने तयार केलेल्या सेमीकंडक्टर चिप्सपेक्षा कमी गुणवत्तेच्या चिप्स 'डीपसीक'मध्ये वापरल्या जातात.

मोठी गुंतवणूक आणि सर्वोत्तम दर्जाचा माल वापरूनच कृत्रिम बुद्धिमत्तेवर ताबा मिळवता येऊ शकतो, या समजुतीला 'डीपसीक'च्या यशामुळे तडा बसला. त्यामुळे अशा चिपची भविष्यात किती गरज पडू शकते यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. 'डीपसीक एआय' ने तंत्रज्ञानस्नेही तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात काम करणाऱ्यांचे लक्ष स्वत:कडे ओढून घेतले आहे. ॲप स्टोअरवर तर या 'डीपसीक'ने 'ओपन एआय' या कंपनीच्या 'चॅट जीपीटी'लाही मागे टाकले आहे. 'डीपसीक'ने दिलेल्या सुविधांकडे संपूर्ण जग आकर्षित झाले असून 'चॅट जीपीटी', 'मेटा एआय' यासारख्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर काम करणाऱ्या प्लॅटफॉर्म्सची झोप उडाली. विशेष म्हणजे चीनी कंपनीने विकसित केलेले हे 'डीपसीक एआय' मोबाईल तसेच लॅपटॉपवरही वापरता येणार आहे. या 'एआय' तंत्रज्ञानाचा परवाना 'मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' या संस्थेकडे आहे. कुठल्याही अडचणींवर उत्तर शोधण्यासाठी हा एक खुला आणि मोफत असा मंच आहे. यावर वैयक्तिक तसेच कार्यालयीन समस्यांवर उत्तरे शोधता येतात. अमेरिकेने चिप पुरण्यास बंदी घातल्यानंतर 'डीपसीक'ने सध्या लॉंच करण्यात आलेले 'एआय मॉडेल' हे 'एनव्हिडिया' कंपनीच्या कमी कार्यक्षमता असलेल्या एच ८०० चिपच्या मदतीने विकसित करण्यात आल्याचा कंपनीचा दावा ही अमेरिकेला एक प्रकारची चपराक आहे.

'डीपसीक एआय असिस्टंट'ने डाऊनलोडिंगच्या बाबतीत 'ओपन एआय'च्या 'चॅट जीपीटी'ला मागे टाकले आहे. 'डीपसीक' कोणकोणत्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकते, हे अद्याप नीट समजलेले नाही. 'डीपसीक' या चॅटबॉटमुळे अमेरिकन शेअर मार्केटमध्येही हाहाकार उडाला. अनके टेक कंपन्यांचे शेअर्स गडगडले. भारतातही त्याचा परिणाम झाला. 'डीपसीक' या चॅटबॉटमुळे भारतीय शेअर बाजारात सूचिबद्ध झालेल्या काही टेक कंपन्यांचे शेअर्स गेल्या दोन ते तीन सत्रांमध्ये साधारण ५० टक्क्यांपर्यंत घसरले. म्हणजेच काही कंपन्यांच्या शेअर्सचे मूल्य हे साधारण ५० टक्यांपर्यंत खाली आले. घसरण झालेल्या कंपन्यांमध्ये अनंत राज, 'नेटवेब टेक्नॉलॉजीज इंडिया', 'झेन टेक्नॉलॉजीज' यांच्यासह इतरही काही कंपन्यांचा समावेश आहे. 'अनंत राज लिमिटेड' या कंपनीचे शेअर्स वीस टक्क्यांनी घसरले. या कंपनीला लोअर सर्किट लागले. 'नेटवेब टेक्नॉलॉजीज इंडिया लिमिटेड' या कंपनीच्या शेअरचे मूल्यदेखील दहा टक्क्यांनी कमी होऊन १,४६०.३५ रुपयांवर बंद झाले.

'डीपसीक' आपले मॉडेल विकसित करण्यासाठी मोठ्या गुंतवणुकीवर आणि 'टॉप-ऑफ-द-लाइन चिप्स'वर अवलंबून राहिले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे चीनी कंपन्यांकडे शक्तिशाली 'जीपीयू' किंवा 'ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट्स'पर्यंत मर्यादित प्रवेश आहे. अनेक पाश्चात्य कंपन्या त्यांच्यावर विसंबून राहतात. कारण अमेरिकेचे सरकार अत्यंत प्रगत चिप्सवर कठोर निर्यात नियंत्रणे लादते. त्याला आता 'डीपसीक' हा चांगला पर्याय आहे. चांगल्या कामासाठी हे तंत्रज्ञान वापरले, तर कुणाचा विरोध असणार नाही; परंतु चीनचा भर अमेरिकेला धडा शिकवण्यावर असल्याने त्यातून चांगले काही निष्पन्न होण्याची शक्यता नाही .

# फेसबुकची २१ वर्षे

**विज्ञानामुळे जग जवळ आले आहे असे लहानपणी ऐकले होते ; पण याची खरी प्रचिती फेसबूक या सोशल नेटवर्किंग साईटमुळेच आली. फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईटला आज म्हणजे ४ फेब्रुवारी रोजी २१ वर्ष पूर्ण झाली. याचाच अर्थ आज फेसबुकचा एकविसावा वाढदिवस आहे. आज जगभरात फेसबुक वापरणाऱ्यांची संख्या दोनशे कोटीहून अधिक आहे.**

श्याम ठाणेदार,
पुणे

अमेरिकेत माहिती गोळा करणाऱ्या पुस्तकाला फेसबुक असे म्हंटले जाते. अमेरिकेत जेंव्हा डिजिटल युगाची सुरुवात झाली तेंव्हा ही माहिती डिजिटल स्वरूपात आणण्याचे आव्हान मार्क झुकरबर्ग या तरुण मुलाने स्वीकारले. हार्वर्ड विद्यापीठात शिकत असलेल्या मार्कने डस्टिन मॉस्कोविट्स, अँड्र्यूआर्डो सर्विन आणि ख्रिस ह्युजेस या आपल्या मित्रांच्या सोबतीने फेसबुकची स्थापना केली. ४ फेब्रुवारी २००४ रोजी मार्कने हार्वर्ड विद्यापीठाच्या वसतिगृहात फेसबुक सुरू केले. अल्पावधीतच या सोशल नेटवर्किंग साईटने तरुणांना अक्षरशः वेड लावले. फेसबुक आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेटवर्किंग साईट बनली आहे.

२१ वर्षापूर्वी मार्कने जे रोपटे लावले त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. जगातील जवळपास बारा देशात फेसबुकची कार्यालये आहेत. फेसबुकची आज पाच हजार कोटींची उलाढाल आहे. फेसबुकला मिळणाऱ्या जाहिरातींमुळे फेसबुकला विनामूल्य सेवा देणे शक्य झाले आहे. १८ मे २०१२ ला फेसबुकने आपले शेअर विकायला काढले या शेअर्सने बाजारात धुमाकूळ घातला. या शेअर्समुळे फेसबुकला कोट्यवधी रुपयांचा फायदा झाला. आज फेसबुकने व्हॉट्सअॅप आणि इंस्टाग्राम या नेटवर्किंग साईटसना देखील आपल्या कवेत घेतले आहे. फेसबुकची वाढती लोकप्रियता पाहून गुगलने फेसबुक विकत घेण्याचा प्रस्ताव मार्क झुकरबर्ग समोर ठेवला मात्र त्याने तो फेटाळून लावला. इंटरनेट विश्वात गुगल नंतर सर्वात जास्त विजिट होणारी वेबसाईट फेसबुक हीच आहे. आजच्या युगात फेसबुक हा तरुणांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. फेसबुक निर्मितीचे एकमेकांशी संवाद साधने, मतप्रदर्शन आणि देवाणघेवाण हे मुख्य उद्देश होते व आजही कायम आहेत. यासोबतच नवनवीन फीचर्स फेसबुक वापरकर्त्यांसाठी आणते. फेसबुक आज अनेकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे.



फेसबुकवर एका वापर कर्त्याचे सरासरी पाचशे मित्र आहेत तो दररोज दहा लोकांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतो किंवा स्वीकारतो फेसबुकवर आज इतके युजर्स आहेत की त्या सर्वांचे एक कुटुंब करायचे म्हटलं तर त्या कुटुंबाची लोकसंख्या जगातील कोणत्याही देशातील लोकसंख्येपेक्षा अधिक असेल. हे विश्वची माझे घर.... या उक्तीप्रमाणे संपूर्ण विश्वाला एक कुटुंब बनवण्याचे काम फेसबुकने केले आहे. फेसबुकला २१ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# सूर्य नमस्कार एक सर्वांगीण व्यायाम

आरोग्य

संजीव वेलणकर,
पुणे

भारतीय तिथी माघ महिन्यातील रथ सप्तमी (शुक्ल सप्तमी); या रोजी जागतिक सूर्यनमस्कार दिवस साजरा केला गेला. सूर्योदयानंतर, श्वासाचे नियमन करून एका विशिष्ट क्रमाने १० किंवा १२ योगासने करणे याला सूर्यनमस्कार म्हणतात. सूर्यनमस्कारामुळे आपले आरोग्य चांगले राहते आणि आपल्या स्मरणशक्तीचाही विलक्षण विकास होतो. सूर्यनमस्कार किंवा साष्टांग नमस्कार ही तथाकथित सूर्य-उपासनाच आहे. हिच्यामुळे सर्वांग सुंदर व्यायाम होतोच पण आत्मिक, मानसिक, व शारीरिक सामर्थ्यही प्राप्त होते. हा व्यायाम अल्पमोली आणि बहुगुणी आहे असे म्हणतात. सूर्यनमस्कारात बारा आसन पवित्र्यांचा समावेश आहे. ती बारा पवित्रे असे आहेत. प्रणामासन किंवा नमस्कारासन, हस्त उत्तासन, पादहस्तासन, अश्वससंचालनासन, पर्वतासन, अष्टांग नमस्कार,





भुजंगासन, पर्वतासन, अश्वतसंचालनासन, पादहस्तासन, हस्त उत्तासन, प्रणामासन हे नमस्कार घालताना, प्रथम सूर्याचे नाव घ्यायचे 'ओम मित्राय नमः' आणि मग वरील बारा पवित्रे घ्यायचे.

सूर्य नमस्कार हा सर्वांगीण व्यायाम आहे. सर्व यौगिक अभ्यासासाठी सूर्योदयाची वेळ सर्वोत्तम मानली गेली आहे. त्याचप्रमाणे सूर्य नमस्कारसुद्धा सूर्योदयाच्या समयी घालणे हितकारक आहे. उघड्यावर हवेशीर जागेवर रिकाम्या पोटी सूर्य नमस्कार घालावेत. मन शांत आणि प्रसन्न असल्यावर सर्व योगाभ्यासाचा आपणावर विशेष परिणाम होतो, असे म्हणतात.

सूर्यनमस्कारांत वापरल्या जाणाऱ्या बऱ्याचशा आसनांचा ऐतिहासिक ग्रंथांत उल्लेख आढळतो. साष्टांग नमस्कार हे सूर्यनमस्कारातील एक आसन पुरातनकाळापासून सूर्याला प्रणाम करण्याकरिता वापरले गेले आहे. धेरंड संहितेमध्ये भुजंगासन हे ३२ महत्त्वाच्या आसनांमध्ये गणले गेले आहे. अधोमुक्त श्वानासनाचे वर्णन मल्लपुराणात केले गेले आहे.

सूर्यनमस्कारात आरोग्य, दीर्घायुष्य, कार्यक्षमता हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवायचे असते. या आसनामुळे आयुष्य, बल आणि बुद्धिचा विकास होतो. मस्तक, मान, हात, पाय, छाती, पोट, कंबरेचे स्नायू, मेरुदंड, पायाची बोटे, गुढगे, सर्व सांधे यांना व्यायाम घडतो. तसेच पोटाचे जडत्व, अनावश्यक वाढलेला मेद, ओटीपोटातील चरबी, थायरॉईडसारखे विकार, लहान मुलांचे फिरलेले हातपाय व हाडांचे काही दोष, गंडमाळा, घशातील विकार नाहीसे होतात. क्षयापासून संरक्षण मिळते, मनोबलाचा विकास होतो. शरीरात शुद्ध रक्ताचा सारख्या प्रमाणात संचार होतो.

शिवाजी महाराज व समर्थ रामदास सूर्यनमस्कारांचा वापर शरीरसौष्ठवासाठी करत असत.

तृचाकल्प नमस्कार ही सूर्य नमस्काराची एक पद्धती आहे. एक भांडे घेऊन त्यात गंध, अक्षता आणि फुले घालतात .ते समोर ठेवून त्यावर सूर्याचे ध्यान करतात.त्यानंतर बीजमंत्र जोडून सूर्याची बारा नावे म्हणतात. उदा.ॐ ह्रां सूर्याय नम:| याप्रमाणे. व नमस्कार घालतात. असे एकूण २२ नमस्कार घातले जातात . नंतर सूर्याची प्रार्थना करून भांड्यातील पाणी तीर्थ म्हणून घेतात.

खेचाखेची

## चोरी

**पत्नी** : (घाईघाईने) अहो, ऐकलं का? आजकाल मला आपल्या राजूचं लक्षण काही ठीक दिसत नाही. तो घरातच पैशाची चोरी करु लागला आहे. मी कुठेही लपवून ठेवले तरी तो पैसे शोधून काढतो आणि लंपास करतो.

**पती** : (विचार करत) एक काम कर... घरातले पैसे त्याच्या पुस्तकात लपवून ठेव. परीक्षेपर्यंत ते शोधू शकणार नाही.


वेगळे काही

काही स्थळं इतकी देखणी असतात की कोणीही त्याकडे आकर्षित व्हावं. ॲरिझोनामधील कोलोरेडो नदीही अशीच पाहताक्षणी आकर्षित करणारी. या भागाला 'घोड्याचा नाल' म्हणून ओळखलं जातं. घोड्याच्या नालाच्या आकाराशी साधर्म्य असल्यानं या परिसराला हे नाव पडलं आहे. हे अप्रतीम दृष्य टिपण्यासाठी अनेक फोटोग्राफर्सची वर्दळ असते. सगळा परिसर एका शॉटमध्ये टिपणं अत्यंत कौशल्याचं काम आहे. पण एका कुशल छायाचित्रकारानं हे काम नेमकं साधलंय. अर्थातच यासाठी त्यानं कमालीची जोखीम पत्करली. एका अत्यंत धोकादायक खडकावर उभं राहून त्यानं हा सुंदर स्नॅप मिळवला आहे.

## फरसाणची रूचकर भाजी


रूचिरा

घरच्या घरी भेळ करायची असेल किंवा पोहे, उपमा करायचा असेल तर त्यावर फरसाणचा वापर आवर्जून केला जातो. शिवाय चिवड्यात तर फरसाण हवंच. नाही का? पण फरसाण जास्त दिवस शिल्लक ठेवल्यानं वाया जाण्याची वा खराब होण्याची शक्यता असते. त्यासाठी शिल्लक फरसाणच्या भाजीचा पर्याय विचारात घेता येईल. चला तर मग. आज याच भाजीची माहिती घेऊ...



**सामग्री** : दोन वाट्या फरसाण, चिरलेले दोन टोमॅटो, चिरलेले दोन कांदे, तिखट, तेल, जिरे, चवीप्रमाणे मीठ आणि साखर, चिरलेली कोथिंबीर इत्यादी.

**कृती** : सर्वप्रथम फरसाण हाताने चुरुन घ्या. कढई चांगली तापल्यानंतर तेल टाकून त्यात जिरे तडतडून घ्या. त्यात बारीक चिरलेला कांदा गुलाबी रंगावर परतून घ्या. नंतर चिरलेला टोमॅटो घालून पुन्हा थोडा वेळ परतून घ्या. यावेळी तिखट, मीठ आणि साखरही घाला. हा मसाला तेल सोडू लागला की त्यात फरसाण घालून मिश्रण एकसारखं करा. भाजी फार कोरडी वाटत असेल तर पाण्याचा शिपका मारावा. कढईवर झाकण ठेवून चांगली वाफ येऊ द्या. आता ही तयार भाजी डिशमध्ये काढून कोथिंबीर, लिंबाच्या फोडीने सजवा. गरमागरम फुलके अथवा पोळीबरोबर सर्व्ह करा.





राशीभविष्य

- **मेष** : भाग्य वृध्दींगत करणाऱ्या घटना घडतील. स्वमताग्रह टाळायला हवा. उष्णतेपासून त्रास होऊ शकेल.
- **वृषभ** : व्यवसायात अपेक्षित प्रगती होईल. शारिरिक तक्रारींची दखल घ्यावी. नव्या संधींचं स्वागत करावं.
- **मिथुन** : चिकाटीने कार्यात यश मिळेल. भागीदारी व्यवसायात मतभेद टाळा. कला-गुणांचा विकास होईल.
- **कर्क** : कौटुंबिक जीवनातील प्रश्न सामंजस्यानं सोडवावेत. पोटाच्या तक्रारी वाढणार आहेत. काळजी घ्या.
- **सिंह** : शिक्षणातून प्रगती साधता येईल. अचानक धनलाभाचे योग आहेत. अडचणींवर मात करता येईल.
- **कन्या** : विचारांना चालना मिळेल. सांसारिक जीवनात आनंद लाभेल. महत्त्वाचे व्यवहार मार्गी लागतील.
- **तूळ** : वयोवृध्दांनी दगदग टाळायला हवी. तुमचा जनसंपर्क वाढणार आहे. उपजत गुणांचा विकास होईल.
- **वृश्चिक** : आज थोरामोठ्यांचं मार्गदर्शन लाभेल. योजलेली कामं मनासारखी होतील. अडचणींची चिंता नको.
- **धनु** : आर्थिक गुंतवणूक विचारानं करावी. नव्या कामांना गती प्राप्त होईल. अपेक्षित प्रगती साधता येईल.
- **मकर** : रेंगाळलेली कामं मनासारखी होतील. आर्थिक नियोजन करता येईल. मित्रांचं चांगलं सहकार्य लाभेल.
- **कुंभ** : नवे विचार मार्गी लावता येतील. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावं. अडचणीतून मार्ग काढता येईल.
- **मीन** : दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावं. गुंतवणूक विचारानं करावी. कौटुंबिक सौख्य उत्तम लाभेल.

सल्ला मोलाचा

## संस्कार

त्या दिवशी ऑफिसमधून बाहेर पडण्यास उशीर झाल्यानं घाईघाईनं घराकडे निघाले होते. बस वेळेत मिळाली आणि फारसं ट्रॅफिक जाम नसल्यानं तशी वेळेत पोहोचली. बसमधून उतरून घाईघाईनं निघाले. सारं लक्ष घराकडे लागलं होतं. मुलं शाळेतून वेळेत आली असतील का, अभ्यास करत असतील का, घरात पसारा झाला असेल का, असे प्रश्न मनात होते. त्या विचारात लिफ्टजवळ आले तर ती बंद. मग जिन्याने जाणं भाग पडलं. जिना चढू लागले आणि दुसऱ्या मजल्याजवळ येताच कोणी शुभंकरोती म्हणत असल्याचा आवाज आला. नकळत पावलं थबकली. खरं तर त्या फ्लॅटमध्ये एक कुटुंब नव्यानंच रहायला आलं होतं. त्यामुळे फार परिचय नव्हता. घराचं दार उघडं होतं. समोरच्या हॉलमध्ये वयस्कर स्त्री दोन लहान मुलांसह रामरक्षा म्हणत होती. माझं मन भूतकाळात गेलं. माझं लहानपण आठवलं आणि त्या संस्कारांचं महत्त्वही लक्षात आलं. 'अगं आई इथं का उभी आहेस? चल लवकर' मुलाच्या हाक मारण्यानं मी भानावर आले आणि पावलं घराच्या दिशेनं वळली.

## ५ फेब्रुवारी

दिनविशेष

१९५२ : स्वतंत्र भारतातील पहिली निवडणूक पार पडली.
२००४ : अबू सालेमला भारताकडे सोपवण्याचा पोर्तुगालच्या कोर्टाचा आदेश.
२०१३ : विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत भारतीय महिला खेळाडू साखळीत गारद.
२०१४ : श्रीलंकेचा फलंदाज कुमार संगकाराने कारकिर्दीतील पहिले कसोटी त्रिशतक झळकावले.
२०१८ : बालरंगभूमीचा पाया रचणाऱ्या आणि बालरंगभूमीला सशक्त दृष्टिकोन देणाऱ्या सुधाताई करमरकर यांचे निधन.

महत्त्वपूर्ण काही...

## प्रदूषणवाढीचा सामना

आजकाल प्रदुषणात सातत्यानं होत असलेली वाढ ही मोठी गंभीर समस्या ठरत आहे. प्रदूषणाचे विविध दुष्परिणाम समोर येत आहेत. विशेषत: प्रदूषणाचा मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. राजधानी दिल्लीमध्ये तर अलिकडे हवेतील प्रदूषणानं उत्युच्च पातळी गाठली होती. ही पातळी कमी करण्यासाठी तातडीने काही उपाययोजना करण्यात आल्या. तरिही दिल्लीतील प्रदूषणाच्या समस्येला अजून म्हणाव्या त्या प्रमाणात आळा घालता आलेला नाही. खरं तर प्रदूषणामुळे प्रौढ महिलांना डिमेंशिया, अल्झायमर यासारख्या व्याधींची शक्यता असते. अधिक प्रदूषण असणाऱ्या भागात राहणाऱ्या महिलांना हृदयविकाराचा धोका जास्त असतो. कारखाने, औद्योगिक आस्थापना, यंत्रप्रणाली असणाऱ्या भागांमध्ये प्रदुषणाची पातळी ८१ टक्क्यांपर्यंत पोहोचते. या भागात राहणाऱ्या ९२ टक्के महिला आरोग्यविषयक समस्यांनी पीडित असतात. प्रदूषित कण मेंदूपर्यंत पोहोचून या यंत्रणेवर दुष्परिणाम करतात. सामान्य लोकांपेक्षा प्रौढ महिलांना हा धोका २१ टक्के जास्त असतो. हा धोका लक्षात घेता काळजी घ्यावी.

पंचांग

**बुधवार, ५ फेब्रुवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
माघ शु. ८, नक्षत्र : भरणी
चंद्रराशी : मेष, शुक्ल योग,
सूर्योदय : ७.११, सूर्यास्त : ६.३३

फॉरवर्डस

गुलाब स्वत: काट्यांसमवेत राहून प्रेमाचा संदेश देत असतो.

**उस गुलाब से पूछो की दर्द क्या होता है,**
**देता है पैगाम प्यार के पर खुद कांटों की चुभन में रहता है**

आरोग्यमंत्र

## जाणा स्वरयंत्राचा कर्करोग

अलिकडच्या काळात घशाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग या व्याधीचं प्रमाण वाढत असलं तरी स्वरयंत्राचा कर्करोगही विचारात घेण्याजोगा आहे. त्यामुळे या संदर्भातही पुरेशी माहिती असणं आवश्यक आहे. महत्त्वाची बाब म्हणजे या कर्करोगाची लक्षणं लवकर लक्षात येतात. आवाज घोगरा होणं, श्वास घ्यायला त्रास, खूप खोकला, कफातून रक्त पडणं, मान दुखणं, घसा खवखवणं, कान दुखणं, अन्न गिळताना त्रास होणं, मानेला सुज, वजन अचानक कमी होणं ही या विकाराची सर्वसाधारण लक्षणं मानली जातात. अर्थात ही कॅन्सरचीच लक्षणं असतात असं नाही. पण यापैकी काही लक्षणं एका आठवड्यापेक्षा जास्त काळ राहिली तर तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.



धूम्रपानामुळे स्वरयंत्रातल्या पेशींना धोका पोहोचू शकतो. तसंच अतिप्रमाणात मद्यपान, आहारात पोषक घटकांचा अभाव, रोगप्रतिकारक्षमतेशी संबंधित समस्या, ह्यूमन पॅपिलोमा विषाणूंच्या संपर्कात येणं, कामाच्या ठिकाणी विषारी घटकांशी संपर्क, काही जनुकीय विकार ही याची कारणं आहेत. जास्त धूम्रपान, तंबाखूचं सेवन, आहारात फळं-भाज्यांचा समावेश न करणारे, प्रक्रिया केलेल्या पदार्थांचं जास्त सेवन करणारे, अतिरिक्त मद्यपान करणारे तसंच घरात घशाच्या कॅन्सरचा इतिहास असणाऱ्यांना स्वरयंत्राच्या कर्करोगाचा धोका असतो. या विकाराची लक्षणं दिसल्यावर विविध चाचण्यांचा सल्ला दिला जातो. लॅरिंगोस्कोपी चाचणीत घशात काही अनियमितता आढळली तर बायोप्सी केली जाते. सीटी किंवा एमआरआय स्कॅन करून कॅन्सर किती पसरला, ते पाहिलं जातं.

वाचा तर खरं

✻ लोकरीचे कपडे मशीनमध्ये धुतले तर खराब होऊशकतात. तेव्हा हे कपडे हाताने धुवा. ✻ 'मशीन वॉशेबल' लेबल असलेले कपडे मशीनध्ये धुतले तरी चालतात. हे कपडे धुण्यासाठी स्वच्छ आणि कोमट पाण्याचा वापर करा. लोकरीचे कपडे धुण्यासाठी खास पावडर किंवा केमिकल्सविरहित साबण किंवा पावडर वापरा. कपडे १० मिनिटे कोमट पाण्यात भिजवून ठेवा. त्यानंतर पुन्हा कोमट पाण्यातून काढा. शेवटी थंड पाण्याचा वापर करा. ✻ लोकरीचे कपडे उलट्या बाजूने धुवा. यामुळे कपड्यांचा दर्शनी भाग नव्यासारखा दिसेल.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### मद्यधुंद भरधाव पिकअप चालकाने मोटार आणि दुचाकीला दिली धडक

वाकड - मद्यधुंद भरधाव पिकअप चालकाने मोटार आणि दुचाकीला धडक दिली. हा अपघात अशोक नगर-ताथवडे गावठाण रस्त्यावरील जाधव वस्ती येथे दुपारी साडे बाराच्या सुमारास झाला. सुदैवाने या अपघातात जीवित हानी झाली नसून मोटारचालक महिला गंभीर जखमी झाली आहे. या अपघाताचा थरार सीसीटीव्हीत ही कैद झाला. भरधाव वेगात निघालेल्या पिकअप चालकाने आधी उजव्या बाजूने येणाऱ्या चारचाकी वाहनाला समोरासमोर धडक दिली, या धडकेत पिकअपचे चाक निखळले. त्यानंतर चालकाचा गाडीवरचा ताबा सुटला अन पार्क असलेल्या दुचाकीलाही पिकअपने ठोकरले.

### अक्षय मांडगे पहिल्याच प्रयत्नात सीए

वाकड : बिजलीनगर, चिंचवड येथील अक्षय पंढरीनाथ मांडगे हा पहिल्याच प्रयत्नात परीक्षेत यश मिळवत उत्तीर्ण होऊन सीए झाला आहे. अक्षयच्या या यशाबद्दल सर्व क्षेत्रातून त्याचे कौतुक होत आहे. अक्षयने दहावीत ९२ टक्के, बारावीत ८२ टक्के, इंदिरा कॉलेज मधून बी. कॉम पुर्ण करत ८९ टक्के तर एम. कॉमच्या परीक्षेत बीएमसीसी कॉलेजमध्ये ९३ टक्के गुण मिळवले होते. अक्षयचे वडील पंढरीनाथ मांडगे हे चिंचवड येथील आबासाहेब चिंचवडे ज्युनिअर कॉलेजमधून प्राध्यापक म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत.
आई किरण मांडगे गृहिणी आहेत. सीए होणे हे माझे ध्येय होते ते पूर्ण केल्याने आई-वडिलांच्या कष्टाचे चीज केल्याचे समाधान मला लाभल्याचे अक्षय म्हणाला.

# शहरात जीबीएसचे रुग्ण वाढले

## पिंपरी चिंचवड महापालिकेकडून हेल्पलाईन सुरु

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** गुलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) या आजाराचे शहरात आतापर्यंत एकुण १८ रुग्ण आढळले असून आज एक नवीन संशयित रुग्णाची नोंद झाली आहे. आतापर्यंत शासकीय आकडेवारीनुसार एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. त्यापैकी ६ रुग्णांना बरे करुन घरी सोडण्यात आले असून उर्वरित रुग्णांची प्रकृती स्थिर आहे. यापैकी ५ रुग्ण व्हेंटीलेटरवर आहेत. अशी माहिती महापालिका आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी दिली आहे.

जीबीएस पाश्वभूमीवर महापालिकेने गृह सर्वेक्षनाकरीता एकूण १६ पथके नेमण्यात आलेली आहेत. प्रत्येक टीममध्ये एक एमपीडब्लू, एक एएनएम व एक आशा कार्यकर्ती आहे. सारथी प्रकल्पाच्या मदतीने ७७५८९३३०१७ हेल्पलाईन आज कार्यान्वित करण्यात आली आहे.



यासाठी ७ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. प्रत्येक रुग्णालय झोननिहाय एक वैद्यकीय अधिकारी अशा एकूण ८ वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

### वयानुसार रुग्णांचा तपशिल


| वयोगट | रुग्ण |
|---|---|
| 0-9 | 4 |
| 10-19 | १ |
| 20-29 | २ |
| 30-39 | २ |
| 40-49 | २ |
| 50-59 | ४ |
| 60-69 | २ |
| 70-79 | १ |

### नागरीकांनी घ्यावयाची काळजी

- पिण्याचे पाणी दुषित राहणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. उदा. पाणी उकळून पिणे.
- अन्न स्वच्छ आणि ताजे असावे.
- वैयक्तिक स्वच्छतेवर भर देण्यात यावा.
- शिळे अन्न आणि अर्धवट शिजलेले अन्न मांस (चिकन, मटन) खावू नये.
- नागरिकांनी घाबरून न जाता लक्षणे आढळ्यास त्वरीत शासकीय रुग्णालयात जावे.

### आजाराची लक्षणे

- अचानक पायातील किंवा हातात येणारी कमजोरी किंवा लकवा
- अचानकपणे उद्भवलेले चालण्यातील त्रास किंवा कमजोरी
- डायरिया (जास्त दिवसांचा)



जीबीएसचे रुग्ण दाखल असलेल्या ५० खाजगी रुग्णालयांची गुगल मीट घेण्यात आले. महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांची यासंदर्भात गुगल मीट घेण्यात आली. यास ८०२ डॉक्टर उपस्थित होते. महापालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये आवश्यक प्रमाणात लागणाऱ्या औषधांचा साठा उपलब्ध आहे. तसेच शासनाच्या आरोग्य व एनसीडीसी विभागासोबत बैठका घेण्यात आलेल्या आहेत. नागरिकांनी घाबरुन जाण्याची आवश्यकता नसुन आरोग्य विभागाची प्रतिबंधात्मक उपाययोजना बाबत तयारी आहे. घरोघरी सर्व्हेक्षण अंतर्गत आजपर्यंत १३,२३२ घरांचे सर्व्हेक्षण करण्यात आले आहे.
**— डॉ. लक्ष्मण गोफणे,** आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महापालिका

# भोसरी वाहनतळाचे अद्यापही काम अपूर्ण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पावणे आठ कोटी रूपये खर्चून भोसरी-आळंदी रस्त्यावरील प्रभाग क्र. 5 मधील बहुमजली सशुल्क वाहनतळ उभारण्याच्या कामाची मुदत संपून वर्ष उलटले तरी देखील हे काम अपूर्ण आहे. या वाहनतळाचा वापर याठिकाणचे स्थानिक रहिवाशी वाहने उभी करण्यासाठी करत आहेत. आणखी किती दिवस या वाहनतळाचे काम सुरू राहणार आहे, असा सवाल नागरिक करत आहेत.

भोसरी विधानसभा मतदार संघातील भोसरी-आळंदी रस्त्यावरील आळंदी चौक ते शास्त्री चौकदरम्यानची बाजारपेठ प्रति लक्ष्मीरोड म्हणून ओळखली जाते. पुणे-नाशिक महामार्गावर उड्डाणपूल उभारताना या रस्त्यावर उड्डाणपूल उभारण्याची मागणी महापालिका प्रशासनाने फारशी गांभिर्याने न घेतल्याने या रस्त्यावर अहोरात्र वाहतूक सुरू असल्याने वाहतूक कोंडीचा दररोजचा अनुभव प्रवासी व नागरिकांना घ्यावा लागत आहे. तर सम, विषम तारखेच्या पार्किंग धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने या रस्त्याच्या दुतर्फा उभ्या केलेल्या दुचाकींमुळे वाहतूक कोंडीत भरच पडत असते.

या रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महापालिकेच्या वतीने भोसरी-आळंदी रस्त्यावरील सखुबाई गवळी उद्यानाच्या 1866 चौ. मी. जागेवर महापालिकेच्या वतीने दुचाकी व चारचाकींकरिता तळमजला प्लस तीन मजले असे बहुमजली सशुल्क वाहनतळ उभारण्याचे काम मेसर्स सिद्धनाथ कॉर्पोरेशन या ठेकेदाराला देण्यात आले आहे.

**दिरंगाई**

या कामाचा आदेश 23 फेब्रुवारी 2022 रोजी देण्यात आला असून, हे काम पूर्ण करण्यासाठी दिलेली 24 महिन्यांची मुदत 22 फेब्रुवारी 2024 रोजी संपली आहे. तरीदेखील या वाहतळाचे काम अद्यापही अपूर्णावस्थेत आहे. त्यामुळे भोसरी-आळंदी रस्त्यावरील वाहतूक कोंडीवरील उपाययोजना करण्यात अडचण येत असल्याचे चित्र आहे.

### असे आहे बहुमजली सशुल्क वाहनतळ

- बहुमजली वाहनतळाचे क्षेत्र- 1866 चौ. मी
- तळमजला प्लस तीन मजले असलेली इमारत
- प्रत्येक मजल्यावर 25 चारचाकी वाहने उभी करता येणार
- एकूण 100 चारचाकी वाहन पार्कींगचे नियोजन
- तळमजल्यावर 150 दुचाकी वाहने उभढ़ी करण्याची क्षमता
- सर्व मजल्यांवर जिना व लिफ्टची सोय

# चिखलीत तंबाखू व्यसनमुक्त शाळा अभियान शुभारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपळे गुरव :** प्रज्ञादिप सोशल फाऊंडेशन पिंपळे गुरव गोल्डन लेटर्स बाल विकास फौंडेशन वाकड यांच्यावतीने महापालिकेच्या कुदळवाडी प्राथमिक शाळा क्र.89 येथे तंबाखू व्यसनमुक्त शाळा अभियानाची सुरुवात करण्यात आली.

शाळेचे मुख्याध्यापक संपत पोटघन मुख्याध्यापक व प्रज्ञादीप सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.प्रकाश रोकडे यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी गोल्डन लेटर्स बाल विकास फौंडेशनच्या अध्यक्षा डॉ. राणी खेडीकर, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम जिल्हा रूग्णालय पुणेचे मानसशास्त्रज्ञ हनमंत हाडे, फौंडेशनच्या उपाध्यक्षा वैशाली गायकवाड, खजिनदार प्रज्ञा रोकडे, शिक्षक, चवथी ते आठवी इयत्तयेमधील एकूण 283 विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

डॉ. प्रकाश रोकडे यांनी तंबाखूजन्य धुम्रपान व्यसनाचे दुष्परिणाम व व्यसनमुक्त जीवन जगणे बाबत मार्गदर्शन केले. हनुमंत हाडे यांनी उपस्थितींना तंबाखू व्यसनमुक्तीची शपथ दिली. पिंपरी चिंचवड परिसरातील काही निवडक शाळांतील शिक्षक विद्यार्थी यांना तंबाखूजन्य पदार्थ संबंधी जाणीवजागृती करून तंबाखू मुक्त शाळा अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती डॉ प्रकाश रोकडे यांनी दिली.

# पालेभाज्या, फळभाज्या स्वस्त

**मोशी:** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मोशी उपबाजारात शेतीमालाची मोठी आवक झाली. कलिंगड, टरबूज आदी फळांचे भाव 10 ते 20 रुपये प्रतिकिलो असल्याने ग्राहकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. बाजारभाव आवाक्यात असल्याने खरेदीदारांचा उत्साह कायम होता.

मोशी उपबाजारात 3 हजार 721 क्विंटल फळभाज्या, 55 हजार 300 गड्डी पालेभाज्यांसह 401 क्विंटल फळांची आवक झाल्याचे बाजार समितीचे विभागप्रमुख नीलेश लोखंडे यांनी सांगितले. पिंपरी मंडईत पालेभाज्यांचे दर 10 ते 15 रुपये गड्डी असून कोथिंबीर, कांदापात, पालक, पुदिना आणि हरभरा गड्डीची विक्री तेजीत राहिली. प्रतवारीनुसार, कांदा 20 ते 30 रुपये, बटाटा 20 ते 25, लसूण 150 ते 200, आले आणि मिरची 50 ते 60, 20, गाजर आणि मटार 40 रुपये प्रतिकिलो असल्याचे विक्रेते जाकिर मुजावर यांनी सांगितले. काही फळांचे भाव कमी झालेअसून कलिंगड 20 तर टरबूज 50 ते 60 रुपये.

# पिंपरी-चिंचवडचा नावलौकिक साऱ्या जगात जाण्यासाठी प्रयत्न करूयात : कृष्णकुमार गोयल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी**- पिंपरी चिंचवड शहर वाढत्या कारखानदारी मुळे जगाच्या आऔद्योगिक नकाशावर गेले आहे. धार्मिक सलोखा असणारे हे शहर शिक्षण, क्रीडा, कला, नाट्य, संस्कृती, संशोधन, आयटी, AI अशा सर्वच क्षेत्रात प्रगती करून जगात अव्वल दर्जाचे शहर व्हावे यासाठी आपण साऱ्यांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत. असे प्रतिपादन प्रख्यात उद्योगपती कोहिनूर ग्रुपचे अध्यक्ष, कृष्णकुमार यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय मराठी पत्रकार संस्था संलग्न पिंपरी-चिंचवड शहर पत्रकार संघातर्फे पत्रकार दिनाचे औचित्य साधून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल कृष्णकुमार गोयल यांचा कायनटीक ग्रुपचे अध्यक्ष अरुण फिरोदिया यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार अविनाश चिलेकर होते, महापालिकेचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब गोरे, अध्यक्षा सायली कुलकर्णी उपस्थित होते. कृष्णकुमार गोयल पुढे म्हणाले, "पिंपरी-चिंचवडने मला घडविले. शहराशी माझे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. शहरातील पत्रकारांनी एकत्र यावे. पुण्याप्रमाणे शहरात पत्रकार संघाची स्वतंत्र इमारत उभी करावी. त्यासाठी आवश्यक ती मदत केली जाईल. या पुरस्कारामुळे माझ्यावरील जबाबदारी वाढली आहे असे मी मानतो असे सांगून उपस्थित सर्व पत्रकारांना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

# साडेतीनशे वर्षे जुन्या गणपती मंदिरात गणेश जयंती सोहळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव दाभाडे :** शहरातील साडेतीनशे वर्षे जुन्या गणपती मंदिरात शनिवारी श्री गणेश जयंती सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमांसह संपन्न झाला. गणेश जयंतीनिमित्त गणपतीचे मंदिर पहाटे साडेचार पासून भाविकांना दर्शनासाठी खुले होते.सकाळी श्रींची महापूजा व महाभिषेक संपन्न झाल्यानंतर जन्मोत्सव निमित्त ह.भ.प. अंजलीताई कऱ्हाडकर यांची कीर्तनसेवा झाली. दुपारी गणेश जन्मावेळी नामघोष करण्यात आला.सायंकाळी पंडित किरणजी परळीकर व त्यांच्या गुरूकुलातील सहकाऱ्यांतर्फे श्रींच्या चरणी भक्तीसंगीताची स्वरांजली अर्पण करण्यात आली. सायंकाळी महाआरती झाली.रविवारी माघ शु पंचमी निमित्त गणेशाची मध्यान्ह महापूजा व महाआरती संपन्न होऊन उत्सवाची सांगता करण्यात आली.



# संविधान हा भारतीय लोकशाहीचा आत्मा! - ॲड. सतिश गोरडे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** 'संविधान हा भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे!' असे प्रतिपादन ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सतिश गोरडे यांनी महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरीगाव येथे मंगळवार, दिनांक ०४ फेब्रुवारी २०२५ रोजी केले. महात्मा फुले महाविद्यालयाचा इतिहास विभाग, आय क्यू ए सी आणि दर्द से हमदर्द तक ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान गौरव विशेष व्याख्यानात ॲड. सतिश गोरडे बोलत होते. प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते, तसेच साहित्यिक प्रदीप गांधलीकर, प्रा. डॉ. संगीता अहिवळे, प्रा. डॉ. कामायनी सुर्वे, पिंपरी - चिंचवड ॲडव्होकेटस् बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. गौरव वाळुंज, सचिव ॲड. उमेश खंदारे आणि पदाधिकारी यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

ॲड. सतिश गोरडे पुढे म्हणाले की, '२६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान अस्तित्वात आले असले तरी त्यापूर्वी सुमारे तीन वर्षे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर मसुदा समिती त्यावर काम करीत होती. सलग १४१ दिवस उपस्थित राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रमातून संविधानाला सजीव करण्याचे अतिशय महत्त्वपूर्ण कार्य केले. ज्याप्रमाणे दूध हे प्रक्रिया केली नाही तर नासून खराब होते, त्याचप्रमाणे समाजातील सर्व घटकांना जर समान न्याय मिळाला नाही तर लोकशाहीतील अंतर्गत असंतोषाचा उद्रेक होऊ शकतो, याची जाणीव त्यांना होती. संविधानातील ३९५ कलमांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समानता, बंधुभाव आणि देशाची अखंडता अबाधित ठेवण्यासाठी योगदान दिले. पुढे परिस्थितीनुरूप त्यामध्ये कलमांची संख्या वाढविण्यात आली; तसेच बहुमताने घटनादुरुस्तीही करण्यात आली आहे. देश आता संविधानाचा अमृतमहोत्सव साजरा करीत असताना संविधानाचा आदर अन् सन्मान राखून प्रत्येक भारतीयाने मूलभूत हक्क उपभोगताना नैतिक कर्तव्यांचेही पालन केले पाहिजे!' दृष्टान्तकथा आणि विविध उदाहरणे उद्धृत करीत ॲड. गोरडे यांनी विद्यार्थ्यांसहित सर्व उपस्थितांना संविधानाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले यांनी अध्यक्षीय मनोगतातून, 'आपल्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सतिश गोरडे हे आज ज्येष्ठ विधिज्ञ या भूमिकेतून संविधानावर व्याख्यानासाठी आले याचा विशेष आनंद वाटला. जातीय उतरंडीखाली चिरडल्या गेलेल्या समाजाला माणूस म्हणून जगण्याचे बळ संविधानाने दिले आहे!' असे मत मांडले. प्रतिमापूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. प्रा. भाऊसाहेब सांगळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. नीळकंठ डहाळे यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. प्रा. संग्राम गोसावी आणि प्रा. डॉ. प्रतिमा कदम यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. संदीप नन्नावरे यांनी आभार मानले. महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारीवर्ग, पिंपरी - चिंचवड ॲडव्होकेटस् बार असोसिएशनचे पदाधिकारी यांनी संयोजनात परिश्रम घेतले.

पान १ वरून

# कृष्णमुर्ती , शुभा खोटे , खेर यांना 'पीफ'चे पुरस्कार जाहीर!!

कविता कृष्णमूर्ती यांना संगीत क्षेत्रातील योगदानासाठी संगीतकार एस. डी. बर्मन पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

यंदा प्रख्यात चर्मवाद्यवादक विजय चव्हाण आणि सहकारी यांच्या वादनाने उद्घाटन सोहळ्याची सुरुवात होईल .उद्घाटन सोहळ्यानंतर Gloria, Country: Italy, Switzerland ,Dir : Margherita Vicario हा उद्घाटनाचा चित्रपट (ओपनिंग फिल्म) म्हणून दाखवण्यात येणार आहे, तर The Room Next Door ,Country: Spain ,Dir: Pedro Almodovar या चित्रपटाने महोत्सवाची (क्लोजिंग फिल्म) सांगता बालगंधर्व रंगमंदिर येथे होणार असल्याचे डॉ. पटेल यांनी सांगितले.

१३ ते २० फेब्रुवारीदरम्यान 'पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट (पीफ) महोत्सव २०२५' होणार आहे.

सेनापती बापट रस्त्यावरील पॅव्हेलियन मॉलमधील पीव्हीआर आयकॉन (६ स्क्रीन), कॅम्प परिसरातील आयनॉक्स (३ स्क्रीन) आणि औंध भागातील वेस्टएंड मॉलमधील सिनेपोलीस चित्रपटगृहात (२ स्क्रीन) या तीन ठिकाणी एकूण ११ स्क्रीनवर चित्रपट दाखविले जाणार आहेत.

महोत्सवासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया www.piffindia.com या महोत्सवाच्या अधिकृत संकेतस्थळावर सुरू झाली असून, चित्रपटगृहांवर स्पॉट रजिस्ट्रेशन प्रक्रियाही सुरू झाली आहे. रसिक प्रेक्षकांसाठी कॅटलॉग फी. रुपये ८०० फक्त आहे.



**पुरस्काराचे मानकरी**

**शुभा खोटे :-**

जन्म - ३० ऑगस्ट, १९३७ ,मराठी तसेच हिंदी भाषेतील चित्रपटात व दूरचित्रवाहिनी मालिकात काम केले आहे.पावणे दोनशे चित्रपटांमध्ये आणि अनेक टी.व्ही. मालिकांमध्ये तसेच इंग्रजी रंगभूमीवर भूमिका साकारणाऱ्या शुभा खोटे यांची मोठी कारकीर्द आहे. शुभा खोटे यांनी अगदी सुरुवातीला नायिका, सहनायिका म्हणून काही चित्रपट केले. त्यानंतर त्यांची कारकीर्द चरित्रनायिका अथवा विनोदी अभिनेत्री म्हणून गाजली.क्रीडाक्षेत्रात मनापासून रमत असलेल्या शुभा खोटे यांना एक छायाचित्र पाहून निर्माता-दिग्दर्शक अमिया चक्रवर्ती यांनी १९५५ साली त्यांना 'सीमा' या चित्रपटात भूमिका दिली. 'पेईंग गेस्ट'या चित्रपटात त्यांनी खलनायिका होती. मेहमूद, शुभा खोटे आणि धुमाळ हे 'त्रिकूट' याच चित्रपटापासून जन्माला आले आणि पुढील जवळपास दोन दशके अनेक चित्रपटात काम केले. एक दूजे के लिये,चिमुकला पाहुणा (मराठी चित्रपट),छोटी बहन,जिद्दी,दिल एक मंदिर,दिल तेरा दिवाना,पेईंग गेस्ट,भरोसा,ससुराल,सीमा हे त्यांचे चित्रपट विशेष गाजले.

**कविता कृष्णमूर्ती :-**

कविता कृष्णमूर्ती उर्फ शारदा कृष्णमूर्ती म्हणून जन्म , 25 जानेवारी 1958, कविता यांनी हिंदी , बंगाली , कन्नड , राजस्थानी , भोजपुरी , तेलगू , ओडिया , मराठी , इंग्रजी , उर्दू , तमिळ , मल्याळम , गुजराती , नेपाळी , आसामी , कोकणी , पंजाबी आणि इतर भाषांसह विविध भाषांमध्ये असंख्य गाणी रेकॉर्ड केली आहेत त्यांना चार फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका पुरस्कार आणि 2005 मध्ये पद्मश्री मिळाले .. कविता यांच्या पार्श्वगायन करिअरची सुरुवात कन्नड भाषेतील चित्रपटांपासून झाली. त्यांनी एकूण 18 हजारांहून अधिक गाणी गायली. आंख मारे (चित्रपट - तेरे मेरे सपने), तू चीज बडी है मस्त मस्त (चित्रपट -मोहरा), डोला रे डोला ( चित्रपट – देवदास). अशी त्यांची असंख्य गाणी गाजली.

**अनुपम खेर :-**

अनुपम खेर (जन्म ७ मार्च १९५५). चार दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी 540 हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे . खेर यांना त्यांच्या अभिनयासाठी दोन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि आठ फिल्मफेअर पुरस्कार मिळाले आहेत . [ २ ] त्यांना 2004 मध्ये पद्मश्री आणि 2016 मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले गेले .खेर यांच्या इतर प्रशंसित भूमिकांमध्ये ए वेनस्डे! (2008), एमएस धोनी: द अनटोल्ड स्टोरी (2016) आणि द काश्मीर फाइल्स (2022); या त्यांच्या कलाकृती अविस्मरणीय ठरल्या. पुण्यातील फिल्म अंड टेलिव्हिजन ईनस्टीट्युट ऑफ इंडियाचे ते काहीकाळ संचालक होते.

# फेब्रुवारीतच राज्य तापणार !

**मुंबई:** राज्यासह देशाच्या उत्रेकडील राज्यांमध्ये पर्वतीय क्षेत्र वगळता मैदानी भागांमध्येही देखील आता तापमान वाढू लागले आहे. कमाल तापमानावाढ वाढ होत असल्याने फेब्रुवारी महिन्यातच उन्हाळ्याची चालून लागण्यास सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रासह दक्षिण व मध्य भारतातही तापमानवाढ होत असून हवामान विभागाच्या माहितीनुसार जानेवारीप्रमाणे राज्यात नागरिकांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागणार आहे. विशेषत: कोकण, मुंबई, पुणे, मध्य महाराष्ट्रात, विदर्भ, मराठवाड्यात तापमानात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

पुणे वेध शाळेने दिलेल्या माहितीनुसार फेब्रुवारी महिन्यात तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. 'वेस्टर्न डिस्टर्बन्स' अर्थात पश्चिमी झंझावाताचा परिणाम कमी झाल्याने मुंबईसह राज्यातील अनेक जिल्ह्यातील तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता पहाटे पडणारी थंडीसुद्धा गायब होणार आहे. तर उन्हाच्या झळा वाढणार आहेत.

फेब्रुवारी महिन्यात कमाल व किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहणार आहे. पुणे, मुंबई, किनारपट्टी व उत्तर व मध्य महाराष्ट्रात तापमान वाढणार आहे. तर उत्तर महाराष्ट्रात चार ते पाच दिवस तीव्र थंडी राहण्याची शक्यता आहे. सध्या प्रशांत महासागरात ला नीना स्थिती सक्रीय आहे. तर मध्य व पूर्व भागात तापमान सामान्य तापमानाच्या खाली आहे. एप्रिलच्या शेवटी ला नीना सक्रीय होण्याची शक्यता आहे.

## शहराची वाढती लोकसंख्या पाहता

# पाण्याचे स्रोत वाढविले जाणार !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शहराची वाढती लोकसंख्या पाहता पाण्याचे स्रोत वाढविले जात आहेत. आंद्रा धरणातून शंभर आणि भामा आसखेड धरणातून १६७ असे २६७ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी आणले जाणार आहे. या प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर असून डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होईल. त्यानंतर दररोज पाणीपुरवठा करण्याबाबतचा निर्णय शहराने घ्यावा,' अशी भूमिका महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी मांडली. आयुक्त शेखर सिंह यांनी सोमवारी 'द इंडियन एक्स्प्रेस' कार्यालयाला भेट दिली. त्या वेळी संपादकीय विभागाबरोबर झालेल्या संवादात ते बोलत होते. ते म्हणाले, 'नागरीकरण झपाट्याने वाढत असून शहराची लोकसंख्या २७ लाखांच्या घरात गेली आहे. महापालिका प्रतिदिन पवना धरणातून ५२० दशलक्ष लिटर (एमएलडी), आंद्रा धरणातून ८० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून १५ असे ६१५ दशलक्ष लिटर पाणी उचलते. परंतु, वाढत्या लोकसंख्येला दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी हे पाणीही अपुरे पडत आहे. त्यामुळे दिवसाआड पाणीपुरवठा करावा लागत आहे. आंद्रा धरणातून शंभर आणि भामा आसखेड धरणातून १६७ असे २६७ दशलक्ष लिटर पाणी आल्यानंतर दररोज पाणीपुरवठा करण्याबाबतचा निर्णय शहराने घ्यावा. या प्रकल्पाचे काम डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण होईल.

**पाण्याच्या पुनर्वापरावर भर**

'पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पावरील स्थगिती शासनाने उठविली आहे. त्याचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. खासगी टँकरवर महापालिकेचे नियंत्रण नाही. उन्हाळ्यात पाणी वितरण कमी केले जात नाही. पाण्याची मागणी वाढते. महापालिकेच्या पाण्यावर शंभर टक्के प्रक्रिया केली जाते. मोठ्या गृहनिर्माण संस्था टँकरचे पाणी पिण्यासाठी वापरत नाहीत. पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर देण्यात येणार असून शंभर एमएलडी क्षमतेचे प्रकल्प उभारले जाणार आहेत,' असे सिंह यांनी सांगितले.

**आणखी एक कचरा डेपो आवश्यक**

पुनावळे कचरा डेपोचा विषय संवेदनशील आहे. शहराला दुसऱ्या कचरा डेपोची आवश्यकता आहे. परंतु, त्याला विरोध आहे. नागरिकांशी संवाद साधला. पण, त्यांची समजूत काढण्यात यश आले नाही. डेपो रद्द झाल्याबाबत शासनाचे कोणतेही पत्र आले नाही. घर खरेदी करताना आसपास कोणते प्रकल्प येणार आहेत, याची माहिती नागरिकांनी घेतली पाहिजे. कोठे, कोणते आरक्षण प्रस्तावित आहे, याची माहिती विकास आराखड्यात असून हा आराखडा पालिकेच्या संकेतस्थळावर असल्याचेही त्यांनी सांगितले.

**मिळकतकरात वाढ नाही**

- ताथवडे, चिखली, किवळेत सांडपाणी प्रकल्पाचे काम सुरू
- विकास आराखड्यातील नवीन ३८ रस्त्यांचे काम हाती
- थेरगावात शंभर खाटांचे कर्करोग रुग्णालय
- देहूरोड कटक मंडळ महापालिकेत येणार नाही
- हिंजवडीचा महापालिकेत समावेश करण्याबाबत २०१६ मध्ये ठराव मंजूर
- मुळा नदी सुधारचे काम सुरू
- बीआरटी बंद केली जाणार नाही
- रेडझोन हद्दीचा अचूक नकाशा लवकरच
- हवा प्रदूषणाचा सामना करण्यासाठी श्रेणीबद्ध कृती प्रतिसाद योजना
- रात्री दहानंतर बांधकामांवर बंदी
- जीबीएसच्या रुग्णांसाठी थेरगाव, वायसीएम रुग्णालयात खाटा आरक्षित

#रा

# मुंबई महापालिकेनी मांडला ७४,४२७ कोटींचा अर्थसंकल्प

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई महापालिकेचा 2025-206 या वर्षासाठीचा अर्थसंकल्प आज, 4 फेब्रुवारी रोजी सादर करण्यात आला. मुंबई महापालिकेचा हा अर्थसंकल्प सकाळी ११ वाजता महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी सादर केले. २०२४-२५ या वर्षासाठी महापालिकेन ५९,९५४.७५ कोटी रुपयांचा बजेट सादर केला. भारतातील सर्वात श्रीमंत नागरी संस्था असलेल्या महापालिकेचा अर्थसंकल्प देशातील अनेक राज्यांपेक्षा जास्त आहे. मुंबईकरांना महापालिकेच्या अर्थसंकल्पाकडून खूप अपेक्षा आहेत. मुंबई महानगरपालिका मुंबईतील नागरिकांना रस्ते, पाणी, स्वच्छतागृहे, आरोग्य, वाहतूक, उड्डाणपूल, पर्यटन, पूल, शिक्षण आणि उद्याने अशा विविध सुविधा पुरवते.



### यंदा अर्थसंकल्पात 14 टक्क्यांनी वाढ

- महानगरपालिकेकडून अर्थसंकल्प सादर करताना सांगण्यात आले की, २०२५-२६ चा अर्थसंकल्प २०२४-२५ च्या अर्थसंकल्पापेक्षा १४.१९% वाढ झाली आहे. डिसेंबर २०२४ पर्यंत महानगरपालिकेचे एकूण उत्पन्न २८,३०८ कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचे निश्चित आहे, ज्यामध्ये जकात, विकास शुल्क आणि मालमत्ता कर यासारख्या प्रमुख स्रोतांमधून मिळणारे उत्पन्न समाविष्ट आहे. मुंबईत मूलभूत सुविधांच्या विकासासाठी ४३,१६२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### महानगरपालिकेसाठी अतिरिक्त निधी

या अर्थसंकल्पात राज्य सरकारला २५:७५ च्या आधारावर अतिरिक्त एफएसआय प्रीमियमच्या २५% रक्कम बीएमसीला देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे महापालिका ७० कोटी रुपयांची अतिरिक्त रक्कम मिळाली आहे. या अर्थसंकल्पातून असा अंदाज लावण्यात आला आहे, की २०२५ ते २६ या कालावधीत ३०० कोटी रुपयांचे अतिरिक्त योगदान असणार आहे.

### आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांनाही टॅबलेट मिळतील!

बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) शाळांमध्ये गेमिफाइड लर्निंग उपक्रमाचा विस्तार करणार आहे, ज्यामुळे या योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढेल. सुरुवातीला १९,४०१ टॅब्लेट पुरवण्यासाठी असलेला हा कार्यक्रम आता ८ वी आणि ९ वी मध्ये शिकणाऱ्या ३२,६५९ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेल.

### बेस्ट एंटरप्रायझेससाठी आर्थिक सहाय्य

बीएमसीच्या अर्थसंकल्पात बेस्ट (बेस्ट) उपक्रमाला आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. २०१२-१३ ते जानेवारी २०२५ पर्यंत, बीएमसीने बेस्टला एकूण ११,३०४.५९ कोटी रुपयांची मदत दिली आहे. चालू प्रकल्प आणि महत्त्वाच्या उपक्रमांसाठी स्वतःच्या मोठ्या निधीची आवश्यकता असूनही, बीएमसीने २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात बेस्टसाठी ₹१,००० कोटींचे अनुदान प्रस्तावित केले आहे.


### पर्यावरणाचीही काळजी घेतली

याशिवाय, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील जीएमएलआर बोगद्यात वाघांचे स्मारक बांधण्याची बीएमसीची योजना आहे, ज्यासाठी ११३ कोटी रुपयांचे बजेट देण्यात आले आहे. मुंबई महानगरपालिकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सादर केला आहे, जो ७४,४२७.४१ कोटी रुपये आहे, जो मागील वर्षाच्या अर्थसंकल्पापेक्षा १४.१९% जास्त आहे आणि मुंबईच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ४३,१६२ कोटी रुपयांची तरतूद आहे.

मुंबई महानगरपालिकेचे (BMC) बजेट देशातील अनेक राज्यांपेक्षा जास्त आहे, त्यामुळे मुंबईकरांना केंद्रीय अर्थसंकल्पाकडून असलेल्या अपेक्षांप्रमाणेच अपेक्षा आहेत. मुंबई महानगरपालिका मुंबईकरांना पाणी, रस्ते, स्वच्छतागृहे, शौचालये यासारख्या आवश्यक सुविधा पुरवते आणि पूल, उड्डाणपूल, पर्यटन, शिक्षण आणि उद्याने यासारख्या सुविधा देखील पुरवते.

## At a Glance

### आदित्य ठाकरे यांचे विश्वासू, सूरज चव्हाण यांना जामीन



**मुंबई :** - मुंबई महानगरपालिकेतील कथित खिचडी घोटाळ्याप्रकरणी ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांच्या निकटवर्तीय सूरज चव्हाण यांना मुंबई उच्च न्यायालयाने आज (०४ फेब्रुवारी २०२४) जामीन मंजूर केला. न्यायाधीश मिलिंद जाधव यांच्या एकलपीठाने हा निर्णय दिला. सूरज चव्हाण यांना कथित खिचडी घोटाळा प्रकरणात अटक करण्यात आली असून ते १७ जानेवारी २०२४ पासून तुरुंगात आहेत. वर्षभरानंतर चव्हाण यांची कारागृहातून सुटका होणार आहे.

सूरज चव्हाण यांना १७ जानेवारी २०२४ रोजी कोरोना काळातील खिचडी घोटाळा प्रकरणात अटक करण्यात आली. तेव्हापासून ते तुरुंगात होते. सत्र न्यायालयातील विशेष न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांच्या एकलपीठाने चव्हाण यांची याचिका मान्य करून अखेर त्यांना जामीन मंजूर केला.चव्हाण यांनी अटकेला आणि त्यानंतर सुनावण्यात आलेल्या कोठडीला आव्हान दिले आहे. त्यावरील सुनावणी उच्च न्यायालयाच्या खंडपीठापुढे प्रलंबित आहे.

## राहुल सोलापूरकर विरोधात शिवप्रेमींमध्ये संतापाची लाट



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाबद्दल वादग्रस्त विधान करणारे अभिनेता राहुल सोलापूरकर याच्यावर टीकेची झोड उठली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नेते जितेंद्र आव्हाड, अमोल मिटकरी व रिपब्लिकन पक्षाचे सचिन खरात यांनी सोलापूरकर यांच्यावर जहरी टीका केली आहे. सोलापूरकरनं महाराष्ट्राची माफी मागावी, अशी मागणी आव्हाड यांनी केली आहे. शिवाजी महाराज लाच देऊन आग्र्याहून सुटून आले होते. मिठाईच्या पेटाऱ्यातून सुटले ही दंतकथा आहे. त्यावेळी पेटारे वगैरे काही नव्हतं, असं राहुल सोलापूरकर एका पॉडकास्टमध्ये बोलताना म्हणाला होता. त्याच्या या वक्तव्यानंतर शिवप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

### हा महाराजांची उंची कमी करण्याचा प्रयत्न - आव्हाड

- 'हिरकणी झालीच नव्हती. हिरकणी नावाचं व्यक्तिमत्व अस्तित्वातच नव्हतं. छत्रपती शिवाजी महाराज हे आग्र्याहून लाच देऊन निघाले, अशा पद्धतीनं इतिहासाचे विकृतीकरण करणारा हा राहुल सोलापूरकर कोण महामूर्ख? हा मूर्ख माणूस सध्या महाराष्ट्राला इतिहासाचे डोस पाजतोय. छत्रपती शिवाजी महाराजांची उंची कमी करण्याचा हा अश्लाघ्य प्रयत्न अशा या फडतूस माणसांकडून केला जातोय, त्याचा निषेध करावा तेवढा कमीच आहे. या महामुर्खानं आपल्या तोंडाला टाळं लावावं. शिवप्रेमी हे फार सहन करणार नाहीत अन् हिरकणी बुरूज कुठं आहे, हे याला रायगडावर नेऊन दाखवावं लागेल, असा इशारा आव्हाड यांनी दिला आहे. ह्यानं महाराष्ट्राची माफी मागावी, अशी मागणी आव्हाड यांनी केली आहे.

# टोलबाबतही सरकार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत


## केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरींनी टोलमध्ये सवलत देण्याचे दिले संकेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** १२ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावरील कर माफ केल्यानंतर केंद्र सरकार आता टोलबाबतही मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी मंगळवारी टोलमध्ये सवलत देण्याचे संकेत दिले आहेत. तसंच नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून प्रदूषण आणि वाहतुकीची समस्या कमी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यासाठी अनेक नवीन प्रकल्प सुरू केले जात आहेत. गडकरी म्हणाले की, लोकांना मोठा दिलासा देणारी एक योजना सरकार लवकरच आणणार आहे. त्यांच्या सेवेचा अभ्यास पूर्ण झाला आहे. ही योजना लवकरच उघड केली जाईल. ही योजना अशी असेल की ती सर्वांना मोठा दिलासा देईल.

- पाच वर्षांत दिल्लीत एकही डिझेल बस दिसणार नाही, सर्व बस इलेक्ट्रिक बसवर धावतील.
- माझ्याकडे १००% इथेनॉलवर चालणारी गाडी आहे.
- टाटा, सुझुकी, महिंद्रा, सुझुकी इत्यादी कंपन्याही इथेनॉलवर चालणारी वाहने आणत आहेत.
- डिझेल, पेट्रोल, कार, ट्रक आणि बसची किंमत सारखीच असेल.
- येत्या काळात देशात दरवर्षी १ लाख इलेक्ट्रिक बसेस तयार केल्या जातील

नितीन गडकरी म्हणाले, "रेवडी घेणाऱ्यांची संख्या वाढली आहे, म्हणूनच रेवडी दिली जात आहे. जेव्हा जनता ठरवेल रेवडी नाही तर धोरणांवर मतदान करतील, त्यावेळी रेवडी प्रभावी राहणार नाही. कर सवलतीनंतर आता टोलवरही मदत योजना येणार आहे, गडकरींनी काय संकेत दिले ते जाणून घ्या. नितीन गडकरी म्हणाले की, सरकार लवकरच अशी योजना आणणार आहे, लवकरच लोकांना टोलवर मोठी सवलत मिळेल असे नितीन गडकरी म्हणाले.ज्यामुळे लोकांना मोठा दिलासा मिळेल.




टोल रद्द केला जाईल की कमी केला जाईल या प्रश्नावर गडकरी यांनी सस्पेन्स कायम ठेवला. ही योजना लवकरच जाहीर केली जाईल, असे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, सरकार उपग्रह आधारित टोल प्रणालीवर काम करत आहे. यावरही काही निर्णय घेतला जाईल, परंतु ही योजना यापेक्षा वेगळी असेल. येत्या काही दिवसांत टोलबाबत लोकांचा असंतोष दूर होईल, असे ते म्हणाले.

माझी अनेक व्यंगचित्रेही प्रकाशित झाली आहेत. सोशल मीडियावर अनेक लोक ट्रोल करतात. टोलबद्दल लोक थोडे संतापले आहेत. मी एवढेच म्हणू शकतो की टोलबद्दलचा राग काही दिवसांत दूर होईल.

# मतदान यादीत ७० लाख मतदार अचानक कसे वाढले? - राहुल गांधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली- :** काँग्रेस खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदींवर चांगलेच भडकल्याचे पाहायला मिळाले. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवरून त्यांनी थेट नरेंद्र मोदींवर गंभीर आरोप केले. यामुळे लोकसभेतील वातावरणही चांगलेच तापले होते. राहुल गांधी म्हणाले, "लोकसभा निवडणूक आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणूक यामधील काही महिन्यांच्या कालावधीत राज्यातील मतदार संख्या हिमाचल प्रदेशाच्या लोकसंख्येइतकी वाढली होती.



मी या सभेचं लक्ष महाराष्ट्रातील निवडणुकीसंबंधी काही डेटा कडे आकर्षित करू इच्छितो. लोकसभा निवडणूक आणि विधानसभा निवडणूक यामधील कालावधीत, हिमाचल प्रदेशाच्या लोकसंख्येइतके लोक महाराष्ट्राच्या मतदान यादीत जोडले गेले. साधारणपणे 70 लाख नवीन मतदार अचानक जोडण्यात आले." महाराष्ट्रात ज्या प्रमाणात पाच वर्षांत मतदार यादीत वाढ झाली नाही, त्यापेक्षा अधिक मतदार पाच महिन्यांत जोडले गेले." शिरडीच्या एका मतदान केंद्रावर 7,000 मतदार जोडले गेले. लक्षणीय बाब म्हणजे, हे नवीन मतदार बहुतेक त्या मतदारसंघांमध्ये जोडले गेले, जिथे भाजपाला सर्वाधिक मते मिळाली. मी आरोप करत नाही, पण निवडणूक आयोगाने महाराष्ट्र निवडणुकीचे डेटा काँग्रेस, शिवसेना आणि NCP ला उपलब्ध करून द्यायला हवेत,असे ही राहूल गांधी म्हणाले.

### सिग्नलमधील बिघाडामुळे मध्य रेल्वे विस्कळीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील सिग्नल यंत्रणेत तांत्रिक बिघाड झाल्यामुळं मुंबईतील लोकल सेवा विस्कळीत झाली आहे. तासाभरानंतर बिघाड दुरुस्त करण्यात आला असला तरी या मार्गावरील गाड्या उशिरानं धावत आहेत. ठाणे जिल्ह्यातील दिवा ते मुंब्रा रेल्वे स्थानकांदरम्यान पहाटे पावणेचार वाजता सिग्नल यंत्रणेत बिघाड झाला. त्याचा फटका लोकल सेवेला बसला. उपनगरीय गाड्या किमान १५ ते २० मिनिटे उशिरानं धावत होत्या.

मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला यांनी याबाबत सविस्तर माहिती दिली आहे. बिघाड झाल्यानंतर तासाभरानंतर सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास सिग्नल बसविण्यात आला.

### धूराचे लोट :

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



जेनिन पॅलेस्टिनी प्रदेश: इस्रायलच्या ताब्यातील वेस्ट बँकमधील जेनिनमध्ये इस्रायली हल्ल्यानंतर निघालेले धूराचे लोट.


### मालगाड्यांची टक्कर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**फतेहपूर :** उत्तर प्रदेशच्या फतेहपूर जिल्ह्यातील पंभीपूर जवळ दोन मालगाड्यांची टक्कर झाली. या अपघातात भारतीय रेल्वेच्या दोन अधिकाऱ्यांना किरकोळ दुखापत झाली. टकरीच्या परिणामस्वरूप गार्ड कोच आणि इंजिन रुळावरून घसरले. ही घटना मंगळवारी सकाळी घडल्याची माहिती मिळाली आहे. या दुर्घटनेमुळे अपलाइनवरील रेल्वे वाहतूकही विस्कळीत झाली. मिळालेल्या माहितीनुसार, प्रभावित विभाग साफ करण्याचे आणि रेल्वे वाहतूक पूर्ववत करण्याचे बचाव व पुनर्बांधणी कार्य सुरू आहे. सामुदायिक आरोग्य केंद्र (सीएससी)चे डॉक्टर सुभाष दुबे यांनी सांगितले, "दोन जखमींना उपचारासाठी आणण्यात आले होते. ते सकाळी ७ वाजता आमच्या सीएससीमध्ये पोहोचले. त्यांना फारशी गंभीर दुखापत नव्हती, त्यामुळे त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून सोडण्यात आले.

# घरगुती वीज आता एक रुपयाने होणार स्वस्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नागपूर :** महावितरणने घरगुती ग्राहकांचे वीज दर टप्प्याटप्प्याने कमी करण्याची एमईआरसीला परवानगी मागितली आहे. दिवसा वीज वापरावर सवलत देण्याचा हा प्रस्ताव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सौरऊर्जेपासून वीज उत्पादनात वाढ झाल्याने विजेचे दर कमी करणे शक्य होणार आहे. तसेच सौरऊर्जेमुळे दिवसा वीज मिळेल. अशा परिस्थितीत घरगुती वीज ग्राहकांनी सकाळी 9 ते संध्याकाळी 5 या वेळेत वापरलेल्या विजेवर 80 पैसे ते 1 रुपये प्रति युनिट सवलत मिळणे शक्य झाले आहे. महावितरणने एमईआरसीला दिलेल्या प्रस्तावात 5 वर्षांमध्ये 80 पैसे प्रति युनिट, 2026-27 मध्ये 85 पैसे, 2027-28 मध्ये 90 पैसे, 2028-29 मध्ये 95 पैसे आणि 2029-30 मध्ये एक रुपया अशी सूट दिल्यास ही सूट 1 एप्रिल 2025 पासून लागू होईल. वीज किती वाजता वापरली हे सांगण्यात आले आणि त्यानुसार दरात सूट देणे याला तांत्रिक भाषेत टीओडी म्हणतात. आत्तापर्यंत ही सुविधा फक्त उद्योगांसाठी लागू होती, पण आता ती देशांतर्गत ग्राहकांसाठी लागू होणार आहे.

दरम्यान, घरगुती ग्राहकांनी दिवसा गृहोपयोगी उपकरणे आणि मशीनचा वापर केल्यास त्यांना या सुविधेचा चांगला लाभ मिळू शकेल. यासाठी महावितरणकडून टीओडी मीटर मोफत बसविण्यात येणार असल्याचे सूत्राने सांगितले.

# मराठी उद्योजक ग्लोबल होताहेत ही आनंदाची बाब!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मराठी उद्योजक गेल्या काही वर्षांमध्ये जगभरात आपल्या कार्यकर्तृत्वाचा डंका वाजवत आहेत. डाओससारख्या ठिकाणी जाऊन मराठी उद्योजक आपले औद्योगिक करारमदार करीत आहेत. मराठी उद्योजक आता ग्लोबल होत असून, ही अतिशय आनंदाची बाब आहे, असे प्रतिपादन राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केले.

सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टच्या वतीने उद्योग दिंडी उपक्रम आयोजित करण्यात आला. ही उद्योग दिंडी श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आळंदी येथून निघाली असून, ती पुढे पंढरपूरला पोहोचणार आहे. यानिमित्ताने पुण्यातील बावधनमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाच्या निमित्ताने संपूर्ण मराठमोळ्या वातावरणात मराठी उद्योजकांच्या मांदियाळीचे दृश्य फारच मनमोहक होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचे संस्थापक महादेवराव भिडे यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या उदघाटनाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते.



# आता लवकरच पाहायला मिळणार ब्लड मूनचे सौंदर्य

### ग्रहण

**भारतात दिसेल का?**
**भारतात राहणाऱ्या अवकाशप्रेमींसाठी एक निराशाजनक बातमी आहे. वर्षातील पहिले चंद्रग्रहण भारत आणि त्याच्या शेजारील देशांमध्ये दिसणार नाही. हे घडत आहे कारण जेव्हा चंद्रग्रहण होत असेल तेव्हा तो दिवस भारतात असेल. अशा स्थितीत चंद्रग्रहण पाहणे शक्य होणार नाही. त्याचा पूर्णत्वाचा मार्ग युरोप, आशिया, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, उत्तर आणि दक्षिण अमेरिका या भागातून जाईल.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** 2025 वर्षातील पहिले चंद्रग्रहण 14 मार्च रोजी होणार आहे, जे जगभरातील खगोलशास्त्रज्ञ आणि अंतराळ प्रेमींसाठी एक विलोभनीय दृश्य सादर करेल. हे संपूर्ण चंद्रग्रहण असेल, ज्या दरम्यान पृथ्वीची सावली चंद्राला पूर्णपणे झाकून टाकेल. यामुळे चंद्र गडद लाल रंगात दिसेल. या घटनेला 'ब्लड मून' म्हणतात. १४ मार्चला वर्षातील पहिले चंद्रग्रहण केव्हा होईल आणि ते कुठे पाहता येईल हे जाणून घेऊया, पण त्याआधी चंद्रग्रहणाबद्दल जाणून घेऊया. चंद्रग्रहण ही एक खगोलीय घटना आहे जी सूर्य, पृथ्वी आणि चंद्र अनुक्रमे संरेखित झाल्यावर उद्भवते. मध्यभागी असलेल्या स्थानामुळे पृथ्वीची सावली चंद्रावर पडते. 2025 चे पहिले चंद्रग्रहण मार्च महिन्यात होणार आहे, जे ब्लड मून असेल.



चंद्रग्रहण ही एक खगोलीय घटना आहे जी सूर्य, पृथ्वी आणि चंद्र अनुक्रमे संरेखित झाल्यावर उद्भवते.

- **उपांत्य ग्रहण सुरू** – भारतीय वेळेनुसार सकाळी 9.27 (IST)
- **आंशिक ग्रहण सुरू होते** – सकाळी 10.39 (IST)
- **एकूण चंद्रग्रहण सुरू** – सकाळी 11.56 (IST)
- **कमाल ग्रहण**- दुपारी 12.28 (IST)
- **एकूण चंद्रग्रहण संपेल** – दुपारी 1.01 (IST)
- **आंशिक चंद्रग्रहण संपेल** – दुपारी 2.17 (IST)
- **पेनम्ब्रल चंद्रग्रहण समाप्त** – दुपारी 3.30 (IST)

मध्यभागी असल्यामुळे चंद्रावर पृथ्वीची सावली पडते, त्यामुळे चंद्राचा रंग बदलतो आणि तो वेगळा दिसतो. चंद्रग्रहणाचे तीन प्रकार आहेत, संपूर्ण चंद्रग्रहण, पेनम्ब्रल चंद्रग्रहण आणि आंशिक चंद्रग्रहण. 14 मार्च रोजी होणारे ग्रहण संपूर्ण चंद्रग्रहण असेल. नासाच्या म्हणण्यानुसार, वर्षातील पहिले चंद्रग्रहण सहा तासांपेक्षा जास्त काळ राहणार आहे. या काळात ते पेनम्ब्रा, आंशिक आणि संपूर्ण ग्रहण या टप्प्यांतून जाईल.

Selected

## रांजणगावात ट्रकमध्ये अडकलेल्या माकडाच्या पिल्लाची सुटका



**शिक्रापूर :** रांजणगाव गणपती ता. शिरुर येथील औद्योगिक वासहतीमध्ये एका ट्रकमध्ये अडकलेल्या माकडाच्या पिल्लाची सुटका करत त्याला नैसर्गिक आदिवासात सोडण्यात प्राणीमित्रांना यश आले आहे. रांजणगाव गणपती ता. शिरुर येथील औद्योगिक वासहतीमध्ये एका कंपनीत आलेल्या कंटेनरमध्ये एका माकडाचे पिल्लू घाबरुन बसलेले असल्याची माहिती प्राणीमित्रांना मिळाली त्यांनंतर निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख, वन्य पशु पक्षी संरक्षण सामाजिक संस्थेचे तालुकाध्यक्ष श्रीकांत भाडळे, नितीन वाळिंबे यांनी तेथे धाव घेत सदर माकडाला ताब्यात घेत, दरम्यान प्राणीमित्रांनी याबाबची माहिती शिरुर वनविभागाच्या नियतक्षेत्र अधिकारी वंदना चव्हाण यांना देत सदर माकडाच्या पिल्लाला निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे संचालक सिकंदर शेख, अमोल कुसाळकर, शुभम वाघ, प्रणव गायकवाड यांसह आदींच्या उपस्थितीत नैसर्गिक आदिवासात मुक्त करण्यात आले.

## वृत्तपत्र विक्रेत्या आशा तागड यांचा सत्कार



**रांजणी :** शिंगवे (ता.आंबेगाव)येथील वृत्तपत्र वितरक व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या माजी उपाध्यक्षा आशा योगेश तागड यांचा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. आशा तागड यांचे शाळेसाठी कायमच योगदान असते.शाळेच्या प्रत्येक उपक्रमात त्यांचा सहभाग असतो.शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी त्यांचे नेहमी शाळेतील शिक्षकांना मार्गदर्शन लाभते. त्यांची कन्या आदिती योगेश तागड हिच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील मुलांना खाऊ वाटप करण्यात आले.त्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक नवनाथ सिनलकर, धनंजय पवार, जालिंदर पोंदे, राजेंद्र बोंबे, स्वाती सोनवणे, सुषमा कदम,योगिता बुट्टे, संगीता शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

## शिक्रापूर पोलिसांनी रोखला कोरेगाव भिमातील बालविवाह

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा ता. शिरूर येथे एका सोळा वर्षीय अल्पवयीन युवतीचा बालविवाह होणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर शिक्रापूर पोलिसांचे पथक तसेच ग्रामविकास अधिकारी यांनी बालविवाह रोखत अल्पवयीन युवतीची होणाऱ्या बालविवाहातून सुटका करत पालकांना समज दिली आहे. कोरेगाव भीमा ता. शिरूर येथे एका सोळा वर्षीय अल्पवयीन युवतीचा तिचे पालक सदर युवती अल्पवयीन असल्याचे माहिती असताना देखील ३ फेब्रुवारी रोजी विवाह करणार असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख यांना मिळाली त्यांनतर सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख, पोलीस हवालदार नवनाथ नाईकडे, महेंद्र पाटील, महिला पोलीस शिपाई रुपाली खोटे, ग्रामविकास अधिकारी श्रीकांत वाव्हळ, पोलीस पाटील मालन गव्हाणे, आशा सेविका कविता कांबळे यांनी विवाहस्थळ गाठले, दरम्यान ग्रामविकास अधिकारी श्रीकांत वाव्हळ यांनी महिला व बाळ विकास अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधत बालविवाह बाबत फॉर्म व माहिती भरुन घेत नवरदेव मुलगा, त्याचे आई वडील, भाऊ, मामा, अल्पवयीन नवरी युवतीसह तिचे आई वडील, चुलते व नातेवाईक यांची नावे लिहून घेत नवरी व नवरदेव यांचे ओळखपत्र घेऊन सदर बालविवाह रोखून पालक व नातेवाईक यांना बालविवाह करण्यापासून परावृत्त केले, तसेच अल्पवयीन युवतीचा विवाह करणे म्हणजे बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत दखलपात्र गुन्हा असल्याची संपूर्ण माहिती देत अल्पवयीन युवती अठरा वर्षाची पूर्ण होई पर्यंत विवाह न करण्याबाबत समज दिली त्यावेळी सदर अल्पवयीन युवतीच्या पालकांनी विवाह करणार नसल्याचे सांगत त्याप्रमाणे पोलिसांना लेखी स्वरुपात जबाब देखील लिहून दिले आणि त्यानंतर होणारा विवाह हा रद्द झाला असून शिक्रापूर पोलिस तसेच कोरेगाव भीमाचे ग्रामविकास अधिकारी यांच्या सतर्कतेमुळे अल्पवयीन युवतीचा बालविवाह रोखला गेला आहे.

## सणसवाडीत चाकूच्या धाकाने युवतीचा मोबाईल लांबवला

**शिक्रापूर:** सणसवाडी ता. शिरुर येथील हॉटेल भाऊचा धक्का येथे रात्रीच्या सुमारास पायल लोहार हि युवती उभी असताना दुचाकीहून आलेल्या अज्ञात तीन युवकांनी पायल हिला चाकूचा धाक दाखवून तिच्या हातातील मोबाईल हिसकावून घेत कोरेगाव भीमा बाजूने पळून गेले, याबाबत पायल संतोष लोहार वय १९ वर्षे रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. पाडळोशी ता. पाटण जि. सातारा या युवतीने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी तीन अज्ञात युवकांवर गुन्हा दाखल केलाआहे.

# धामणीच्या शेतकऱ्यांनी घडविली जलक्रांती

## 'शेतताळ्याचे गाव' म्हणून निर्माण झाली धामणीची ओळख

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



लोणी-धामणी धामणी (ता.आंबेगाव ) येथील शेतकर्यांनी दुष्काळावर मात करून उपसा सिंचनाच्या माध्यमातून शेततळ्यात सोडलेले पाणी.

**पुणे : लोणी-धामणी :** धामणी (ता. आंबेगाव ) दुष्काळी गाव म्हणून ओळख असणार्या या गावातील नागरीकांनी एकत्र येत गाव पाणीदार करण्यासाठी कंबर कसली आहे. गावात ४५ शेतकर्यांनी शेततळी तयार केली असून या तळ्यांमध्ये लाखो लीटर पाणी साठवले जात आहे.याचा उपयोग उन्हाळ्यातही पिकांसाठी होत आहे.तर काही शेतकर्यांनी एकत्र येत कोणत्याही शासकीय मदतीशिवाय डिंभे धरणाच्या उजव्या कालव्यावर सामूहिक सिंचन योजना राबवून शेकडो एकर जमीन ओलिताखाली आणून जलक्रांती घडवून आणली आहे. त्यामुळे धामणीची ' शेतताळ्याचे गाव ' म्हणून ओळख निर्माण झाली आहे. धामणी गावाचे वैशिष्ट्ये म्हणजे प्रत्येक गावात पाण्यासाठी आड आहेत. त्यातील आड आजही सुस्थितीत आहे. पूर्वीच्या काळी आडाला पाणी चांगले असल्याचे आजूबाजूच्या चार- पाच घरांची पाण्याची गरज एका आडावर भागत होती. कालंताराने कधी पावसाचे प्रमाण कमी झाल्याने तसेच भूगर्भातील पाणीपातळी खोल जाऊ लागल्याने आडातील पाणी कमी होऊन आड कोरे पडू लागले. परिणामी अनेक वर्षापासून या परिसरात दुष्काळ पडू लगला. विहीरी व आड कोरडे पडल्याने पाण्यासाठी येथील नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून रहावे लागत आहे. बंद आडाची दुरुस्ती करून पुन्हा पाणी येऊन निदान बाजारपेठेतील कुटुंबाची तहान भागू शकते असे सरपंच रेश्मा अजित बोर्हाडे व माजी सरपंच सागर जाधव यांनी सांगितले. अशा परिस्थितीत चाडदरा येथील तब्बल साठ कुटुंबांनी एकत्र येत ' सागरदरा उपसा सिंचन योजना ' या नावाने संस्था स्थापन करून त्या माध्यमातून कुठलीही सरकारी आर्थिक मदत न घेता अंदाजे सव्वा कोटी रुपये खर्च करून जिरायती भागात जलक्रांती घडवून आणली आहे.या योजनेच्या माध्यमातून आणलेले पाणी धनगरदरा पाझर तलावात सोडण्यात येणार आहे. त्याचा फायदा तलावाच्या खालच्या भागात असलेल्या २५ ते ३० शेतकर्यांच्या विहिरींना व विंधन विहिरींना होणार असल्याचे सोमनाथ जाधव यांनी सांगितले.

● या जलक्रांती साठी माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभागीय अधिकारी विष्णू गायकवाड यांनी बँकेच्या माध्यमातून योजनेमध्ये सहभागी शेतकर्यांना बँकेच्या वतीने आर्थिक मदत मिळवून दिली. त्यामुळे हि पाणी योजना यशस्वी झाली. - सोमनाथ जाधव-सागरदरा उपसा सिंचन योजना संस्थापक

## राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या अध्यक्षपदी प्रा.डॉ.संजय शिंदे



**लोणी-धामणी :** महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाची राज्य कार्यकारणीची सभा वाडीया कॉलेज, पुणे येथे संपन्न झाली. यावेळी महासंघाचे नूतन कार्यकारिणी निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. पंडीतराव पाटील (पुणे) सहायक निवडणूक अधिकारी प्रा. शिवाजीराव जगताप (ठाणे) व प्रा.बी.ए.पाटील (धुळे) व निरीक्षक प्रा.एस.टी.पवार (पुणे) यांनी कामकाज पाहिले. राज्य कार्यकारणी ची निवडणूक बिनविरोध व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली अशी माहिती महासंघाचे सरचिटणीस प्रा. संतोष फाज गे यांनी दिली आहे. राज्यकार्यकारणी पुढील प्रमाणे. प्रा.डॉ. संजय शिंदे (नाशिक )-राज्याध्यक्ष, प्रा.लक्ष्मण रोडे (पुणे)-सरचिटणीस, प्रा.रविंद्र भदाणे (मुंबई )-उपाध्यक्ष, प्रा.शिवराम सुर्यवंशी (लातूर)-उपाध्यक्ष, प्रा.रवी पाटील (संभाजीनगर)-उपाध्यक्ष, प्रा.अविनाश बोर्ड (अमरावती )-कार्याध्यक्ष, प्रा.अशोक गव्हाणकर( नागपूर)-कोषाध्यक्ष, प्रा.दिलीप शितोळे (कोल्हापूर)-सहसचिव, प्रा.मुकुंदराव आंधळकर(मुंबई)-समन्वयक, प्रा.संतोष फाजगे (पुणे )-सल्लागार. सर्व नूतन कार्यकारणीचे महासंघाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. कनिष्ठ महाविद्यालयीन (ज्यूनिअर कॉलेज ) पातळीवर अनेक अध्यापकांचे अनेक प्रश्न आहेत. विद्यार्थी संख्येचा प्रश्न आहे.तसेच इतर अनेक कामे आहेत ती कामे सोडवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील.असे प्रा.लक्ष्मण रोडे-सरचिटणीस, राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन महासंघ म्हणाले.

## कचरा व्यवस्थापनासाठी पारगावला भीमाशंकर कारखाना मदत करेल

### माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** "पारगावचा दिवसेंदिवस विस्तार झपाट्याने वाढत चालला आहे . आता पारगाव मधिल नागरिकांना कचऱ्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. ग्रामपंचायतीने यामध्ये लक्ष घालून कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी नियोजन करावे.यासाठी भीमाशंकर कारखाना मदत करेल "अशी ग्वाही माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिली.

पारगाव (ता.आंबेगाव ) येथे एका कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी वळसे पाटील बोलत होते. यावेळी ,बाजार समितीचे संचालक शिवाजीराव ढोबळे , नीलेश थोरात,शरद बँकेचे संचाaलक दौलतभाई लोखंडे,भीमाशंकर कारखान्याचे संचालक रामहरी पोंदे, ज्ञानेश्वर अस्वारे,पारगावच्या सरपंच श्वेता ढोबळे,सिताराम लोंढे ,सुनील बाणखेले, मंगेश बाणखेले, भागचंद पोंदे आदी मान्यवर ,ग्रामस्थ उपस्थित होते.

वळसे पाटील पुढे म्हणाले "भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यामुळे पारगाव बाजारपेठ नावारुपाला आली आहे. अष्टविनायक महामार्ग, घोडनदी वरिल पूल, नवीन होणाऱ्या शिक्रापूर - अवसरी फाटा रस्त्यामळे या परिसरात वाहतूक आणखी वाढणार आहे. आता पारगाव मध्ये कचऱ्याची समस्या निर्माण झाली आहे. यासाठी भीमाशंकर कारखाना निश्चित मदत करेल.

## दागिने चोरी प्रकरणातील आरोपीस अटक

**रांजणगाव :** नितीन मुरलीधर मिटकरी राहणार चंदन नगर पुणे यास रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी अटक करून सात दिवसाची पोलीस कोठडी दिली असल्याचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी सांगितले.

शिरुर बाजार समितीचे माजी उपसभापती व शिरूर -आंबेगाव राष्ट्रवादी काँग्रेस चे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर यांच्या एका वाहनावर नितीन मिटकरी चालक होता पाचुंदकर यांच्या पत्नी ज्योती या काही कामाच्या निमित्ताने त्यांच्या कारमधून गेलेल्या असताना त्यांनी त्याचे दहा तोळे वजनाचे सोन्याचे गंठण पर्समध्ये ठेवून पर्स कार मध्ये ठेवली, त्यावेळी चालक कारमध्येच होता, काम आटोपून ज्योती पाचुंदकर पुन्हा कारमध्ये बसून घरी आल्यानंतर त्यांनी पर्सची पाहणी केली असता पर्समध्ये दागिने नसल्याचे निदर्शनास आले नसल्याने चालकाने दागिने चोरी केल्याबाबतचा अंदाज पाचुंदकर यांनी वर्तविला आणि याबाबत मानसिंग नानाभाऊ पाचुंदकर यांनी रांजणगाव एमआयडीस पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी नितीन मुरलीधर मिटकरी याच्यावर गुन्हा दाखल केला होता.

## आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी राजे नाईक यांना अभिवादन

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी:** आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजीराजे नाईक यांच्या 193 व्या पुण्यतिथीनिमित्त श्री खंडोबा मंदिर पायरी मार्गावरील सपुतळ्यास श्री मार्तंड देवसंस्थान विश्वस्त मंडळ व जेजुरी शहरातील रामोशी समाज बांधवानी पुष्पवृष्टी करुन दिली मानवंदना. श्री मार्तंड देवसंस्थान व जेजुरी शहरातील रामोशी बांधवांच्या वतीने जेजुरी गडावरील आद्य क्रांतिवीर उमाजीराजे नाईक यांच्या पुतळ्याचे पूजन करून भंडारा व पुष्पवृष्टी करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी श्री मार्तंड देवसंस्थान चे विश्वस्त अड पांडुरंग थोरवे,मंगेश घोणे,पोपट खोमणे,भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सचिन पेशवे,रवींद्र खोमणे तसेच भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते.



जेजुरी जेजुरी गडावर आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजीराजे नाईक यांच्या 193 व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करताना

## आदिवासी सांस्कृतिक महासंमेलन म्हणजे ऊर्जेचा स्त्रोत : डॉ. संतोष सुपे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** देशभरातून जमा होणारा लाखो आदिवासीचा मेळा म्हणजे आदिवासींमध्ये असलेल्या सामाजिक व सांस्कृतिक ऊर्जेचा प्रचंड मोठा स्त्रोत आहे. तरुणाईची ऊर्जा जर सामाजिक चळवळीमध्ये उतरली तर आदिवासींची सामाजिक आणि राजकीय दिशा बदलल्याशिवाय राहणार नाही. जल जंगल जमिनीचे संरक्षण आणि सामाजिक व संविधानिक न्याय हक्क हे तरुणांना भविष्यामध्ये अस्तित्वाची लढाई लढण्यासाठी चे मूलभूत प्रश्न आहेत.त्यासाठी रस्त्यावरच्या लढाई बरोबरच न्यायालयीन लढाया सुद्धा लढाव्या लागणार आहेत, असे प्रतिपादन साकुर्डी (ता. खेड) येथील



एस. एम. सुपे मेमोरियल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. संतोष सुपे यांनी पानखेडा (धुळे) येथे आदिवासी सांस्कृतिक एकता महासंमेलनाच्या 'सामाजिक व न्यायालयीन लढाईत युवकांचे योगदान' या परिसंवादात व्यक्त केले.

यावेळी सात राज्य व पाच देशातील प्रतिनिधींसोबत लाखोंच्या संख्येने आदिवासी समाज उपस्थित होता. याप्रसंगी पुण्यातून डॉ. मंगल सुपे, डॉ.राहुल जोशी, सतीश लेंभे, सुरेखा लेंभे, गौरी लांघी, सीता किरवे, राजू ठोकळ, सविता दगडे आदी उपस्थित होते.

डॉ. सुपे पुढे म्हणाले की, आदिवासी संस्कृतीचे वैभव, कलात्मक प्रतिभा, आदिवासींच्या अस्तित्वाची आव्हाने, आदिवासींच्या पारंपारिक ज्ञानाचे जतन, संरक्षण व संवर्धन करावे लागणार आहे. बदलत्या काळामुळे नष्ट होण्याच्या मार्गावरील गोष्टींचे दस्तऐवजीकरण करावे लागणार आहे. आदिवासींची निसर्गाशी सुसंगत जीवनशैली यातून आधुनिक समाजाला खूप काही शिकण्यासारखे आहे आणि हेच युवकांसाठी मूलभूत सूत्र आहे. आदिवासी तरुणांनी जल जंगल जमिनीची लढाई व आदिवासी अस्तित्वाचा संघर्ष राजकीय व सामाजिक परिवर्तन विचारातून भविष्यात चळवळीसाठी विचार मार्गदर्शक ठरणार आहे.

### सणसवाडीतील स्थानिक तरुणांचे तहसीलदारांना निवेदन

## सणसवाडीतील नोंदणीकृत बेरोजगारांना नोकरी द्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** सणसवाडी ता. शिरुर येथील औद्योगिक वसाहतीमध्ये स्थानिक तीस टक्के तरुणांना रोजगार देण्याची अट असताना देखील तरुणांना रोजगार दिला जात नसल्याने नुकतेच नोंदणीकृत झालेल्या बेरोजगार तरुणांना येथे रोजगार द्या असे निवेदन स्थानिक तरुणांनी शिरूर तहसीलदार यांना दिले आहे.

सणसवाडी ता. शिरुर येथील औद्योगिक वसाहतीमध्ये दोनशे हुन अधिक लहान मोठया कंपन्या असून तेथे स्थानिक तीस टक्के तरुणांना रोजगार देण्याची अट असताना देखील काही स्थानिक



ठेकेदारांच्या दबावामुळे तरुणांना रोजगार दिला जात नसल्याने भारतीय जनता पार्टी उद्योग आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय पाचंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि क्रांतिवीर प्रतिष्ठानचे सनसवाडी अध्यक्ष व माजी उपसरपंच सागर दरेकर यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक २५० बेरोजगार युवकांनी शासनाच्या अधिकृत वेबसाईटवरून बेरोजगार असल्याबाबत ची नोंदणी केली आहे, मात्र तरुण कंपन्यांमध्ये नोकरी मागायला गेल्यास त्यांना नोकरी व रोजगार न देता थेट खंडणीचे गुन्हे देखील दाखल करण्याची तसेच पोलिसांची धमकी दिली जात केले जात आहे, मात्र तरुणांना रोजगार नसल्याने तहसीलदार यांनी याप्रकरणी लक्ष घालून युवकांना रोजगार उपलब्ध करून द्यावा याबाबतचे निवेदन शिरुर तहसीलदार यांना दिले आहे, यावेळीभारतीय जनता पार्टी उद्योग आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय पाचंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि क्रांतिवीर प्रतिष्ठानचे सनसवाडी अध्यक्ष व माजी उपसरपंच सागर दरेकर, दिपक दरेकर, केतन हरगुडे, बाबा हरगुडे, सोमनाथ दरेकर, विक्रम हरगुडे, जयदिप दरेकर, अभिषेक दरेकर यांसह आदी उपस्थित होते.

#रा

# डॉ बाबा आढाव यांचे कार्य दीपस्तंभासारखे

## माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे पिंपळगाव घोडे येथे प्रतिपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



आंबेगाव पिंपळगाव घोडे येथे समाजसेवक डॉ . बाबा आढाव यांना माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते माँ शारदा भगवती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. (छाया - ज्ञानेश गायकवाड )

**अवसरी:** डॉ बाबा आढाव यांनी जनसामान्यांच्या सेवेसाठी आपले जीवन वाहिले आहे हमाल पंचायत आणि रिक्षा पंचायत हे त्यांचे मूर्तीमंत उदाहरण आहे सामान्य जनतेला आपले मानून त्यांच्यासाठी कार्य करण्यातच डॉ . बाबा आढाव यांनी आपले जीवन समर्पित केले आहे आणि म्हणूनच आंबेगाव तालुका वाशीयांच्या वतीने त्यांना मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे याही पुढे त्यांनी त्यांचे पवित्र कार्य असेच सुरू ठेवावे असे प्रतिपादन राज्याचे माजी सहकार मंत्री दिलीपराव वळसे पाटील यांनी घोडे पिंपळगाव (ता .आंबेगाव )येथे केले . पिंपळगाव घोडे (ता . आंबेगाव ) येथील श्री शारदा महोत्सवानिमित्त दिला जाणारा माँ भगवती शारदा पुरस्कार यावर्षी जेष्ठ समाजसेवक डॉ . बाबा आढाव यांना माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते देण्यात आला यावेळी वळसे पाटील बोलत होते . यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ह . भ .प . पांडुरंग महाराज येवले, शीलाताई आढाव, वारकरी सांप्रदायिक कीर्तनकार प्रमोद महाराज जगताप, सातगाव पठार येथील वेळेश्वर संस्थांनचे संस्थापक अध्यक्ष नामदेव महाराज वाळके ,माजी सभापती कैलास बुवा काळे, समाज कल्याणचे माजी सभापती सुभाष मोरमारे ,जयसिंग काळे, डॉ . पुरुषोत्तम काळे ,नंदकुमार येवले आदी उपस्थित होते .यावेळी वळसे पाटील बोलताना म्हणाले ह. भ .प. पांडुरंग महाराज येवले यांनी पिंपळगाव घोडे येथे महाराष्ट्रातील पहिले शारदा मातेचे मंदिर उभारले आहे वसंत पंचमीला या मंदिराचा वर्धापन दिन साजरा केला जातो .आत्तापर्यंत वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह भ प शांती ब्रह्म मारुती महाराज कुऱ्हेकर सुप्रसिद्ध गायक सुरेश वाडकर, खगोल शास्त्रज्ञ डॉ जयंत नारळीकर इतिहास संशोधक शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे ,अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, पद्मविभूषण डॉ . के . एच . संचेती , संत महामंडलेश्वर १००८स्वामी विश्वेश्वरानंद गिरीजी महाराज , बीव्हीजी .इंडिया लिमिटचे चेअरमन हनुमंतराव गायकवाड, समाजसेविका डॉ. नशिमा दीदी हुरजुक आचार्य स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज, शास्त्रज्ञ डॉ रघुनाथ माशेलकर रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी या मान्यवरांनाआत्तापर्यंत हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे . यावर्षीचा पुरस्कार डॉ बाबा आढाव यांना देण्यात आल्याचेही वळसे पाटील यांनी या वेळी सांगितले

## खेडमध्ये ग्राहक पंचायतीतर्फे प्रवासी दिन साजरा



**राजगुरूनगर :** हिंदू संस्कृतीत सर्वप्रथम सूर्य देवतेची पूजा केली जाते. सूर्य हा जगाचा आदी प्रवासी आहे. ज्याच्या प्रवासाने सृष्टीची निर्मिती झाली. दक्षिणायन व उत्तरायण प्रवास संपन्न होतो. त्यामुळेच रथसप्तमी सण हा प्रवासी दिन आहे. त्यानुसार राजगुरूनगर (ता. खेड) येथे अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या खेड शाखेतर्फे मंगळवारी (दि. ४) प्रवासी दिन साजरा करण्यात आला. शासकीय विश्रामगृह येथे आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते पीएमपीएमएल अर्थात सिटी बसचे नियंत्रक शंकर जाधव व विलास खमसे यांच्यासह उत्कृष्ट सेवा देणारे चालक व वाहक यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विना अपघात सेवा देणाऱ्या राज्य परिवहन महामंडळातील लांडे दशरथ भागीनाथ (सेवावर्ष २५ वर्ष), काळेकर तात्याबा बापू (सेवावर्ष २० वर्ष), भोईर विष्णु भिकाजी (सेवावर्ष २० वर्ष), कांबळे राजेंद्र प्रभाकर (सेवावर्ष १९ वर्ष), तुळसे महादेव केरणा (सेवावर्ष १९ वर्ष) या ५ चालकांसह वाहतूक नियंत्रक मारुती शिंदे यांचा खेड उपविभागीय कार्यालय आवारात सत्कार करण्यात आला.

## अजय यादव यांना हिरोजी इंदुलकर गुणवंत अधिकारी पुरस्कार



**सासवड :** महाराष्ट्र राज्य नगरविकास विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या व सर्वोच्च समजला जाणारा राज्यस्तरीय स्वराज्य अभियंता "हिरोजी इंदुलकर गुणवंत अधिकारी "पुरस्कार पुरंदर तालुक्यातील हरगुडे गावचे सुपुत्र अजय प्रकाश यादव यांना देण्यात आला आहे. नगर रचना क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सन २०२५ चां हा पुरस्कार राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते यादव यांना नुकताच प्रदान करण्यात आला. पुणे येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झालेल्या या गौरव सोहळ्यास खासदार श्रीरंग बारणे, आमदार माधुरी मिसाळ, विजय शिवतारे व अन्य मान्यवर उपस्थित होते. अजय यादव सहाय्यक नगर अभियंता म्हणून गेली सहा वर्षे कार्यरत असुन सध्या पुणे येथील मध्यवर्ती इमारतीतील नगर विकास विभागांत काम करत आहे त्याच्या नगर रचना विभागातील कार्यकर्तृत्वावर यावर्षीचा गुणवंत अधिकारी पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हरगुडे गावच्या अजय यादव याचे वडील बारामती येथे विद्या प्रतिष्ठानच्या मराठी माध्यम शाळेचे मुख्याध्यापक असुन आई शैलजा या प्राथमिक शिक्षिका आहेत. अजय यांचे एक बंधू सुजय राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतून परीक्षा पास करून स्वाकड्रन लीडर म्हणून काम करीत आहे. अजय याच्या या पुरस्काराचे पुरंदर तालुक्यातील अनेक मान्यवरांनी अभिनंदन करत कौतुक केले आहे.

## नेपाळ सीमेवरून सोने खरेदी करणारा अटकेत; चोरटा जेरबंद



**महाळुंगे :** महाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी चोरट्याचा टी शर्ट व त्याची चालण्याची लकब याच्या आधारे चार महिने अथक प्रयत्न करुन चोरट्याला जेरबंद केले. दागिने खरेदी करणाऱ्याला बिहारमधील नेपाळ सीमेवरील गावी जाऊन अटक केली. खेड तालुक्यातील कुरुळी येथील अरविंद प्रकाश कसाळे हे त्यांच्या कुटुंबियासह कामानिमित्त घराबाहेर गेले असताना चोरट्याने पावणे दोन तासाच्या अवधीत दरवाजाचा कडी कोयंडा तोडून घरातील २६ तोळे सोन्याचे दागिने चोरुन नेले होते. पोलिसांनी चोरट्याचा टी शर्ट व त्याची चालण्याची लकब याच्या आधारे चोरट्याला जेरबंद केले. दागिने खरेदी करणाऱ्याला बिहारमधील नेपाळ सीमेवरील गावी जाऊन अटक केली असल्याची माहिती महाळुंगे पोलिसांनी दिली. टुल्लुकुमार रामुराऊत (वय २५, रा. चिखली, मुळ रा. बिहार), बालेश्वर प्रसाद नंदलाल साह (वय ४५, रा. बखरी खजुरी, ढाका, बिहार) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. अरविंद कसाळे यांच्या घरी २९ सप्टेंबर २०२४ रोजी घरफोडी झाली होती. महाळुंगे पोलिसांचे तपास पथक फिर्यादी यांच्या घराच्या परिसरात वावरणारे संशयित व्यक्तीविषयी माहिती प्राप्त करत होते. त्यादरम्यान फिर्यादी यांच्या घराच्या परिसरात एक व्यक्ती संशयितरित्या वावरत असताना सीसीटीव्ही फुटेजमध्ये आढळून आला. त्याची ओळख पटत नसल्याने त्याच्या विषयी माहिती प्राप्त होण्यास अडचणी येत होत्या. पन गुनहगार च्या चलनच्या लकबीवरून अखेर त्याला अटक करण्यत आली

# बालसाहित्य संमेलनाचा सोहळा संपन्न

## वाचनाची गंगाजळी पुढील पिढीपर्यंत वाहून नेणारी चळवळ!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**इंदापूर :** शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती पद्माताई भोसले, सचिव डॉ.गिरीष देसाई, खजिनदार श्री.तुषार रंजनकर व विश्वस्त श्री.अरविंद गारटकर यांच्या मार्गदर्शनाखाली इंदापुरातील पहिल्या बालसाहित्य संमेलन २०२५ चे भव्य आयोजन करण्यात आले. हे केवळ संमेलन नव्हते, तर बालवाचन संस्कृतीला व बालकांच्या कलागुणांना नवीन दिशा देणारे एक सृजनात्मक पर्व होते. कोपीवरची शाळा व बालसंस्कार वर्ग यातील विद्यार्थ्यांसह इंदापूर शहरातील शेकडो विद्यार्थ्यांनी या अनोख्या संमेलनात सहभाग घेतला.

बालमनाच्या कल्पनाशक्तीला व विचारप्रवाहाला चालना देणाऱ्या या संमेलनाचे अध्यक्षस्थान सुप्रसिद्ध व ज्येष्ठ बालसाहित्यिक राजीव तांबे यांनी भूषवले. उद्घाटक डॉ. ज्ञानेश्वर जाधवर, तर प्रमुख पाहुणे साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कार विजेत्या डॉ. संगीता बर्वे व श्री. संजय वाघ, प्रकाशक व लेखक नवनाथ जगताप होते. त्यांनी आपले मौलिक विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले.

सकाळच्या सत्राची सुरुवात एका अनोख्या आणि प्रेरणादायी ग्रंथदिंडीने झाली. कोवळ्या उन्हात टपटपणाऱ्या बालमनांनी पुस्तकांची पालखी काढत, "वाचन करा, ज्ञान वाढवा" अशा घोषणा देत, वाचन संस्कृतीच्या प्रसाराचा वसा घेतला. ही दिंडी केवळ पुस्तके हातात घेऊन निघालेली परंपरा नव्हती, तर ही होती वाचनाची गंगाजळी पुढील पिढीपर्यंत वाहून नेणारी चळवळ! पहिल्या सत्रात श्री. राजीव तांबे, डॉ. ज्ञानेश्वर जाधवर व पुस्तकविश्वचे श्री. नवनाथ जगताप यांनी बालसाहित्यातील महत्त्व, वाचन संस्कृतीचे भवितव्य, आणि सृजनात्मकतेची जडणघडण या विषयांवर मनोगत व्यक्त केले. या चर्चांमधून वाचन हे केवळ करमणुकीचे साधन नसून, विचारांचा जिवंत प्रवाह आहे, हे अधोरेखित झाले.

दुसऱ्या सत्रात डॉ. संगीता बर्वे व श्री. संजय वाघ यांनी बालसाहित्य भाषाशैली आणि कथा-कवितांच्या माध्यमातून भावनिक व बौद्धिक विकास यावर प्रकाश टाकला. बालसाहित्य हे केवळ लहानग्यांसाठी नसून, समाजातील प्रत्येक घटकाने त्यातून शिकण्यासारखे बरेच काही आहे, असा संदेश त्यांनी दिला.

शिक्षण आणि करमणूक यांचा सुरेख मेळ साधत विद्यार्थ्यांसाठी विविध फन गेम्स आयोजित करण्यात आले. साहित्याच्या आणि ज्ञानाच्या समृद्धतेसह आनंदाचा एक अविभाज्य भाग म्हणून या खेळांनी बालकांमध्ये सहकार्य, सर्जनशीलता आणि स्पर्धात्मकता या गुणांना चालना दिली. संध्याकाळच्या सत्रात नृत्य व समूह नृत्य स्पर्धा रंगल्या. या स्पर्धेने रंगतदार समारंभाला आणखी चैतन्य मिळाले. साहित्य आणि संस्कृतीच्या संगमातून नव्या उर्जेचा प्रवाह या स्पर्धेच्या माध्यमातून अनुभवायला मिळाला.

बालकांच्या सृजनशीलतेला चालना देणाऱ्या या स्पर्धेत अनेक गटांनी सहभाग घेतला. पारंपरिक लोकनृत्य, भारतीय शास्त्रीय नृत्य, तसेच विविध प्रकारातील नृत्य सादर करून स्पर्धकांनी उपस्थितांची मने जिंकली.

# कामगाराच्या मृत्यूप्रकरणी मालकावर गुन्हा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** सणसवाडी ता. शिरूर येथील औद्योगिक वसाहतीतील ग्राजबेकर्ट कार्डिंग प्रायवेट लिमिटेड कंपनीत जून २०२३ मध्ये मशीन बाजूला घेताना झालेल्या अपघातात मशीन खाली चेंगरून किरण वैजनाथ मायने हा कामगार ठार झाल्याची घटना घडली असताना सदर घटनेला कंपनी व्यवस्थापक व मालकाला जबाबदार धरून शिक्रापूर पोलिसांनी कंपनीचे व्यवस्थापक शैलेन्द्र शिवाजीराव ढमढेरे व कंपनीचे मालक सुभाष भारद्वाज या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

सणसवाडी ता. शिरूर येथील ग्राजबेकर्ट कार्डिंग प्रायवेट लिमिटेड या कंपनीत कंपनी व्यवस्थापकाच्या सांगण्यावरून काही कामगार जुनी मशीन जॅक लावून बाजूला घेत असताना जॅकवर लावलेली मशीन अचानक तिरकी झाल्याने मशीन किरण मायने या कामगाराच्या अंगावर पडल्याने किरण मशीन खाली चिरडला गेला, यावेळी कंपनीतील अन्य कामगारांनी किरणला उपचारासाठी रुग्णालयात हलवले मात्र उपचारापूर्वीच किरण वैजनाथ मायने वय ३६ वर्षे रा. तळेगाव ढमढेरे ता. शिरूर जि. पुणे याचा मृत्यू झाल्याने याबाबत विजय अण्णासाहेब मेनघर वय ५३ वर्षे रा. ससाणे नगर हडपसर पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याने पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली तर याबाबत पोलीस हवालदार राजेश माने व कृष्णा व्यवहारे हे तपास करत असताना कंपनी व्यवस्थापक व मालक यांनी कामगारांना सुरक्षिततेची साधने न दिल्याने तसेच योग्य खबरदारी न घेतल्याने अपघात घडून कामगाराचा मृत्यू झाल्याचे समोर आले, तर याबाबत पोलीस हवलदार कृष्णा सूर्यभान व्यवहारे रा. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी ग्राजबेकर्ट कार्डिंग प्रायवेट लिमिटेड कंपनीचे व्यवस्थापक शैलेन्द्र शिवाजीराव ढमढेरे वय ४८ वर्षे सध्या सहजीवन हाऊसिंग सोसायटी गणेश खिंड रोड भोसलेनगर पुणे मूळ ता. तळेगाव ढमढेरे ता. शिरुर जि. पुणे तसेच कंपनीचे मालक सुभाष भारद्वाज यांच्या विरुद्ध निष्काळजीपणा तसेच मृत्यूस कारणीभूत झाल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे व प्रतिक जगताप हे करत आहे.

# माहेरने दिला नागरिकांना सर्वधर्मसमभावतेचा संदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** वढू बुद्रुक ता. शिरूर येथील माहेर संस्थेच्या माध्यमातून विविध समाजपयोगी उपक्रम राबविले जात असताना नुकतेच माहेर संस्थेच्या माध्यमातून सर्व धर्माच्या धर्मगुरूंना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्या हस्ते भगवतगिता, कुराण, बायबल सह संविधानाचे पूजन करत सर्वधर्माचे महत्व नागरिकांना सांगत नागरिकांना सर्वधर्म संभावतेचा अनोखा संदेश देण्यात आला आहे.

वढू बुद्रुक ता. शिरूर येथील माहेर संस्थेच्या माध्यमातून नुकतेच सर्व धर्माच्या धर्मगुरूंना निमंत्रित करुन भगवतगिता, कुराण, बायबल सह संविधानाचे पूजन करुन संविधानाचे वाचन करण्यात आले, याप्रसंगी ख्रिश्चन धर्माचे फादर पिटर डिक्रोज, चैतन्या पिंटो, बुद्धाचार्य विश्वनाथ घोडके, जैन धर्माचे प्रतिमा शाह, सिख धर्माचे गुणवंत नागपाल, इस्लाम धर्माच्या फरजाना सय्यद, महानुभाव पंथाचे बाबा मुळावकर, यांसह माहेर संस्थेच्या संस्थापिका लुसि कुरियन, अध्यक्षा हिराबेगम मुल्ला, व्यवस्थापक रमेश दुतोंडे, विजय तवर, मंगेश पोळ, प्रकाश कोठावळे, हरीच अवचर, रमेश चौधरी, माजी सरपंच साहेबराव भंडारे, ग्रामपंचायत सदस्य संजय भंडारे,जिल्हा विशेष शाखेचे पोलीस हवालदार अनिल जगताप, कवी आकाश भोरडे यांसह परदेशी पाहुणे व मान्यवर आदी उपस्थित होते. यावेळी माहेरच्यामुळणी प्रेम हाच खरा धर्म, सर्व धर्माचा आदर करु – माणुसकी जपू यांसह आदी घोषवाक्य हातात घेऊन जनजागृतीपर कार्यक्रम झाले.

## जनजागृती

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



पुणे वढू बुद्रुक ता. शिरुर येथील माहेर संस्थेने सर्व धर्माच्या धर्मगुरूंना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्या हस्ते भगवतगिता, कुराण, बायबल सह संविधानाचे पूजन करत सर्व धर्म समभावतेचा संदेश दिला.

# निरगुडसर येथे बिबट्याचा बछडा आढळला मृत अवस्थेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** मधु गायकवाड अवसरी आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील निरगुडसर येथील थोरात मळ्यात सुनील रामचंद्र थोरात यांच्या घरा पाठीमागील उसाच्या शेतात बिबट्याचा बछडा मृता अवस्थेत आढळून आला आहे वन विभागाकडून मृतबछड्याची शवविच्छेदन करून अंत्यसंस्कार करण्यात आल्याचे मंचरचे वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी सांगितले . वन विभागाने दिलेल्या माहितीनुसार रविवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास अमर थोरात यांच्या उसाची सरी फोडण्याचे काम सुरू होते त्यावेळी सरीमध्ये बिबट्याचे बछडा मृत अवस्थेत आढळून आला या बछड्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य पूजा थोरात व विक्रम मेंगडे यांनी परिमंडळ वनाधिकारी यांना दूरध्वनी वरून दिली वनरक्षक अश्विनी डफळ व वनपाल प्रदीप कासारे आणि रेस्क्यू टीम सह घटनास्थळी येऊन पाहणी केली बिबट्याचा बछडा उसाच्या कडेला मृतावस्थेत पडला होता मृत बिबट्या मादी जातीची असून त्याचे वय साधारण पाच ते सहा महिने असल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी सांगितले

## संस्कृती जोपासण्यासाठी नव्या पिढीत देखील विचारांची समृध्दी यायला हवी

# धामणीच्या खंडोबाला चांदीचे खड्ग अर्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मंचर :** आचार विचार आणि संस्काराने समृध्द असलेल्या जुन्या पिढीने धार्मिक संस्कृतीची जोपासना केली. हे संस्कार पुढील पिढीत संक्रमित करण्यासाठी व संस्कृती जोपासण्यासाठी नव्या पिढीत देखील विचारांची समृध्दी यायला हवी. असे विचार ह.भ.प.हिरामण महाराज करडीले (रामलिंग शिरूर) यांनी व्यक्त केले धामणी (तालुका आंबेगांव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान मंदिरात माघ शुक्ल पक्ष वसंत पंचमी रविवारी (दिंनाक २ फेब्रु) रोजी समाजभूषण कै बाबुरावदादा पाटील यांचे नातु श्री विक्रम किसनराव पाटील जाधव यांनी खंडोबाला चांदीची तलवार अर्पण करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.धामणी येथील श्री खंडोबा देवस्थानाचे महात्म्य खूप मोठे आहे. राज्यभरातील हजारो भाविक येथे तळीभंडार करण्यासाठी येतात. गेल्या काही वर्षात या देवस्थानाचा लोकवर्गणीतून विविध विकासकामे करुन मंदिर परिसर सुशोभित झाला असून महाराष्ट्रातील जागृत व प्रेक्षणीय तिर्थक्षेत्र म्हणून धामणीचे खंडोबा देवस्थान लौकीक पात्र झालेले आहे.पुणे.नगर.नाशिक जिल्ह्यातील भाविकांचे हे देवस्थान कुलदैवत आहे.जिर्णोध्दाराचे काम पाहिल्यानंतर धामणी ग्रामस्थानी भारतीय संस्कृतीचा वारसा लोकवर्गणीतून जतन केलेला आहे. मणी आणि मल्ल दैत्याचा संहार करण्यासाठी श्री खंडेरायाने आपल्या सात कोटी सैन्यासह या दानवाबरोबर घनघोर युध्द केले त्यामुळे कानडी भाषेमध्ये"७"या संख्येला"येळ"या नावाने संबोधले जाते येळकोट म्हणजे सात कोटीचे सैन्य होते.मणी आणि मल्ल दैत्याचा संहार करण्यासाठी खंडोबाने तलवारीचे शस्त्र वापरले होते तिचे नाव खंडा असे आहे.त्यामुळेच येळकोट येळकोट जय मल्हार असे म्हणण्याची पध्दत रुढ झाली असा हा चांदीचा खंडा देवस्थानास अर्पण करुन खंडोबा भक्तांनी खंडोबाची निस्सीम कृपा संपादन केली असल्याचे करडीले यांनी यावेळी सांगितले.चांदीची तलवार अर्पण करणारे भाविक श्री विक्रम पाटील जाधव यांचा यावेळी ग्रामस्थांनी सत्कार केला.यावेळी देवस्थानचे सेवेकरी धोंडीबा भगत.दादाभाऊ भगत.प्रभाकर भगत.शांताराम भगत सुभाष तांबे. राजेश भगत. नामदेव भगत.पांडुरंग भगत.राहूल भगत.उत्तमराव जाधव.अजित बोऱ्हाडे.मच्छिंद्र वाघ.कांताराम तांबे. प्रकाश पाटील.ज्ञानेश्वर जाधव (वाघे) सिताराम जाधव (वाघे) आदी उपस्थित होते.

#रा



# बालांगण

## बनवा घरट्याची प्रतिकृती

फन टाईम

छोट्या दोस्तांनो, नव्या वर्षात काही तरी वेगळं करायचंय का? मग नेचर वॉकला चला. अभयारण्यात जाऊन पक्षी बघा. जवळच्या डोंगरावरही जाता येईल. सकाळी लवकर उठलात तर घराच्या बाहेरही विविध पक्षी दिसू शकतील. मित्रांनो, पक्षी घरटी तयार करतात. एवढी छान, सुबक आणि मजबूत घरटी त्यांना कशी बरं बांधता येत असतील, असा प्रश्न पडलाय का कधी? पडला असेल तर पक्ष्यांच्या घरट्याची कलाकृती तयार करून याचं उत्तर जाणून घेऊ शकता. यासाठी काही वस्तू जमवाव्या लागतील. पक्षी जमवतात अगदी तश्शाच! मग बनवायचं ना घरटं?



साहित्य : पानं, पालापाचोळा, कळ्या, फुलांचे देठ, काटक्या, काड्या, पिसं, गवत आणि भुसा. एखाद्या अभयारण्यात जाणार असाल तर सोबत पिशवी घेऊन जा. या वस्तू जमवा. गम, कागदी पिशवी, ब्राऊन पेपर, कापडी पोत्यासारखं कापड, रंगीत कागदी प्लेट, गुगली आईज, पक्ष्यांचे आकार कापण्यासाठी कागद, कात्री इत्यादी.

कृती : सर्वात आधी घरट्यासाठी लागणाऱ्या वस्तू तुम्हाला जमवायच्या आहेत. तुमच्याकडील कागदाचे पक्ष्यांचे आकार कापा किंवा पक्ष्याच्या चित्राची प्रिंटही काढता येईल.

आकार कापून घ्या. आता तुम्हाला पक्ष्याचं घरटं तयार करायचं आहे. यासाठी पोत्याचं जाड कापड घ्या. हे कापड अर्धगोल आकारात कापा. आता हा तुकडा पेपर प्लॅटच्या खालच्या भागात चिकटवा. आता त्यावर पक्षी चिकटवा. नंतर पोत्याच्या तुकड्यावर इतर वस्तू चिकटवता येतील. काटक्या, काड्या, कापूस, पिसं, वाळलेली पानं, फुलं, देठ या सगळ्या वस्तू चिकटवा. पेपर प्लेट अजून सजवायची असेल तर अशाच काड्या, पानं, फुलं चिकटवता येतील. पांढऱ्या कागदाचे अंड्याचे आकार कापा. पक्ष्याच्या खाली ते चिकटवता येतील. आता तुमची कल्पकता वापरा आणि इतर सजावट करा. गम पूर्णपणे वाळू द्या. ही कलाकृती घरात ठेवता येईल किंवा कुणाला गंमत म्हणून भेटही देता येईल.

## लिथुआनियाविषयी...

सफर देशांची


युरोप खंडातल्या बऱ्याच छोट्या देशांपैकी एक म्हणजे लिथुआनिया. उत्तर युरोपातला हा देश बाल्टिक समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर वसला आहे. या देशाची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात आहे. 'लिथुआनियन' ही इथली प्रमुख भाषा. देशातले ८२ टक्के लोक ही भाषा बोलतात. 'व्हिल्नियस' या देशाची राजधानी आणि सर्वात मोठं शहर. १७९५ मध्ये लिथुआनिया रशियन साम्राज्याचा भाग झाला. १६ फेब्रुवारी १९१८ या दिवशी हा देश स्वतंत्र झाला. पण लिथुआनियावर आक्रमणं सुरूच राहिली. १६ जून १९४० या दिवशी 'सोव्हिएत युनियन'ने या देशाचा ताबा घेतला. १९४१ ते १९४४ या काळात लिथुआनियावर नाझी जर्मनीचं राज्य



होतं. १९४४ पासून १९९० पर्यंत हा देश पुन्हा 'सोव्हिएत युनियन'च्या ताब्यात होता. ११ मार्च १९९० या दिवशी लिथुआनियाला स्वातंत्र्य मिळालं.

हा देश नाटो आणि युरोपियन युनियनचा सदस्य आहे. या देशाला ९९ किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. 'नेमुनास' ही या देशातली सर्वात मोठी नदी. लिथुआनियाचा बराचसा भाग सपाट आहे. देशात ३३ टक्के वनसंपदा आहे. या देशात बरेच तलावही आहेत. भरपूर जंगल असल्यामुळे इथे लाकूड उद्योग मोठ्या प्रमाणावर आहे. या देशात पाच राष्ट्रीय तर ४०२ निसर्ग उद्यानं आहेत. देशात वन्य प्राणीही मोठ्या प्रमाणावर आहेत. निसर्गसौंदर्याने नटलेल्या या देशात पर्यटक मोठ्या संख्येने येतात. युरोपातल्या इतर देशांप्रमाणे युरो हे इथलं प्रमुख चलन असलं तरी 'लिथुआनियन लिटास' या चलनाचा वापरही केला जातो.

ठिपके जुळवा



## सोनं का गंजत नाही?

जाणून घ्या

लोखंडाच्या वस्तू पटकन गंजतात. पण सोन्याच्या दागिन्यांवर गंज चढत नाही. कितीही वापरले तरी सोन्याचे दागिने खराब होत नाहीत. लोखंड आणि सोनं हे दोन्ही धातू असले तरी लोखंडाप्रमाणे त्यावर गंज का चढत नाही, असा प्रश्न तुमच्या मनात आला असेल. चला तर मग याचं कारण जाणून घेऊ या.

सोनं हा एक निष्क्रिय धातू आहे. त्यामुळे त्याचा वातावरणातल्या कोणत्याही घटकाशी किंवा वायुशी संपर्क आला तर कोणतीही रासायनिक प्रक्रिया घडत नाही. लोखंडावर गंज चढण्यासाठी या धातूची वातावरणातल्या ऑक्सिजनशी प्रक्रिया व्हावी लागते. या प्रक्रियेनंतर आयर्न ऑक्साइडची निर्मिती झाल्याने लोखंड गंजतं. सोनं म्हणजे सुवर्ण निसर्गात शुद्ध स्वरूपात असतं. तसंच हा मऊ धातू आहे. मात्र दागिने घडवताना सोन्यात थोड्या प्रमाणात तांबं किंवा पितळ मिसळलं जातं. यामुळे या धातूला काठिण्य येतं आणि दागिने



तयार करणं सोपं होतं.

काही काळानंतर सोन्याच्या दागिन्यांची चमक कमी झाल्याचं आपल्याला जाणवतं. सोन्याची कोणत्याही वायुसोबत रासायनिक प्रकिया होत नसली तरी यात मिसळलेल्या इतर धातूंचा ऑक्सिजनशी संपर्क होऊन ऑक्साइडची निर्मिती होते. यामुळे सोन्याचे दागिने फिके दिसतात. मात्र या ऑक्साइड्सचा रंग लाल किंवा भुरकट नसतो. त्यामुळे दागिने लालसर दिसत नाहीत. सोन्यात कधीही लोखंड मिसळलं जात नाही.

## देखणे ब्लू सी ड्रॅगन

दोस्त हे मस्त

दोस्तांनो, प्राणी–पक्ष्यांच्या विविध प्रजातींचे शोध सतत लागत असतात. काही तरी नवं सापडत राहतं आणि अशा जिवांविषयी कुहुतहल वाढत राहतं. ऑस्ट्रेलियातील समुद्र किनाऱ्यावर 'ब्लू सी ड्रॅगन' नावाचा एक जलचर सापडलाय. या जलचराचे फोटो सोशल मिडियावर वायरल होत आहेत. हा जलचर क्वींसलँड येथील समुद्र किनाऱ्यावर सापडलाय. त्यामुळे संशोधकांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. 'ब्लू सी ड्रॅगन' हा सागरी जीव असून तो उडू शकतो. त्यामुळेच त्याच्या अस्तित्वाबाबत कुतुहल निर्माण झालंय. 'ग्लॉसियस अटलांटियस' या जलचरांच्या प्रजातीतील अत्यंत दुर्मिळ असा हा जीव आहे. हा प्राणी माणसांच्या फारशा नजरेत आला नसला तरी त्याचं



सौंदर्य डोळ्यात भरणारं असतं. जेलीफिशप्रमाणे हा प्राणीही फार सुंदर आहे. असं असलं तरी याची गणना विषारी प्राण्यांमध्ये केली जाते. हा प्राणी चावला तर त्याच्या विषामुळे माणसाला त्रास होतो. हा जलचर आपल्या कल्ल्यांच्या मदतीने समुद्राच्या पृष्ठभागावर थोड्या उंचीवर उडू शकतो. या प्राण्याचा आकार फारच छोटा आहे. त्यातच याच्या निळ्याशार रंगामुळे तो पटकन दृष्टीस पडत नाही. या प्राण्याच्या शरीरावर चंदेरी रेषा असतात. या रेषाही समुद्राच्या पाण्याच्या रंगाशी मिळत्याजुळत्या असल्याने त्याच्या अस्तित्वाचा थांग लागत नाही. म्हणूनच शत्रुंपासून याचा अगदी सहज बचाव होतो. निळ्या सागरी ड्रॅगनचा आकार ४० मिलीमीटरपर्यंत वाढू शकतो. या प्राण्याचा आकार फारच वेगळा असल्याने सुरूवातीला आपला गोंधळ उडतो. पण ही कोणतीही वनस्पती नसून सजीव प्राणी असल्याचं आपल्या लक्षात येतं. हातांच्या तळव्यांवर ठेवल्यावर हा फारच छोटा दिसतो. हा सजीव नुकताच आढळल्याने त्यावर अजून संशोधन होईल. त्यानंतरच या प्राण्याचे रंगढंग आपल्या लक्षात येऊ शकतील.

## क्षेत्र हेल्थ मॅनेजमेंटचं



कोण होणार?


आरोग्य क्षेत्रात करीअर करण्यासाठी फक्त डॉक्टर हा एकमेव पर्याय नाही. हे क्षेत्र खूप मोठं आहे. इथे तुम्ही विविध प्रकारे काम करू शकता. व्यवस्थापन क्षेत्रात रस असेल तर हॉस्पिटल मॅनेजमेंट म्हणजे रुग्णालय व्यवस्थापनाकडे तुम्ही वळू शकता. हेल्थकेअर क्षेत्राची वाढ वेगाने होते आहे. त्यातच परदेशी कंपन्यांनीही या क्षेत्रात मोठी गुंतवणूक केल्याने रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. म्हणूनच तुम्ही हॉस्पिटल मॅनेजमेंटचा अभ्यासक्रम पूर्ण करून पुढे जाऊ शकता.

हॉस्पिटल मॅनेजमेंटमध्ये डिप्लोमापासून पोस्ट ग्रॅज्युएशनपर्यंतचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. काही कॉलेजेसमध्ये या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षेचं आयोजन केलं जातं. हॉस्पिटल मॅनेजमेंटसंबंधीच्या या अभ्यासक्रमांमध्ये कायदा, फायनान्स, ह्युमन रिसॉर्स, ऑपरेशन्स मॅनेजमेंट, वैद्यकीय तसंच कायदाविषयक प्रश्न असे विषय शिकवले जातात. यामुळे संपूर्ण व्यवस्थापनाचं ज्ञान तुम्हाला मिळतं.

हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर हॉस्पिटल बिझनेस मॅनेजर, फूड अँड बिव्हरेज मॅनेजर, गेस्ट रिलेशन मॅनेजर, हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेटर, फ्लोअर मॅनेजर, सेंटर मॅनेजर, पेशंट रिलेशन एक्सिक्युटिव्ह, फ्रंट ऑफिस ॲडमिनिस्ट्रेटर, ऑपरेशन एक्सिक्युटिव्ह म्हणून तुम्ही काम करू शकता. विविध शिक्षण संस्था आणि कॉलेजेसमध्ये हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

दोस्त हे मस्त

### व्हिक्टोरिया क्राउन्ड पिजन



पक्षी मुळातच सुंदर असतात. त्यांची रंगीबेरंगी पिसं खूप आकर्षक वाटतात. वेगवेगळ्या आकाराच्या, प्रकारच्या या पिसांमुळे पक्षी स्टायलिश दिसतात. काही पक्ष्यांना केसही असतात. या केसांचीही विशिष्ट रचना असते. त्यामुळे पक्ष्यांनी हेअरस्टाईल केल्यासारखंच वाटतं. असाच एक पक्षी म्हणजे व्हिक्टोरिया क्राउन्ड पिजन. हे पक्षी म्हणजे कबुतरांची सर्वात मोठी प्रजाती आहे. ते मादी टर्कीच्या आकाराचे असतात. त्यांचे केस तुऱ्यासारखे वाटतात. जांभळट रंगाच्या या तुऱ्यांमुळे डोक्यावर मुकुट घातल्यासारखं वाटत असल्याने त्यांना व्हिक्टोरिया क्राउन्ड पिजन हे नाव पडलं.

खादाडी

### यम्मी वॉटरमिलन स्मूदी



छोट्यांनो, कलिंगडं भरपूर प्रमाणात मिळतात. गारेगार कलिंगड खायला खूप छान वाटतं. या कलिंगडाची तुम्ही मस्त स्मूदी करू शकता. त्यासाठी तीन कप कलिंगडाच्या फोडी घ्या. बिया काढून टाका. अर्धा कप व्हॅनिला आईस्क्रीम, पुदीन्याची पानं हे साहित्य घ्या. मिक्सरच्या भांड्यात कलिंगडाचे तुकडे आणि व्हॅनिला आईस्क्रीम घाला. नीट फिरवून घ्या. हे मिश्रण ग्लासमध्ये ओता. पुदीन्याच्या पानांनी सजावट करा. गारेगार प्या. संध्याकाळी किंवा रात्री ही स्मूदी बनवून पिता येईल.

धमाल

### मित्रमैत्रिणींसोबत घालवा वेळ




मुलांनो, सुट्टीमध्ये तुम्हाला दररोज काहीतरी वेगळं करायचं असतं. मित्रमैत्रिणींसोबत वेळ घालवायचा असतो. मग एखाद्या रविवारी तुम्ही मित्रमैत्रिणींना घरी बोलवू शकता. घरीच टीव्हीवर एखादा चित्रपट बघू शकता. थिएटरमध्ये जाऊनही चित्रपट बघण्याचा प्लॅन करता येईल. अशाप्रकारे प्रत्येक मित्रमैत्रिणीच्या घरी वेगळा कार्यक्रम ठरवा. काहीतरी क्रिएटिव्ह करा. तुमची सुट्टी मस्त आनंदात जाईल. लांब राहणाऱ्या मित्र किंवा मैत्रिणीला यावेळी पत्र लिहा. व्हॉट्स ॲप, फोनवर तुम्ही रोज भेटत असलात तरी पत्र लिहिण्याची गंमत वेगळीच असते. ती मजा अनुभवा.

योगा टाईम

### पाठीसाठी शिशुआसन



मुलांनो, शाळेत जाताना तुम्ही पाठीवर दप्तर घेता. दप्तराच्या वजनामुळे पाठीच्या कण्याला त्रास होतो. पाठीला आराम मिळावा यासाठी तुम्ही शिशुआसन करा. शिशुआसन म्हणजे लहान बाळ रांगताना ज्या स्थितीत असतं तशी शारीरिक स्थिती. यामुळे मज्जासंस्थेचं कार्यही सुधारतं. हे आसन अगदी सोपं आहे.



## आग विझवणारा 'फायर वास'



व्हॉट्स न्यू?

आग लागल्यावर सगळ्यांची धावपळ होते. घरात लागलेली छोटीशी आगही मोठं नुकसान करू शकते. आग लागल्यावर आपण अग्निशमन दलाला फोन करतो. पण ते येईपर्यंत बराच वेळ जातो. पाण्याने आग विझवण्याचा प्रयत्न होतो. पण यात इजा होण्याची शक्यता असते. म्हणूनच सॅमसंगने अनोखा फ्लॉवरपॉट तयार केला. हा फ्लॉवरपॉट फेकल्यावर आग पटकन विझते. मित्रांनो, हा जादूचा फ्लॉवरपॉट नाही. यात आग विझवण्यासाठी वापरलं जाणारं पोटॅशियम कार्बोनेटचं मिश्रण भरण्यात आलं आहे. आग लागलेल्या ठिकाणी हा फ्लॉवरपॉट फेकल्यानंतर तो तुटतो आणि त्यातून पोटॅशियम कार्बोनेटचं मिश्रण बाहेर पडल्याने आग विझते.

'फायर वास' असं नाव या फ्लॉवरपॉटला देण्यात आलं आहे. नेहमीच्या फ्लॉवरपॉटप्रमाणेच तो घरात ठेवायचा. शोभेची वस्तू म्हणूनही तो वापरला जातो. मुख्य म्हणजे वेळेला पटकन मिळतो. या फ्लॉवरपॉटमधलं पोटॅशियम कार्बोनेट आग विझवतं. शिवाय आगीशी ऑक्सिजनचा संपर्क होऊ देत नाही. यामुळे आग पसरत नाही. अनेक ठिकाणी अग्निशमन यंत्र लावलेली असतात. पण त्यांच्या तुलनेत हा फ्लॉवरपॉट वापरायला अगदी सोपा आहे. त्यामुळे आपण अगदी बिनधास्त आग विझवू शकतो.

## का हसायचं?

हेल्थ वेल्थ

छोट्यांनो, तुम्ही सकाळी सकाळी जवळच्या बागेतून जोरजोरात हसण्याचे आवाज ऐकले असतील. कोण बरं हसत असावं, असा प्रश्नही तुम्हाला पडत असेल. मित्रमैत्रिणींनो, अनेक ठिकाणी लाफ्टर क्लब्ज असतात. इथे फक्त हसायचं असतं. वेगवेगळ्या लयीत हसायला शिकवलं जातं. हसणं आपल्या आरोग्यासाठी चांगलं असतं. हसल्यामुळे आयुष्य वाढतं असं म्हणतात. हसण्याचे फायदे जाणून घेऊ या.

✽ हसणं म्हणजे एकप्रकारचा व्यायाम. जोरात हसताना आपल्या हृदयाची गती वाढते. रक्तदाबही वाढतो. धावल्यामुळे किंवा कोणताही व्यायाम केल्यामुळे शरीराला होणारे फायदे फक्त हसल्यामुळे मिळू शकतात.

✽ हसणारे लोक आजारी पडत नाहीत. हसताना आपल्या शरीरात एचजीएच नावाचा हार्मोन तयार होतो. यामुळे रोगप्रतिकारक क्षमता वाढते आणि शरीर जंतूंशी लढायला सज्ज होतं.

✽ हसण्याचं शास्त्र आणि त्याच्या आपल्या शरीरावर होणाऱ्या परिणामांच्या अभ्यासाला 'जेलोटोलॉजी' असं म्हणतात.



✽ समोरची व्यक्ती हसत असेल तर आपल्यालाही हसू येतं.

✽ हसल्यामुळे स्मरणशक्ती सुधारते. एकाग्रता वाढते. त्यामुळे तुम्हा मुलांनी भरपूर हसायला हवं.

✽ स्वत:ला गुदगुल्या केल्यावर हसायला येत नाही. दुसऱ्याने अचानक गुदगुल्या केल्यावर मेंदूला धक्का बसतो. पण आपणच गुदगुल्या करणार असू तर याची मेंदूला कल्पना असते. गुदगुल्या करण्याआधीच त्याला आपल्या बोटांच्या स्पर्शाची जाणीव झालेली असते. त्यामुळे स्वत:च स्वत:ला गुदगुल्या करणं मेंदूसाठी धक्का ठरत नाही आणि आपल्याला हसू येत नाही.

## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) एंटॉमॉलॉजीमध्ये कशाचा अभ्यास केला जातो?
२) फिल्म अँड टिव्ही इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया कुठे आहे?
३) गोवा शिपयार्ड लिमिटेडची स्थापना कधी झाली?
४) संयुक्त राष्ट्रांचं मुख्यालय कुठे आहे?
५) फॅथॉमीटरनी काय मोजतात?
६) महाराष्ट्रात लोकसभेच्या किती जागा आहेत?
७) कोणत्या ऋतूत शरीराला जास्त फॅट्सची गरज असते?
८) इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ पेट्रोलियम कुठे आहे?
९) ट्रान्स सायबेरियन रेल्वे लाईन कुठे आहे?
१०)भारताच्या अंतराळ कार्यक्रमाला कोणत्या वर्षी सुरूवात झाली?

उत्तर : १) कीटक २) पुणे ३) १९५७ ४) न्यूयॉर्क ५) समुद्राची खोली ६) ४८ ७) हिवाळा ८) डेहराडून ९) रशिया १०) १९६२

rashtrasanchar.com

RASHTRA SANCHAR/ PUNE/ Marathi/ RNI Reg. No. MAHMAR/2023/89220

बुधवार, ५ फेब्रुवारी २०२५

राष्ट्रसंचार १२

BREAKING NEWS AND MORE www.rashtrasanchar.com @rashtrasanchar

# SPORTS



सामना खेळत असल्याचे आभासी चित्र निर्माण करून केलेला सराव, गुरू युवराज सिंगची मेहनत आणि विश्वास तसेच ब्रायन लारा यांनी दिलेला सल्ला यामुळे आपल्या खेळात कमालीची सुधारणा झाली आहे. सध्या करत असलेली प्रगती यामुळेच होत आहे, असे मत भारतीय संघातील नवा तारा अभिषेक शर्मा याने व्यक्त केले. वानखेडे स्टेडियमवर रविवारी झालेल्या सामन्यात अभिषेक शर्माने डोळ्याचे पारणे फेडणारी अफलातून वेगवान शतकी खेळी साकार केली. चौकारांपेक्षा अधिक षटकार मारत त्याने त्याचा गुरू युवराज सिंगच्या खालोखाल विक्रमांचीही नोंद केली.



# महाराष्ट्र केसरी कोणाला करायचे हे स्पर्धेच्या आधीच ठरवले जाते

## अर्जुन पुरस्कार विजेता काका पवार यांचा आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र केसरी 2025 च्या शेवटच्या दोन सामन्यांत राडा झाल्याचे पाहायला मिळाले. शिवराज राक्षेच्या या वादावर अर्जुन पुरस्कारप्राप्त कुस्तीपटू आणि प्रशिक्षक काका पवार यांनी मोठे वक्तव्य केले आहे आणि अनेक सवाल विचारले आहेत. महाराष्ट्र केसरी कोणाला करायचे हे स्पर्धेच्या आधीच ठरवले जाते, असा गंभीर आरोप काका पवारांनी केला आहे. शिवराज आणि महेंद्र गायकवाडवर 3 वर्षांची बंदी घातल्यानंतर पंचांना जन्मठेप द्या, अशी मागणीदेखील काका पवारांनी केली आहे; पण शिवराजच्या चुकीचे समर्थन करणार नसल्याचेही त्यांनी सांगितले.

अहिल्यानगर येथे महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत पृथ्वीराज मोहोळ महाराष्ट्र केसरी ठरला. मात्र, त्या आधी झालेला राडा संबंध महाराष्ट्रभर चर्चेचा विषय ठरला.

शिवराज राक्षे आणि महेंद्र गायकवाड यांच्यावर कारवाई करत त्यांना तीन वर्षांसाठी महाराष्ट्र केसरी स्पर्धेत खेळण्यावर बंधी घालण्यात आली आहे. या निर्णयाचा विरोध कुस्तीगीर वस्ताद काका पवार यांनी दर्शविला असून इंडिया महासंघाकडे (फेडरेशन) दाद मागणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

फाइनलची कुस्ती चितपट झालीच नाही. दोन्ही खांदे जमिनीला टेकले असते, तरच कुस्ती चितपट ठरली असती. येथे मोठी चूक पंचांनी केली आहे. त्या रेफरीला १० वर्षांसाठी कुस्तीमधून निलंबित केले पाहिजे. आम्ही फेडरेशनसमोर जाऊन सत्य उघड करण्यास तयार आहोत. जर त्यांनी आमच्या विरोधात निर्णय दिला, तर आम्ही तो मान्य करू, पण या निलंबनाविरोधात आम्ही ऑल इंडिया फेडरेशनकडे न्याय मागू, तिथे न्याय मिळाला नाही, तर आम्ही थेट वर्ल्ड रेसलिंग फेडरेशनकडे जाऊ, अशी भूमिका काका पवार यांनी मांडली आहे.

ही संपूर्ण घटना म्हणजे खेळाडूंसोबत राजकीय खेळी असल्याचे पवार म्हणाले आहेत. पण खेळाडूंसोबत राजकारण करू नका. शिवराज राक्षे आमचाच आहे, पृथ्वीराजही आमचाच आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील खेळाडू आमचेच आहेत. त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करा, असे आवाहन काका पवारांनी केले आहे. यामुळे महाराष्ट्र केसरीचा मान जरी पृथ्वीराज मोहोळ याला मिळाला असला तरी नवा वाद निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



कोणत्या पैलवानाला यावेळेस महाराष्ट्र केसरी करायचे हे आधी ठरते म्हणून तर हा सगळा प्रकार घडला. पैलवान मॅच फिक्सिंग नाही करत; पण संघटना ठरवते. पंचावर दबाव टाकणे, तू हे नीट कर आम्ही आहोत तुझ्या पाठीशी. असे करून चालेल का? मग तुमचे पैलवान ऑलिम्पिकला जातील का? तुम्ही इथेच पैलवानकी संपवत राहिलात तर पुढे कसे जाणार? असा सवाल काका पवार यांनी विचारला.

## ध्रुव ग्लोबलच्या खेळाडूंनी पटकावले कांस्य पदक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** बालेवाडी येथे नुकतेच एसएफए टेबल टेनिस दुहेरी स्पर्धेत नांदे येथील ध्रुव ग्लोबल स्कूलच्या युवा चॅम्पियन खेळाडू तनिष्क धमसानिया आणि सिद्धार्थ पॉल यांनी १५ वर्षाखालील मुलांच्या गटात कांस्य पदक पटकावले. खेळाडूंचा जोश आणि चिकाटी पाहून ध्रुव ग्लोबल स्कूलचे संचालक यशवर्धन मालपाणी व प्रिन्सिपल संगीता राऊतजी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. उपांत्य पूर्व फेरीत चौथा मानांकितजोडीला ११/७,११/४ असा पराभव करून तनिष्क आणि सिद्धार्थ यांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. या खेळाडूंनी अनेक मातब्बर स्पर्धकांना कडवी झुंज देत तृतीय क्रमांक पटकावला. लहानपणापासून हे विद्यार्थी टेबल टेनिस खेळत आहेत. ते ध्रुव ग्लोबल स्कूलचे प्रशिक्षक नचिकेत देशपांडे यांच्याकडे या खेळाचे प्रशिक्षण घेत आहेत. आपल्या जबरदस्त खेळाच्या जोरावर अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी चमक दाखविली आहे.

## पर्वती हिल क्लाइंबिंग स्पर्धा ५ फेब्रुवारीला

**पुणे :** नवक्षितिज ही प्रौढ मतिमंद व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी कार्यरत असलेली संस्था पर्वती टेकडी चढण्याची स्पर्धा दरवर्षी आयोजित करते. या वर्षी या स्पर्धेचे आयोजन दिनांक ५ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे. २००९ पासून सुरू झालेला हा विशेष कार्यक्रम शारीरिक तंदुरूस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी, स्पर्धकांना नवीन आव्हाने स्वीकारण्यासाठी प्रेरणा देण्यासाठी आणि मतिमंद व ऑटिझम असलेल्या व्यक्तींमध्ये वैयक्तिक प्रगती साधण्यासाठी आयोजित केला जातो.ही स्पर्धा नेहमीच आनंददायक आणि प्रेरणादायक ठरली आहे. ३० हून अधिक संस्थांचे प्रतिनिधी आणि ३०० हून अधिक स्पर्धक दरवर्षी या कार्यक्रमाचा भाग बनून तो यशस्वी करतात. मतिमंद व ऑटिझम असलेल्या व्यक्तींना सशक्त बनविण्यासाठी, त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि अशा स्पर्धांमध्ये चमकण्यासाठी संधी उपलब्ध झाली आहे.



## स्पोर्टीव्ह इलेव्हन, ब्रेव्हहार्टर्स, हेमंत पाटील संघ विजयी





**पुणे :** पुणे क्रिकेट ॲकॅडमी आणि सागर कांबळे यांच्यावतीने कै. अभिषेक ठाकूर यांच्या स्मरणार्थ आयोजित 'अभिषेक ठाकूर करंडक' आंतरक्लब खुल्या गटाच्या ट्रेन्टी-२० क्रिकेट २०२४-२५ स्पर्धेत ब्रेव्हहार्टर्स, हेमंत पाटील संघ, एम. यंगस्टर्स आणि स्पोर्टीव्ह इलेव्हन या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत कुणालसिंग चौहान याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे ब्रेव्हहार्टर्स संघाने एम. यंगस्टर्सचा १२ धावांनी निसटता पराभव केला. कुणालसिंग याने ३ विकेट घेतल्या आणि २९ धावांचे योगदानही दिले. दुसऱ्या सामन्यामध्ये दिलीप यादव याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे एम. यंगस्टर्स संघाने रायझिंग क्रिकेट क्लबचा ५ गडी राखून सहज पराभव केला. दिलीप याने ३ गडी बाद करताना २३ धावांचे योगदान देत अष्टपैलु कामगिरी केली. अक्षय परदेशी याने फटकावलेल्या ७० धावांच्या जोरावर स्पोर्टीव्ह इलेव्हनने एसी डायनामाईट संघाचा ७ गडी राखून पराभव केला. एसी डायनामाईट संघाच्या १६२ धावांचा पाठलाग करताना अक्षय याने ५२ चेंडूत ११ चौकारांसह ७० धावा केल्या आणि स्पोर्टीव्ह इलेव्हनने १८.२ षटकात लक्ष्य गाठले. दुसऱ्या बाजूने शिवम जैस्वाल याने नाबाद ५० धावांची खेळी केली. सचिन राठोड याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर हेमंत पाटील संघाने स्पोर्टीव्ह इलेव्हनचा ६ गडी राखून पराभव केला.



## पुण्याच्या श्वेता गुजाळला सुवर्ण

### महिलांच्या इलिट स्प्रिंट टू लॅपस् प्रकारात सोनेरी यश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जेतेपदाची प्रबळ दावेदार असलेल्या महाराष्ट्राच्या श्वेता गुजाळ हिने ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महिलांच्या ट्रॅक सायकलिंगमध्ये इलिट स्प्रिंट टू लॅपस् प्रकारात सुवर्णपदक जिंकून स्पर्धेचा सातवा दिवस गाजविला.

शिवालिक वेलोड्रम मनोज सरकार रुद्रपूर स्टेडियमवर ट्रॅक सायकलिंग स्पर्धा सुरू आहे. पुण्याच्या श्वेता गुंजाळ हिने अपेक्षेप्रमाणे पहिल्या झटक्यात मुसंडी मारली. मग ही आघाडी टिकवत या मराठमोळ्या सायकलपटूने सुवर्णपदकावर नाव कोरले. अंदमान निकोबारच्या सेलेस्टिनाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले, तर दिल्लीची त्रियशा पौल कांस्यपदकाची मानकरी ठरली

**सुवर्णपदक जिंकेल असा विश्वास होताच.** त्रिवेंद्रममधील खेलो इंडियाच्या साई अकादमीतील सरावाचा मला फायदा मिळाला. आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेत देशाचे प्रतिनिधित्व करायचे माझे स्वप्न आहे.
**— श्वेता गुंजाळ**

## उपांत्यपूर्व फेरीत मुंबई-हरयाणा झुंज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीचे वेळापत्रक स्पष्ट झाले आहे. ८ फेब्रुवारीपासून रंगणाऱ्या उपांत्यपूर्व लढतींमध्ये गतविजेत्या मुंबईची गाठ हरयाणाशी पडणार आहे. रोहतक येथे ही लढत खेळवण्यात येईल.

पहिली उपांत्यपूर्व लढत अ-गटातील विजेते म्हणजेच जम्मू-काश्मीर आणि क-गटातील दुसऱ्या स्थानावरील संघ केरळ यांच्यात पुणे येथे होईल. दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात नागपूर येथे विदर्भ आणि तमिळनाडू आमनेसामने येतील. तिसरी उपांत्यपूर्व लढत ही मुंबई आणि हरयाणा यांच्यात रंगेल. चौथ्या सामन्यात राजकोट येथे सौराष्ट्र आणि गुजरात आमनेसामने येतील. उपांत्य व अंतिम फेरी कुठे होईल, हे अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. २०२४मध्ये मुंबईने रणजी ट्रॉफीचे जेतेपद मिळवले होते. त्यावेळी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर विदर्भाविरुद्ध अंतिम सामना झाला होता.

अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वात खेळणाऱ्या मुंबईने शेवटच्या लढतीत मेघालयवर बोनस गुणासह विजय मिळवून आगेकूच केली.

### आशियाई क्रीडा स्पर्धेत

## भारतीय स्पीड स्केटिंग संघांचे नेतृत्व श्रुती कोतवालकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारताची राष्ट्रीय स्पीड स्केटिंग विजेती पुण्याची श्रुती कोतवाल हिच्या कडे चीन मधील, हर्बिन येथे 7 फेब्रुवारी 2025 पासून सुरू होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय महिला स्पीड स्केटिंग संघांचे नेतृत्व सोपवण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय क्रिडा क्षेत्रातील सर्वात मोठी स्पर्धा असणाऱ्या हिवाळी आशियाई स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणारी श्रुती ही पहिलीच महिला खेळाडू ठरणार आहे.

क्रीडा क्षेत्रातील एक अग्रगण्य खेळाडू म्हणून निष्ठा आणि निर्धाराचे प्रतीक असणारी श्रुती 2011पासून स्पीड स्केटिंग मधील आघाडीची खेळाडू आहे. तिच्या नावावर अनेक विक्रमांची नोंद असून दक्षिण आशियाई हिवाळी क्रिडा स्पर्धांमध्ये तीन सुवर्णपदके, तसेच, एम कप मास्टर्स स्पर्धेत 2022मध्ये एक रौप्य पदक व एक कांस्यपदक, 2023मध्ये एक रौप्य पदक व एक कांस्यपदक आणि 2025मध्ये कांस्यपदक अशी चमकदार कामगिरी केली आहे.

हिवाळी आशियाई क्रीडा स्पर्धामध्ये सहभगी होणाऱ्या भारतीय क्रिडा पटूसाठी श्रुतीची कामगिरी ही आदर्शवत व प्रेरणा दायक ठरणार असून देशभरातील युवा खेळाडू व क्रिडा प्रेमींनी श्रुतीचा या आधीपासूनच रोल मॉडेल म्हणून स्वीकार केला आहे. चीन मध्ये होणाऱ्या आगामी हिवाळी आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व करणाऱ्या श्रुतीचे उदाहरण तिच्यासह या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्वच भारतीय खेळाडूंच्या डोळ्यासमोर राहणार असून आता पर्यंतच्या तिच्या भूतकाळातील कामगिरीची पुनरावृत्ती या पेक्षाही सरस कामगिरीच्या जोरावर या स्पर्धेत देखील करेल असा विश्वास वाटतो.



# आता लक्ष चॅम्पियन्स ट्रॉफीच्या तयारीकडे!

## गंभीरची इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यांवर नजर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गौतम गंभीरच्या प्रशिक्षणाखाली भारतीय संघाने टी-२०तील अपराजित राहण्याची मालिका कायम राखली. मात्र आता आगामी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या दृष्टीने इंग्लंडविरुद्धची एकदिवसीय मालिका तयारीसाठी निर्णायक ठरणार आहे. त्यामुळे आम्ही या आव्हानासाठी सज्ज आहोत, असे मत भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक गंभीरने नोंदवले.

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात खेळताना भारताने रविवारी पाचव्या टी-२० सामन्यात इंग्लंडला १५० धावांनी धूळ चारली. यामुळे भारताने मालिकेत ४-१ असे यश संपादन केले. सूर्यकुमार कर्णधार झाल्यापासून भारतीय संघाने अद्याप एकही टी-२० मालिका गमावलेली नाही. आता ६ फेब्रुवारीपासून भारत-इंग्लंड यांच्यात एकदिवसीय मालिका सुरू होईल. या मालिकेतील ३ सामन्याद्वारे भारताला चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पहिल्या पसंतीचे ११ खेळाडू कोण असतील, याची चाचपणी करता येईल. ६ फेब्रुवारीला नागपूर येथे पहिला सामना होईल. त्यानंतर १९ फेब्रुवारीपासून पाकिस्तान आणि दुबई येथे चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा रंगणार आहे. भारतीय संघ सर्व सामने दुबईत खेळणार असून ते अनुक्रमे बांगलादेश, पाकिस्तान, न्यूझीलंड या संघांशी दोन हात करणार आहेत.

"भारताच्या टी-२० संघांतील सर्वच खेळाडू विजयवीर (मॅचविनर) आहेत. या खेळाडूंमध्ये जिंकण्याची भूक असून ते कोणत्याही संघाला अथवा खेळपट्टीला पाहून भीत नाहीत. टी-२०मध्ये तुम्हाला अशाच प्रकारचे खेळाडू हवे असतात. आयपीएलचे यामध्ये मोलाचे योगदान आहे. गेल्या काही काळापासून आम्ही सातत्याने प्रथम फलंदाजी करताना किमान २२० धावा करायचे, हे ठरवले आहे. त्यामुळेच भारतीय संघ तुम्हाला सातत्याने २०० धावांपेक्षा अधिक धावा करताना आढळतो," असे गंभीर म्हणाला. आता एकदिवसीय मालिकेसाठी रोहित शर्मा, विराट कोहली, रवींद्र जडेजा असे अनुभवी खेळाडू संघात परततील. जसप्रीत बुमराविषयी अद्याप साशंकता असली तरी मोहम्मद शमीही एकदिवसीय मालिकेत तिन्ही लढती खेळेल, असे अपेक्षित आहे. त्यामुळेच गंभीरने लगेचच एकदिवसीय मालिकेवर लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले आहे.

"एकदिवसीय मालिकेसाठी आता आम्ही नव्या जोमाने तयारी करणार आहोत. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडविरुद्ध जे झाले, ते विसरून सर्व खेळाडू एकजुटीने कामगिरी उंचावण्यास आतुर आहेत. रोहित, विराट हे दोन्ही खेळाडू या मालिकेसह चॅम्पियन्स ट्रॉफीत संघासाठी निर्णायक भूमिका बजावतील. भारतीय संघातील प्रत्येक खेळाडू हा देशासाठी सर्वोत्तम योगदान देण्याचा प्रयत्न करेल," असेही गंभीरने नमूद केले. भारताचा यष्टिरक्षक फलंदाज संजू सॅमसनला पाचव्या टी-२० सामन्यात उजव्या हाताला दुखापत झाली. जोफ्रा आर्चरचा चेंडू त्याच्या बोटांवर आदळला. त्यामुळे सॅमसन यष्टिरक्षणासाठीही मैदानात आला नाही. सोमवारी आलेल्या स्कॅननुसार सॅमसन आता किमान १ महिना तरी क्रिकेटपासून दूर राहणार आहे. त्यामुळे तो रणजी स्पर्धेतही केरळकडून खेळू शकणार नाही. थेट आयपीएलमध्येच सॅमसनचे पुनरागमन अपेक्षित आहे. सॅमसनचा इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसह चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी मात्र भारतीय संघात समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे सॅमसनच्या चाहत्यांचा हिरमोडही झाला आहे.

# विश्वविजेत्या भारतीय संघाला बीसीसीआयकडून ५ कोटींचे बक्षीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सलग दुसऱ्यांदा महिलांच्या १९ वर्षांखालील टी-२० विश्वचषकाचे जेतेपद मिळवणाऱ्या भारतीय युवतींच्या संघाचा बीसीसीआयकडून गौरव करण्यात येणार आहे. या संघासाठी बीसीसीआयने ५ कोटींचे पारितोषिक जाहीर केले आहे.

निक्की प्रसादच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहून जगज्जेतेपद काबिज केले. रविवारी झालेल्या अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेला ९ गडी राखून धूळ चारली. त्रिशा गोंगडी स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरली. या जेतेपदानंतर भारतीय संघावर चोहीकडून कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे. २०२३मध्ये शफाली वर्माच्या नेतृत्वात भारताने टी-२० विश्वचषक उंचावला होता.

"मलेशियामध्ये टी-२० विश्वचषक उंचावणाऱ्या भारतीय संघाचे अभिनंदन. बीसीसीआयकडून विश्वविजेत्या संघाला ५ कोटींचे पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच प्रशिक्षक नूशीन अल खदीर व अन्य सहायक्कांनाही गौरवण्यात येणार आहे," असे बीसीसीआयने जाहीर केले.

भारतीय युवतींचा संघ हा कोणत्याही आयसीसी स्पर्धेतील पहिल्या दोन पर्वांचे (२०२३, २०२५) जेतेपद मिळवणारा विश्वातील दुसराच संघ ठरला. यापूर्वी वेस्ट इंडिजच्या पुरुष संघाने १९७५ आणि १९७९मध्ये एकदिवसीय विश्वचषकाचे जेतेपद काबिज केले होते. या दोघांव्यतिरिक्त आजवर कोणत्याही पुरुष व महिला संघाला १९ वर्षांखालील, एकदिवसीय, टी-२०, चॅम्पियन्स ट्रॉफी अथवा कसोटी प्रकारात अशी कामगिरी करता आलेली नाही. त्यामुळे भारताने मिळवलेले जेतेपद खास आहे. मात्र या जेतेपदातून प्रेरणा घेत भारताचा वरिष्ठ महिला संघही लवकरच भविष्यात आयसीसी जेतेपद मिळवेल, अशी चाहत्यांना आशा

### बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी करंडक

# क्रिकेट स्पर्धेत क्रिकफायटर्स संघाला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी करंडक 13 वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत नील परदेशी (४-२२) याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर क्रिक फायटर्स संघाने फायटर्स इलेव्हन क्रिकेट क्लब संघाचा ३९ धावांनी पराभव करून विजेतेपद संपादन केले.

चिखली येथील सिल्व्हर क्रिकेट क्लब क्रिकेट मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत



प्रथम फलंदाजी करताना क्रिक फायटर्स संघाने ४८षटकात सर्वबाद २०२ धावा केल्या. यात स्वराज पिंगळे ४५, यशवर्धन आजबे ३४, नील परदेशी २५, विहान माळगी १८, गुरु राजोळे १५ यांनी धावा केल्या.

२०२ धावांचे आव्हान फायटर्स इलेव्हन क्रिकेट क्लब पेलू शकला नाही. त्यांचा डाव ४५.५ षटकात सर्वबाद १६३ धावावर कोसळला. यात विरेन पाटीलने एकाबाजूने लढताना सर्वाधिक ५६ धावा केल्या. क्रिक फायटर्स संघाकडून नील परदेशीने २२ धावांत ४ गडी बाद केले. त्याला सुजल राणे(२-१८), शावेज पठाण(२-४६) यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून साथ दिली. स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण स्पर्धा संचालक उत्कर्ष अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले.

इतर पारितोषिके:

सर्वोत्कृष्ट फलंदाज: स्वराज पिंगळे(३४८धावा);

सर्वोत्कृष्ट गोलंदाज: शावेज पठाण(१३ विकेट)

मालिकावीर: विरेन पाटील(३०१ धावा व ६ विकेट).

#रा